ॐ श्रीगणेशाय नमः । देवेश भ्रूशुण्डीस विचारिती । देवमुनींनी केली स्तुति । महानदीची ब्रह्मदेवासाठीं ती । तें स्तुतिस्तोत्र सांगा आम्हां ।।१।। सुखप्रद तें स्तोत्र होईल । ऐसी प्रार्थना ऐकून विमल । भ्रूशुण्डी तयांसी प्रेमळ । वृत्तान्त सांगे सविस्तर तो ।।२।। नाना तीर्थजळांत स्नान करित । परी ब्रह्मा शुद्ध न होत । तीर्थजळें झालीं असमर्थ । ब्रह्मदेवाचें पाप हरावया ।।३।। तेव्हां सारे देव विचार करित । तुरीय तीर्थासी

मु. पु. खंड. ६ अ. २४-२५

कर जोडित । भक्तिभावें त्याचें स्तोत्र गात । देवांनो तें आतां ऐका ।।४।। सर्वादिभूत जें त्रिगुणीं स्थित । तीर्थांत सर्वविकाररहित । पापविनाशीं दक्ष अत्यंत । ऐशा तुरीय तीर्था नमितों ।।५।। गंगादि नद्यांचा उगम त्यापासून । ते सर्वान्तरंगी स्थित पावन । आत्मरूप नादात्मक चालक होऊन। त्या तुजला नमितों आम्हीं ।।६।। पुराणें ज्याचें गीत गातीं । विधीच्या पापाची जें करी क्षती । कमंडलूंत ज्याची वसती । अप्रमेय परम जें असे ।।७।। अपार तीर्थांत आत्मभाव धरित । त्यायोगें देहधर त्यास नमित । नाथ विधातृपद भूषवित । तो जरी पापी जाहला ।।८।। तरी त्यासी वाचवित । विश्वाचा नाश टाळित । दयाळू ऐसें जें तीर्थ । त्या तुरीयास नमितों आम्हीं ।।९।। गंगास्वरूपा तुज नमन । ब्रह्मात्मज अरूपधरासी वंदन । वेणीस्वरूपा पुष्करा अभिवादन । तापीप्रभासा सर्वतीर्थरूपा ।।१०।। प्रयाग नर्मदा कालिंदीरूपा । कृष्णा ककुद्मती देवनदीस्वरूपा । पयोष्णी गोदावरीरूपा । क्षिप्रा सिन्धुस्था तुज नमन ।।११।। महीस्वरूपा कावेरीस्थिता । सरयूस्वरूपा कमंडलूवान उदात्ता। साडेतीन कोटि तीर्थयुक्ता । तीर्थोत्तमा तुज नमन ।।१२।। अनंततीर्थप्रवरा मयूरस्थिता । सागरस्था सरोवरवापीस्था । कूपस्था तीर्थोत्तमा तुज आतां । आदरभावें नमितों आम्हीं ।।१३।। जें जें जळ सूर्यापासून । घनरूपें पृथ्वीवरी करी अवतरण । तें तुझेंच रूप शोभन । ऐशा तुला नमितों आम्हीं ।।१४।। तूं पसरविलें हें विश्व सर्व । चराचरांत जलयुक्त थोर । कृपाकटाक्षअमृतधारा अपूर्व । वाहवून रक्षण आमुचें करी ।।१५।। दाखवी स्वरूप आम्हांसी । ऐसें स्तवनकर्त्या त्या देवमुनींसी । दाखवी तेजोमय जलरूपासी । सुरर्षि नमिती आदरें ।।१६।। तैं महातीर्थ त्यास म्हणत । हर्षयुक्त चित्तें वचन उदात्त । भ्रूशुण्डी सांगे देवांप्रत । देवेश मुनींनो वर मागा ।।१७।। जो मागाल वर ।

तो तो मी देईन समग्र । तुम्ही रचिलेलें हें पुण्यस्तोत्र । प्रीतिवर्धक मज सर्वदा ।।१८।। यांत संदेह नसत । भुक्तिमुक्तिप्रद हें नितांत । पाठका वाचका अविरत । स्नानाचें फळ लाभेल ।।१९।। सर्व पापांचा नाश करील । वाचितां ऐकतां स्तोत्र हें विमल । सर्वतीर्थाचें हें वचन अमल। सुरर्षि हर्षित फार झाले ।।२०।। देवेश जोडून करसंपुट वंदिती । त्या तीर्थासी तेव्हां सर्व प्रार्थिती । महातीर्था प्रसन्न जरी सांप्रती । पितामहासी शुद्ध करी ।।२१।। त्याच्या कमंडलूंत स्थिर वसती । करावी तेणें वाढावी महती । सर्वतीर्था तुझी ख्याती । ब्रह्मकमंडलूनामें व्हावी ।।२२।। तुझ्या प्रसादें हाचि वर लाभावा । तथाऽस्तु म्हणे तें तीर्थ देवां। देवविप्रांच्या इच्छेला मान द्यावा । ऐसी प्रीती तयांवरी ।।२३।। देवेश भ्रूशुण्डीस प्रार्थित । ऐकिलें सर्व संशयहर पुनीत । तथापि मन पूर्ण तृप्त। न झालें कथामृतपानानें ।।२४।। महातीर्थाचें माहात्म्य अद्भुत । वर्णिलें विप्रा तूं आम्हांप्रत । पूर्वी कोणास सिद्धि प्राप्त । त्याचें चरित्र सांगावें ।।२५।। भ्रूशुंडी म्हणे तयांप्रत । पूर्वी होता द्विज भारद्वाज कुळांत । तो मुर्ख संध्यादि विद्यावर्जित । चिंतामग्न याचे मायबाप ।।२६।। त्यास घेऊन ते जात । नदीमूळ जेथ विराजत । ब्रह्मकमंडलू तीर्थ अद्भुत । परमभावभक्तीनें ।।२७।। नदीजलांत स्नान करून । करिती गणेशाचें पूजन । कमंडलुतीर्थतीरीं विधि आचरून । भक्तियुक्त त्या वेळीं ।।२८।। तेव्हां आश्चर्य एक घडत । त्यांचा पुत्र पंडित होत । सुबुद्धियुक्त तो म्हणत । वेदादी अस्खलित समस्त ।।२९।। आपुल्या सुतासी घेऊन जाती । होऊन हर्षनिर्भर चित्तीं । गावीं आनंदें राहती । अन्तीं मुक्ति लाभली तयां ।।३०।। ऐसे नाना जन लाभत । स्नान करितां सिद्धि इष्ट । कळत अथवा नकळत । कमंडलुतीर्थदर्शनानेंही ।।३१।। दुसरा एक वृत्तान्त। कथितों तुम्हांसी सांप्रत । रविवंशज क्षत्रिय सुरथ असत।

मालव देशीचा नरपति ।।३२।। स्वराज्य धर्मनीती चालवित । सचिवांचा सल्ला मानित । परवीरांचा दर्प हरित । विदर्भाधिपति एकदां झाला ।।३३।। दिग्‌विजयार्थ तो संचार करित । माळव्यावरी चालून जात । तेव्हां सुरथ राजा युद्ध करित । घनघोर तयासवें ।।३४।। परी दुर्दैवें सुरथ पराजित । होऊन कान्तारीं पळून जात । अन्य राजांचें साहाय्य घेत । पुनरपि लढे निश्चयानें ।।३५।। घोर संग्राम तैं होत । त्यांतही पुन्हा पराजित । तेव्हां तो मयूरेश्वरक्षेत्रांत । आश्रयार्थ पातला ।।३६।। ब्राह्मणांसी विचारित । मध्यमेश्वर तीर्थीं स्नान करित । तदनंतर शंकरासी पूजित । प्रणाम करी तयासी ।।३७।। तदनंतर सेना जमवून । गेला विदर्भ नृपावरी चालून । त्या युद्धांत विजय मिळून । मिळवलें स्वराज्य परत त्यानें ।।३८।। अन्तीं त्यास मुक्ति लाभत । स्नानाचें हें माहात्म्य अद्भुत । ऐशापरी जाणतां वा अजाणत । सिद्धि लाभली तेथ जनांसी ।।३९।। दुसरें एक पुण्यप्रद चरित । प्राज्ञांनो ऐका श्रद्धायुक्त । गौतमवंशीय द्विज पंडित । स्वधर्मनिष्ठ ज्ञानघन ।।४०।। परी त्यासी यश न लाभत । दीक्षादिकांत प्रयत्नें सतत । ब्राह्मण त्याचें कर्म पाहत । दोषदृष्टीनें सर्वकाळ ।।४१।। त्यायोगें अतिखेदयुक्त । तो ब्राह्मण सर्वतीर्थाची यात्रा करित । विचार करून स्नान करित । गौतमवंशकुलोत्पन्न तो ।।४२।। हृषिकेशास पूजून । त्याला वंदन करून । तो स्वगृहीं गेला परतून । पुनरपि वैदिक कर्मे करी ।।४३।। आतां अन्य द्विजांस तें मान्य होत । ते त्यासी न निंदित । तो जें जें कर्म करित । तें तें होई यशस्वी ।।४४।। अन्ती तो मुक्त होत । तीर्थसेवनपुण्यें जगांत । ऐसें जाणून न जाणताही जे जात । तीर्थास ते मुक्त होती ।।४५।। त्यांची गणना अशक्य असत । अन्यही ऐका एक चरित । दंडकारण्यदेशांत । होता एक चांडाळ पापी ।।४६।। वनांत जाऊन

द्विजहनन । करी तो परस्त्रीचें अपहरण । रानात एकटी पकडून । बलात्कारें भोगी तिजला ।।४७।। ऐसा तो विषयलंपट करित । नानाविध पापें कामासक्त । एकदा एक धनिक वाणी दिसत । पाठलाग त्याचा तो करी ।।४८।। हातांत शस्त्रें घेऊन । मागें जाई करण्या हनन। मार्गात ब्रह्मकमंडलूद्भव सरिता पाहून । चांडाळ गेला तिच्या जवळीं ।।४९।। परी जलस्पर्शादिक न करित । अत्यंत दुर्मति तो असत । तदनंतर योजनमात्र चालत । ठार मारी त्या वाण्यासी ।।५०।। त्याचें द्रव्य लुटून । स्वगृहासी गेला परतून । पुढें तो नीचयोनिज मरत । यमदूत त्यासी पकडिती ।।५१।। ताडिती अत्यंत ते निष्ठुर । यमपुरीस नेती सत्वर । यमधर्म त्या दूतांस क्रोधपर । वचन म्हणे धर्मयुक्त ।।५२।। जरी हा महापापी असत । तरीही सोडा यास त्वरित । सर्वतीर्थाचें दर्शन पुनीत । यास घडलें होतें पूर्वी ।।५३।। वाण्यास ठार मारण्या इच्छित। तैं मार्गी हें तीर्थ पाहत । त्यायोगें पाप नष्ट होत । यास मानवी देह द्यावा ।।५४।। हा शुभाशुभ कर्में करील । तेव्हा पुढें उद्धरेल । विचक्षण दूतांनो प्रभाव विमल । जाणा तीर्थदर्शनाचा ।।५५।। त्या यमवचनानुसार । बंगाल देशांत जन्मत नंतर । ऐशियापरी तो शूद्र । तीर्थदर्शनें दुरितमुक्त ।।५६।। या तीर्थाच्या जलबिंदूचा । स्पर्श होता पुण्यवृष्टीचा । योग येऊन मानवाचा । उद्धार जगीं होतसे ।।५७।। याविषयीं एक चरित । सर्वज्ञ देवहो ऐका एकचित्त । कोण्या एका वनांत । व्याध होता महापापी ।।५८।। तो ब्रह्महत्यादि पापें करित । एका धनिकास दैवें पाहत । खड्ग उगारून मारण्या धावत । तेव्हां तो धनी पळाला ।।५९।। तो शेटजी पुढें धावत । व्याध पाठलाग त्याचा करित । वाटेंत कमंडलूद्भव गंगा लागत । दैवयोगें त्या उभयतांच्या ।।६०।। त्या गंगेस उल्लंघून जात । तो धनिक भयभीत । तो व्याधही

नदींत उतरत । पैलतीरीं जात उल्लंघून ।।६१।। त्यायोगें त्या तीर्थाचें जल स्पर्शत । व्याध पडतां कुंडांत । तो धनिक पळून जात । प्राण वांचवी आपुला ।।६२।। व्याध निश्वास टाकित । तदनंतर स्वगृहीं परतत । पापें असंख्य आचरित । अन्तीं मरण पावे तो दुर्मती ।।६३।। यमदूत त्या व्याधास । बांधून नेती यमपुरास । धर्मराज पाहून त्यास । प्रेमयुक्त वचन तैं बोले ।।६४।। महाभागांनो हा पुनीत । शुद्ध सर्वपापवर्जित । ब्रह्मकमंडलूतीर्थांत । पडला होता धावतांना ।।६५।। त्या समयीं तीर्थजळाचा स्पर्श । होऊन पवित्र यास । तीर्थदर्शनेंही विलयास । दुरितें याचीं सर्व गेलीं ।।६६।। अनेक जन्मांची पापें नासतीं । या तीर्थजलाच्या दर्शनस्पर्शनें जगतीं । त्यानंतर पापकर्मे जीं घडतीं । तीं यातनाप्रद होणार ।।६७।। तथापि हा योग्य नसत । यातना भोगण्या सांप्रत । काश्मीरदेशी ब्राह्मण कुळांत । जन्मासी याला घालावें ।।६८।। ती आज्ञा पालन करिती । त्या नरासी तैसेचि करिती । ऐशापरी नाना जन होती । पापहीन या प्रकारें ।।६९।। ऐसाचि एक पूर्ववृत्तान्त । सांगतों तुम्हां वंगदेशांत । होता शूद्र एक पापी अत्यंत । श्याम नांव तयाचें ।।७०।। तो श्याम शिश्नउदरपरायण । चौर्यकर्म करी नित्य नूतन । शस्त्रधारी करी हनन । बहुविध जनांसी तो नित्य ।।७१।। नगरांत तैसेंचि वनांत । जनांस तो मारित । मद्यमांस भोगी सतत । तो एकदां गेला वनांत ।।७२।। तेथ उत्तम धनिक वाणी पाहत । तो दुष्ट त्यांचा पाठलाग करित । ते वाणी जाती दंडकारण्यांत । तो शूद्रही जाई तेथें ।।७३।। चोरीच्या आशेनें तेथ जात । तैं ते मार्गस्थ तृषार्त । जलहीन सारे भटकत । पोहोचले ब्रह्मकमंडलूतीर्थावरी ।।७४।। त्या तीर्थाचें पाणी पिऊन । सारे परतले ग्रामीं प्रसन्न । रात्रीं असतां निद्रामग्न । त्या चोरानें त्यांस ठार मारिलें ।।७५।। देवेंद्र नगरांत सारे गेले । पुण्यप्रभावें मुक्त झाले ।

ब्रह्मकमंडलूच्या जलपानानें झाले । इंद्रपुरीचे निवासी ।।७६।। त्या वणिग्जनांना मुक्ति मिळत । तिकडे तो चोरही होत मृत । यमदूत त्यास पकडून नेत । दुष्ट कर्मांनीं तयाच्या ।।७७।। त्यास यमराजापुढे नेती । तेव्हां ते दूतांसी म्हणती । हा शूद्र जरी पापी जगतीं । तरी तेवढाचि पुण्यवान ।।७८।। सर्व तीर्थमयींत केलें जलपान । त्या जलाच्या स्पर्शें हा पावन । दर्शनस्पर्शनपानें पुण्यवान । त्रिविध परीनें हा झाला ।।७९।। त्या जन्मांतले पाप नष्ट झालें । तीर्थदर्शनानें तें निमालें । अनेक जन्मांत जें घडलें । तीर्थस्पर्शें विनष्ट पाप ।।८०।। ह्या तीर्थाच्या पानानें लाभलें । यास इंद्रपदप्राप्ति पुण्य हें भलें । त्यानें अंतर्बाह्य पाप लोप पावलें । हा झाला पूर्ण पुण्ययुक्त ।।८१।। म्हणोनि यास घेऊन । जावें इंद्राकडे विनत होऊन । हा तेथ भोग भोगील प्रसन्न । यांत संशय मुळीं नसे ।।८२।। तेथ सुखोपभोग भोगून । पुण्य सरतां पुनरपि होईल पतन । याचें पृथ्वीवरी हें निश्चित वचन । ऐकतां यमदूत म्हणती ।।८३।। स्वामी आम्हीं तैसें करतों । यास इंद्रनगरींत नेतों । आपुली आज्ञा पाळितों । दास आम्ही आपुले ।।८४।। ऐशियापरी नाना अमर । तैसेचि सिद्धि पावले विविध नर । त्यांचें वर्णन समग्र । शतवर्षांनींही न पूर्ण होय ।।८५।। ऐसाच एक इतिहास पुरातन । महाभागांनो सांगतों मीं प्रसन्न । स्नान करितां सिद्धि लाभून । धन्यता लाभती सर्व प्राणी ।।८६।। धनप्रिय नावाचा एक सुतार । बंगालांत होत दुष्ट चोर । तो पापें करी अनिवार । द्रव्यार्थ वधिलें मातापित्यासी ।।८७।। विष देऊन त्यासी मारित । ब्राह्मणादींस प्रणाम करित । तद्नंतर त्यांसही वधित । विष त्यांसी देऊनी ।।८८।। पापनिष्ठ तो दुर्मति । बाहेरून साधुभाव दावून अती । दुरात्मा ठेवी दुष्टभाव चित्तीं । त्यायोगें भुलती जन सारे ।।८९।। ते त्याच्या होती अधीन । विश्वास त्यांच्या मनीं निर्मून । द्रव्यार्थ ठार

मारी तो दुर्मन । विश्वासघात करूनिया ।।९०।। ऐसा बहू काळ जात । त्या दुष्टाचें कर्म अघटित । नृपासी झाले विदित । राजदूत त्यास पकडिती ।।९१।। त्याचें सर्व धन करिती हरण । मारिती त्यासी अति दारुण । स्वदेशांतून देती घालवून । राजा धर्मपरायण होता ।।९२।। तो धर्मनिती राज्य करित । सदैव लोकांचें पालन करित । तिकडे तो सुतार दंडकारण्यांत । पुत्रदारासहित गेला ।।९३।। तेथील एका गावांत । निवास करी तो मोदयुक्त । पुनरपि तैसीच वृत्ति आचरित । पापें तींच करीत असे ।।९४।। एकदां एक वाणी पाहत । त्याचें धन त्यास मोहवित । त्यास विष देण्याचें ठरवित । दुष्टबुद्धी तो कारुक ।।९५।। त्या वाण्यास भुलविण्यास । साधुलक्षणें धरी खास । मार्गांत महानदींत स्नानास । सर्वतीर्थमयींत तो वाणी करी ।।९६।। तो पापीही अनुकरण करित । धर्माचरणाचें सोंग वठवित । दुसऱ्या दिवशीं मार्गात । विष देऊन वधिलें त्यासी ।।९७।। त्या स्नानपुण्यें तो वाणी जात । शुक्ल गतीनें महेश्वराप्रत । कमंडलूतीर्थस्नानें लाभत । क्रममुक्ती तयासी ।।९८।। धनप्रिय तो चोर मरत । यथाकाळ स्वगृहांत । त्यासही मोक्ष प्राप्त होत । महादेवांनो स्नानप्रभावें ।।९९।। कमंडलूतीर्थाचें पावन । सांगतों तुम्हां चरित महान । महासिद्धिप्रद अन्य शोभन । गुजरात देशींची ही कथा ।।१००।। गुर्जरदेशीं वैश्यकुळांत । धर्मनामक एक स्वधर्म रत । तो आदरें नित्य कर्म करित । एकदां ऐके स्कंदपुराण ।।१०१।। त्या स्कंदपुराणीं ऐकत । कमंडलूतीर्थाचें माहात्म्य अद्भुत । मनीं होत अत्यंत विस्मित । म्हणे धन्य हें तीर्थश्रेष्ठ नदी ।।१०२।। ह्या नदीचें होईल दर्शन । तरीच सफळ माझा जन्म पावन । तो धर्म नित्य करी स्मरण । त्या महानदीचें भक्तीनें ।।१०३।। तदनंतर एकदां येत । कोणी एक क्षत्रिय यात्रारत । त्यानेंही ब्रह्मकमंडलूचे नांव अद्भुत ।

ऐकिलें त्या वैश्याकडून ।।१०४।। तो मार्गस्थ प्रात:काळीं उठत । आपुल्या स्थानासी निघून जात । नंतर बहु काळ लोटत । धर्मवैश्य मृत्यु पावला ।।१०५।। तो स्वर्गी जाऊन भोगत । विविध स्वर्गीय भोग अद्भुत । पुनरपि पृथ्वीवरी जन्मत । अत्रि कुळांत द्विजवर्णीं ।।१०६।। शिवदत्त ऐशा नामें ख्यात । तो करी तीर्थयात्रा अविरत । एकही नदीतट न सोडित । स्नानपुण्य जोडी सर्वत्र ।।१०७।। पूर्वपुण्यबलें उत्तमतीर्थसेवन। करून झाला तो पावन । योगी होऊन आलें मरण। तीर्थोत्तमस्मरणानें तयाला ।।१०८।। ब्रह्मांत तो लय पावत । होऊनिया ब्रह्मभूत । देवसत्तमांनो ऐशापरि होत । स्मरणेंही गतिप्रद हें तीर्थ ।।१०९।। ज्या क्षत्रियें होतें ऐकिलें । सर्वतीर्थाचें माहात्म्य भलें । त्यानें पापकर्म न सोडिलें । आसक्तीच्या प्रभावानें ।।११०।। तो क्षत्रिय जेव्हां मृत्यु पावत । तेव्हां यमदूत त्यास पकडित । ताडन करून ते नेत । भानुपुत्रासमोर ।।१११।। त्यास प्रणाम करून । मागती आज्ञा प्रमाण । ती मिळता टाकिती नेऊन । महा घोर नरकांत तयासी ।।११२।। तो नंतर श्वानयोनींत । जन्मला अत्यंत पापरत । दंडकारण्यांत हिंडत । महानदीतटीं गेला ।।११३।। तेथ कीटक माश्या त्रास देत । तैं तो स्नान करी महानदींत । पूर्वसंस्कारयोगें मरत । श्वानरूप तो त्या क्षेत्रीं ।।११४।। त्या पुण्यप्रभावें मोक्ष लाभत । यांत संशय अल्पही नसत । एकदाच ऐकतां नाम पुनीत । तीर्थाचें त्या हें पुण्य ।।११५।। धन्य धन्य त्या वृक्षलता । ज्या ब्रह्मकमंडलूतीरीं वाढतां । पावत पावनत्व तत्त्वतां । जें अन्यत्र ना राज्य लाभेंही ।।११६।। ज्या महानदीच्या तीरावर । मृत्यु येतां तो नरवर । शुक्लगति पावे ब्रह्म अमर । अन्यत्र मरतां पुनर्जन्म ।।११७।। देवेशांनो ऐसें सर्वत्र । ब्रह्मकमंडलूसरिता पवित्र । मयूरेशपरायण मात्र । शुभदा पूर्वगा ख्यात असे ।।११८।।

चतुर्मुखासी वा शिवासी । हृषीकेशासी वा अन्य देवांसी । दुर्लभा ही नदी सर्वांसी । कमंडलूतून जी जन्मली ।।११९।। या कमंडलूच्या मुळांत । कोटि तीर्थें असती स्थित । मध्यमभागीं अन्तीं वर्तत । कोटी कोट्यार्ध तीरावरती ।।१२०।। मीं संक्षेपानें कथिलें चरित । महादेवांनों तुम्हांप्रत । त्या ब्रह्मकमंडलु तीर्थाचें अद्भुत । पापहर वाचनें पठणें हें तीरावरती ।।१२१।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते ब्रह्मकमंडलुतीर्थचरितं नाम पंचविंशतितमोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय पंचविसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नम: । भूशुण्डी म्हणे देवांसी । आतां सांगेन तुम्हांसी । भूषविती कमंडलुतटासी । त्यांतील मुख्य तीर्थांचें वर्णन ।।१।। मुख्य एक गणेशकुंड ख्यात । त्याचें चरित्र संक्षेपें सांगत । त्यानंतर पंचतीर्थांचा महिमा अद्भुत । सांगेन तुम्हांस अपूर्व ।।२।। मध्यभागीं गणेशतीर्थ असत। दोनशें धनुष्यें अंतर वर्तत । तेथ देव मुनिजन स्नान करित । नित्य प्रयत्नें तीर्थें हीं ।।३।। त्या उभयतांच्या तीरावर स्थित । तीर्थें ब्रह्मकमंडलूच्या ज्ञात । तेथ जे स्नान करित । ते प्राणी गाणेश होती ।।४।। त्यापुढती महातीर्थ कापिल असत । जेथ गणेश कपिल होत । कमलासुरनाशार्थ जगांत । मारिलें त्यानें त्या असुरासी ।।५।। ह्या असुरासी मारून । महावीर्य जो महान । शंकरादींच्या साहाय्यें करून । त्याचें मस्तक धारण करी ।।६।। कपिल गणेश मयूरक्षेत्रांत । तेथ ब्रह्मा अभिषेक करित । मुनिगणांच्या सान्निध्यांत । गणेशसूक्तें हर्षभरानें ।।७।। तेथ नद्यांच्या संगमें होत । पंचामृत नामें तीर्थ विख्यात । तेथ स्नान करितां लाभत । कापिल सांख्यात्मक ज्ञान ।।८।। कपिलरूप

विष्णु संस्थित । त्या स्थानीं तो पुनीत । त्यापुढतीं व्यासतीर्थ वर्तत । सर्व अज्ञानाचें विनाशक ।।९।। त्याच प्रमाणांत जाणावें । त्या तीर्थाचें क्षेत्र बरवें । व्यासें तप आचरिलें भक्तिभावें । तेथ शंभर वर्षे दारुण ।।१०।। तदनंतर देवेशांनो त्यास देत । गणेश्वर वर प्रकटून पुढ्यांत । त्यायोगें भारत रचित । धर्माधर्मयुक्त महान ।।११।। ब्रह्मप्रद शास्त्र तें ज्ञात । व्यास तत्त्वज्ञान ग्रथित । त्या व्यासतीर्थी स्नान करित । मुक्त जाड्यभावांतून तो ।।१२।। धर्माधर्म व्यवस्था जाणून । होईल त्या नरा बोधज्ञान । गणेशतीर्थाच्या पूर्वेकडे शोभन । भीमकुंड भीमेश निर्मित ।।१३।। भीमेशानें तेथ राहून । गणेशतप आचरिलें महान । प्रसन्न होतां गजानन । वरदान त्यास लाभलें ।।१४।। त्या वरदानप्रभावें मारित । भीमासुरासी त्वरित । भीमेश नाम तीर्थ मुख्यत्वें ज्ञात । महाऐश्वर्यप्रदायक ।।१५।। एकदा उन्हाळ्यांत जलहीन । तें भीमेशतीर्थ होत पावन । तीर्थयात्रेस्तव आगमन । भीमाचें तेथ जाहलें ।।१६।। तो पांडुपुत्र स्नानार्थ । गदाप्रहारें तीर्थ खोदित । तेव्हां जलधारा उसळत । स्नान करी त्यांत भक्तिभावें ।।१७।। बलात्मक ऐश्वर्य तयास प्राप्त । त्या तीर्थाच्या माहात्म्यें अद्भुत । पुढें तो धृतराष्ट्रसुतांस मारित । ऐश्वर्यें संयुत होऊनियां ।।१८।। त्यानंतर परम ऋषींस्तव होत । हें तीर्थ स्वधर्मप्रद प्रख्यात । त्याचा विस्तार इतर कुंडासम असत । महान असे हें कुंड ।।१९।। ऐंशी हजार मुनि आचरित । ब्रह्मप्राप्त्यर्थ तपें अविरत । त्यायोगें ते ब्रह्मभूत समस्त । जीवन्मुक्त जाहले ।।२०।। ते तेथ राहून भजत । लंबोदर देवासी भक्तियुक्त । पंचतीर्थी असे प्रख्यात । ह्या मयूरक्षेत्रांत ।।२१।। त्या पांच तीर्थांत करितां स्नान । ब्रह्मभूत होतात जन । प्रथम गणेशतीर्थात स्नान । तदनंतर भैम तीर्थांत ।।२२।। तदनंतर आर्ष व्यासतीर्थांत । त्यापुढें कपिलतीर्थी स्नान करित । अन्तीं पुनरपि गणेशतीर्थांत । स्नान करावें

हा क्रम असे ।।२३।। गणेशतीर्थाच्या पूर्वेस असत । एक उत्तम तीर्थ विस्तृत । छत्तीसशें धनुष्यें मर्यादा ख्यात । ह्या पापविनाशक क्षेत्राची ।।२४।। दक्षिणतीरीं शिव वसत । आपुल्या शक्तिसमन्वित । तेथ तीर्थाचा आश्रय घेत । सर्वार्थाचें प्रवर्तक जें ।।२५।। उत्तर तीरावर स्थित । केशव रमेच्या सान्निध्यांत । सर्वधर्मप्रदाता तो ज्ञात । क्षेत्रांतीं क्षेत्रधारक ।।२६।। तें सर्व पापनाशक ख्यात । सहावें तीर्थक्षेत्रांत । स्नान करितां नर होत । दुःखमुक्त प्रसन्न ।।२७।। गणेशतीर्थाच्या पश्चिमेस । तीर्थ उत्तम एक सरस । सर्व पुण्यप्रद नाम तयास । क्षेत्रांतीं तें स्थित असे ।।२८।। तीर्थाच्या उत्तर तीरावर । भानुसंज्ञायुक्त तीर्थ थोर । भूषविती दक्षिण तीर । प्रकृति आणि पुरुषपर ।।२९।। तेथ स्नानमात्रें होत । भाविक नर पुण्यवंत । जें जें शुभ वांछीत । तें तें त्यास निश्चित लाभें ।।३०।। सातवें तीर्थ पूर्वेस असत । चतुर्गुण जें प्रमाणांत । या सात तीर्थांत स्नान करित । त्यास सर्व शुभ लाभें ।।३१।। आधीं गणेश तीर्थांत स्नान । नंतर आर्षतीर्थात करून । अघनाशन जें महान । पुण्यदेवीचें तीर्थ नंतर ।।३२।। तदनंतर कापिल तीर्थांत । गाणप तीर्थी पुनः स्नान करित । ऐसा क्रम येथे असत । सांगितला तुम्हां यथामति ।।३३।। ऐसीं मुख्य सात तीर्थें वर्णिलीं । जीं मयूरक्षेत्रीं प्रसिद्ध झालीं । श्रवण करिता माहात्म्य लाभली । पापनाशक शक्ति अनेकांसी ।।३४।। वाचका श्रोत्यांस समस्तांस । ह्या वाचनें पुण्य लाभून खास । सारें दुरित पाप जाय विलयास । विकट देवाच्या कृपेनें ।।३५।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते सप्ततीर्थवर्णनं नाम षड्विंशतितमोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय सव्विसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । भूशुण्डी सांगे देवेशांप्रत । गणेशतीर्थांत गणेश वसत । वामबाजूस सिद्धितीर्थ वर्तत । स्नानें त्यांत सिद्धि लाभे ।।१।। उजव्या बाजूस बुद्धितीर्थ असत । त्यांत स्नानें बुद्धि लाभत । त्यानंतर लक्षतीर्थ ख्यात । सिद्धि समीप ध्यानप्रद ।।२।। लाभतीर्थ बुद्धितीर्थ समीप असत । लाभप्रद तें अत्यंत । लाभतीर्थासन्निध विलसत । मयूरतीर्थ सर्वश्रुत ।।३।। त्यांत करितां स्नान । विविध मोह नाश पावून । लक्षाच्या समीप मौषक तीर्थ महान । स्नानें त्यांत अहंभाव हरे ।।४।। त्यापुढतीं मौद्गलतीर्थ वर्तत । गार्त्समदतीर्थ त्यापुढें दिसत । शुकतीर्थ त्यानंतर असत । दत्तात्रेयतीर्थ त्यापलीकडे ।।५।। अन्यही गाणपत्यांची विविध । तीर्थें येथ असती मुक्तिप्रद । त्यांचें विस्तारप्रमाण विशद । सांगतों संक्षेपें विचक्षणहो ।।६।। दहा धनुष्यें विस्तार । गणेशतीर्थाचा जाणा समग्र । त्याच्या अर्धा विस्तार । सिद्धिबुद्धितीर्थांचा ।।७।। अन्य सर्व तीर्थांचें प्रमाण । एक धनुष्य परिपूर्ण । त्या त्या गुरूंच्या शिष्यतीर्थांचें परिमाण । यवमात्र जाणा विबुध हो ।।८।। मयूरमूषकतीर्थांच्या पुढ्यांत । ब्रह्मप्रियतीर्थ ज्ञात । तैसेंचि मोदाचें प्रमोदाचें असत । तीर्थ योगप्रियाचेही ।।९।। अन्य गणांची मुख्य तीर्थें असत । तेथेंच ह्या परिसरांत । गणेश तीर्थे तीं ज्ञात । ऐसें जाणा पंचदेवांनो ।।१०।। दोनशें धनुष्यें अंतरावर । वक्रतुंडादींचीं क्षेत्रें दक्षिणोत्तर । गणेशाचे नाना अवतार । त्यांचीहीं तीर्थे येथ असती ।।११।। तेथ क्रम आतां सांगेन । पूर्वभागीं गणेश्वर संस्थित महान । वक्रतुंड एकदंत महोदर शोभन । गजानन तैसा बल्लाळ ।।१२।। हेरंब विघ्नेश भालचंद्र । ज्ञानेश शूर्पकर्ण मोदकर । चिंतामणि विनायक जे सुरेंद्र । विघ्नप बारा मुख्य असती ।।१३।। जे पश्चिम भागीं स्थित । त्यांची नांवें आतां सांगत । लंबोदर विकट विघ्नेश प्रख्यात । धूम्रवर्णक महागणपति ।।१४।।

तैसाचि सिद्धिविनायक थोर । ढुंढीश लक्ष आशाप्रपूरक विघ्नहर । वरद महोत्कट उदार । ऐसे हे बारा विघ्नेश ।।१५।। अन्यही नाना अवतार । अंगुष्ठपर्वसमाश्रित सुंदर । ऐसें गणेशतीर्थ थोर । गणपप्रिय वर्णिलें मी ।।१६।। ऐशीं असंख्य तीर्थे असतीं । त्यांची अगण्य करण्या गणती । तरीही कांहीं यथामति । सांगतों भक्तियंत्रित मीं ।।१७।। ऋषितीर्थापासून पुढें लागतें । चतुर्थीचें तीर्थ जें होतें । शुक्लकृष्ण गतीचें तें । स्नानें त्यांत चतुर्विध फळ ।।१८।। तदनंतर शमी मंदार तीर्थ उत्तम । नंतर दूर्वातीर्थ पांच धनुष्यें अनुपम । त्यांत स्नानें इच्छित लाभतें मनोरम । देवेशांनो सर्वदा ।।१९।। उत्तर तीरावरी जे असत । तें तीर्थ भैरवप्रिय ज्ञात । नग्नभैरव देवेश वसत । तेथ सदा भक्तिभावें ।।२०।। त्या नग्नभैरव तीर्थांत । स्नान करी जो भावयुक्त । वासनोद्भव दुःख नष्ट होत । तत्क्षणीं नरोत्तमांनो ।।२१।। द्वारकातीर्थ त्यापुढतीं । स्नानमात्रें त्यांत मुक्त होतीं । त्यापुढें अयोध्यातीर्थे असती । मथुरासंश्रित तीर्थ पुढें ।।२२।। त्यांत करिता स्नान । मुक्तिलाभ होऊन । लाभतें ईप्सित पावन । समस्तही सर्वकाळ ।।२३।। त्याच्या उत्तरेस प्रभास । तीर्थ जें स्नान केल्यास । रोगविनाश जीवितास । सद्यः सुखकर होत असे ।।२४।। तदनंतर पुष्करतीर्थ ख्यात । स्नान करितां पाप दूर होत । त्यापुढतीं कावेरिकातीर्थ ख्यात । स्नानमात्रें जें मुक्त करी ।।२५।। विष्णूच्या चोवीस कलात्मक । तीर्थे पापसंघांना दाहक । उत्तर तीरीं प्रतिष्ठित पावक । स्वयं विष्णु भगवान ।।२६।। ह्यांत स्नानमात्रें लाभत । वैष्णवपद भक्तांप्रत । भृगुतीर्थ वसलें त्यापुढें असत । पुलहतीर्थ पापहर ।।२७।। त्यानंतर मुनिगणांची तीर्थे संस्थित । त्यांचेही विस्तार यांत सांगत । ऐका करोनि एकचित्त । वैष्णवतीर्थांचा महिमा ।।२८।। वैष्णव तीर्थे स्नानमात्रें होत । विष्णुलोकप्रद जगतांत । त्या त्या देवऋषींचीं

तीर्थें वर्तत । त्या त्या लोकांचीं दायक जगीं ।।२९।। त्यांत लय पावतां मानव । शुक्लगतीनें मुक्ति अभिनव । मयूरक्षेत्र माहात्म्यें सर्वथैव । ब्रह्मकमंडलूत स्नानमात्रें ।।३०।। त्या तीर्थाचा जाणा विस्तार । एक धनुष्यपर सर्वत्र । मुनिगणादींचीं तीर्थें अन्यत्र । अंगुष्ठपर्व मात्र जाणावी ।।३१।। सृष्टिनिर्माणप्रारंभीं जात । देवालयीं मुनि देवतीर्थे अवलोकत । तेथ स्वसिद्धीस्तव तप करित । सिद्धि लाभली तयांना ।।३२।। तेव्हां ती स्वस्थानीं परत जातीं । परी कलांशें मयूरेशाजवळी वसती । म्हणोनि त्यांची गणती । अशक्य वाटे वर्णावया ।।३३।। सूक्ष्मचक्षूनें जाणावें । विस्तार तीर्थादिक पहावे । दक्षिण तटावरी विसावे । अवंतीतीर्थ देवमुख्यहो ।।३४।। शुक्रतीर्थ अगस्त्यतीर्थ । सोमेश्वरतीर्थ पिशाचतीर्थ । यमतीर्थ नैर्ऋत्यतीर्थ । हंसतीर्थ तैसे भैरव ।।३५।। महातीर्थ रुद्रतीर्थ । रामेश्वर तीर्थ मल्लिकार्जुनतीर्थ । सीमा सांगतों उत्तरतीर्थ । ज्याप्रकारें वसलें असे ।।३६।। विष्णु अवतारतीर्थ अप्सरातीर्थ । देवतीर्थ गंधर्व तीर्थ । इंद्रतीर्थ अग्नितीर्थ । विष्णुतीर्थ तदंतगम् ।।३७।। दक्षिण तीरीं पापहर । अत्रीचें तीर्थ थोर । एक द्वितत्रितादि तीर्थ पापहर । गणपात्मक हीं असतीं ।।३८।। त्यानंतर शंभूचें महातीर्थ । महेश्वरांनो सीमा स्थित । गणेशाच्या पूर्वभागीं जीं विलसत । तीं तीर्थें येथवर वर्णिलीं ।।३९।। आतां पश्चिमादि भागांत । तीर्थें जीं येथ असत । सुरश्रेष्ठांनो देऊन चित्त । ऐका त्यांचें वर्णन ।।४०।। व्यासतीर्थ काशीतीर्थ । मायापुरी तीर्थ विरजकतीर्थ । कृत्तिवास त्र्यंबकेश शिवतीर्थ । वैद्यनाथादि कांचीतीर्थे असती ।।४१।। तदनंतर कैलासनाथतीर्थ । बारा महिन्यांची तीर्थें अद्भुत । मलमास तीर्थही येथ वर्तत । गणेशप्रिय हीं सारीं ।।४२।। देव गणेश्वर तपश्चर्येनें निर्मित । गणेशपूजन मलमासांत । सर्वार्थसाधक निश्चित होत । ऐसें जाणा महेश्वरहो ।।४३।। तदनंतर शैवतीर्थे असत ।

लक्ष्मीतीर्थ सरस्वती तीर्थ । विष्णुकांचीचेंही तीर्थ । कौमारीतीर्थ तदनंतर ।।४४।। वाराहीचें तीर्थ ऐंद्री तीर्थ । वैष्णवी तीर्थ माहेश्वरी तीर्थ । ब्रह्मी तीर्थ रक्तदंता तीर्थ । तदनंतर तीर्थ वसिष्ठाचें ।।४५।। पौलस्य तीर्थ अंगिरस तीर्थ । कण्वतीर्थ जैमिनीचें तीर्थ । मेधातिथि तीर्थ रक्तदंता तीर्थ । तीर्थ त्यापुढे माधांत्याचें ।।४६।। ययातितीर्थ नहुषतीर्थ । ध्रुवतीर्थ भारद्वाजतीर्थ । जामदग्न्य तीर्थ गौतम तीर्थ । तीर्थ तदनंतर पांडवांचें ।।४७।। वरुणतीर्थ मारुततीर्थ । पितृतीर्थ गयातीर्थ । गया गदाधरासवें वसत । तेथे देवी प्रसन्न ।।४८।। उभयतीर निवासी जन । तिजमुळें होती ब्रह्मपरायण । तेथ करितां पिंडदान । ब्रह्मभूत पितामह होती ।।४९।। क्षेत्रकारणें अन्यही पितर । ऋणमुक्त होती सर्व सत्वर । तो भक्त पावे गति थोर । परम ब्रह्मदायक जो ।।५०।। ह्या पुढतीं मुनितीर्थ अपार । त्यांचें वर्णन अशक्य खरोखर । भैरवतीर्थ स्कंदतीर्थ नंतर । नागेश तीर्थ येथ असे ।।५१।। तदनंतर रुद्र तीर्थ । तैसेंचि संस्थित वसुतीर्थ । पार्वती तीर्थ धनपति तीर्थ । साध्यांचें तीर्थ तदनंतर ।।५२।। शक्तितीर्थ महेशांनो असत । दक्षिणतटीं सीमारूप ख्यात । आतां उत्तर तीरावरीं वसत । व्यासतीर्थे अन्यही ।।५३।। व्यासतीर्थासमीप असत । ब्रह्मदेवाचें तीर्थ प्रख्यात । सर्वपापप्रणाशक ज्ञात । महान तीर्थ ब्रह्म्याचें ।।५४।। कर्मतीर्थ अग्नितीर्थ । द्वादश आदित्यांचीं तीर्थे ख्यात । शिवकांची तीर्थ सूर्य तीर्थ । सर्वरोगसंहारक जें ।।५५।। पूर्णाचें पूर्ण भावतीर्थ । ग्रहतीर्थ दिक्पाल तीर्थें अमित । देवयक्ष राक्षसांचीं असत । असंख्य तीर्थें या क्षेत्रांत ।।५६।। महाकालीचें तीर्थ नरसिंहाचें तीर्थ । शाकंभरी तीर्थ चामुंडा तीर्थ । त्रिपुरातीर्थ येथ असत । महामायायुत शक्तितीर्थे ।।५७।। चौसष्ट योगिनींचीं तीर्थें संमत । योगद परदेहजक तीर्थें वर्तत । तदनंतर नैध्रुवतीर्थ देवल तीर्थ । मार्कंडेयतीर्थ त्यानंतर

।।५८।। भैरवतीर्थ काळभैरवतीर्थ । क्रतुमुख्य प्रजापतींचीं तीर्थें असंख्यात । त्यापुढती रैवतकतीर्थ ज्ञात । योगमय जें परम असे ।।५९।। जडभरततीर्थ योग सिद्धिप्रद । ओंकारनादतीर्थ कीर्तिद । विद्याधरतीर्थ कलाप्रद । त्यापुढतीं पैशाच मोचनतीर्थ ।।६०।। तदनंतर धर्मतीर्थ अश्विनीचें तीर्थ । शेष नागादिकांचेंतीर्थ । शंभर तीर्थें हीं यथार्थ । तदनंतर महातीर्थ गाईंचें ।।६१।। त्यापुढती सनकादींचीं तीर्थे । चौदा मनूंची ही सुतीर्थे । महाशक्तीचें अमिताचें ही तीर्थें । दक्षादींची तैसीच ।।६२।। मातृगणांचीं तीर्थे असती । साठ दक्षकन्यांची तीर्थें विलसती । त्यानंतर गंधर्वतीर्थे वर्तती । गुह्यकतीर्थे त्यापुढती ।।६३।। बिभीषणतीर्थ रावण तीर्थ । श्वेतकेतुतीर्थ उद्दालकतीर्थ । राक्षसतीर्थ अष्टावक्रतीर्थ । वैश्वदेवतीर्थ तदनंतर ।।६४।। सनकादींची तीर्थें वर्तत । धीमान दक्षाचें तीर्थ प्रख्यात । मारीच मौद्गलादींची तीर्थे विलसत । त्यानंतर तीर्थें पांडवेशांची ।।६५।। दुर्वासतीर्थ दत्ततीर्थ । विधानतीर्थ हनुमंततीर्थ । सुग्रीवतीर्थ जांबवनतीर्थ । बलितीर्थ तें त्यापुढती ।।६६।। वालखिल्यतीर्थ गालवतीर्थ । विश्वामित्रतीर्थ त्रिशिरसतीर्थ । मृकंडतीर्थ दधीची तीर्थ । किंनरतीर्थ तदनंतर ।।६७।। साध्यतीर्थ कामधेनु अदितीतीर्थ । अमिततीर्थ ईश्वाकुतीर्थ । गार्ग्यतीर्थ मांडूकतीर्थ । धौम्यतीर्थ तदनंतर ।।६८।। वाल्मीकतीर्थ जैमिनीयतीर्थ । वाचक्नवी तीर्थ मंकणकतीर्थ । प्रल्हादतीर्थ दधीचितीर्थ । उपमन्युतीर्थ तदनंतर ।।६९।। वैशंपायनतीर्थ जानकीतीर्थ । पर्वततीर्थ पैलतीर्थ । लोमेशतीर्थ विभांडतीर्थ । ऋष्यशृंगतीर्थ तदनंतर ।।७०।। त्यानंतर मुनिगणांचीं तीर्थें असंख्यात । अश्वत्थामातीर्थ कृपाचार्यतीर्थ । वराहतीर्थ भूमितीर्थ । प्रकृतिपुरुषतीर्थ महापत्यातीर्थ तैसे ।।७१।। सीमेवरी तें असत । ऐसी महेश्वरांनो मुख्य तीर्थें ज्ञात । संक्षेपें कथिलीं तुम्हांप्रत । सेवा ती त्या त्या दिनविशेषीं

।।७२।। मयूरवासी जे जन । त्यांस लाभे करिता पूजन । ह्या सर्व तीर्थाचें विधियुक्त ध्यान । विशिष्ट सिद्धि प्रतिक्षेत्राच्या ।।७३।। मयूरक्षेत्रीं तीर्थे अपार । अंगुष्ठपर्व मात्र तीं सर्व । प्रमाण त्रैलोक्यांत अपूर्व । नाना भेदपर तीर्थे ।।७४।। मयूर क्षेत्रांत सर्व तीर्थें स्थित । अणुमात्र स्वरूपें सतत । येथ जीं जीं क्षेत्रें वसत । तीं न जाती कदापि कोठें ।।७५।। आपापल्या स्थानीं राहून । सेविती तीं द्विरदानन । गाणेशक्षेत्रांत जी तीर्थें महान । तेथ देवही राहती तत्संबंधें ।।७६।। मयूरक्षेत्रीं दर्शनार्थ जाती । गजाननासी सेवितीं । ऐसी ही तीर्थांची महती। संक्षेपें तुम्हां सांगितली ।।७७।। ह्या तीर्थमाहात्म्याचें वाचन । अथवा करील तो श्रवण । तो नर भुक्ति मुक्ति लाभून । अन्ती जाई स्वानंदलोकीं ।।७८।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते ब्रह्मकमंडलुस्थतीर्थवर्णनं नाम सप्तविंशतितमोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय सत्ताविसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । देवेश विचारिती भूशुण्डीप्रत । ह्या तीर्थोत्तमांत जे सिद्धि लाभले जगांत । त्यांचें सांगा सुखद चरित । आम्हांसी येथ संक्षेपें ।।१।। भूशुण्डी तेव्हां देवांस म्हणत । मयूरेशक्षेत्रीं जा तुम्हीं समस्त। माझ्या आज्ञेनुसार त्वरित । तेथ सिद्ध व्हाल सारे ।।२।। सर्व ज्ञान लाभून । सिद्धि सर्वही मिळून । स्कंदपुराणांत विस्तारें शोभन । माहात्म्य कथिलें असे सारें ।।३।। मीं संक्षेपानें कथिलें । क्षेत्रमाहात्म्य अवर्णनीय भलें । देवेशांनी पुनरपि प्रार्थिलें । नित्य यात्रा सांगा आम्हांसी ।।४।। क्षेत्र प्रदक्षिणेची माहिती । अन्य नरांची यात्रा कीर्ती । सर्व सिद्धिप्रद जी जगतीं । ती सांगा कृपा करोनी ।।५।। कोणी जन स्वभावें पापयुक्त ।

मयूरक्षेत्रीं निवास करित । नग्नभैरव त्यांस घालवित । नगराच्या बाहेरी ।।६।। परी संस्कारें समायुक्त । गाणपत्य तो कैसा होत । पुनरपि सन्मान लाभत । या क्षेत्रांत तो कैसा? ।।७।। भ्रूशुण्डी पूर्ववृत्तान्त तैं सांगत । बंगाल प्रांतीं विप्र वसत । गणपतिपरायण अत्यंत । विश्वामित्र कुळांतला ।।८।। त्याचें नांव शंभु असत । महायश तो पुण्यवंत । त्याच्या प्रवेशून हृदयांत । नग्नभैरव बुद्धिभेद करी ।।९।। त्या योगें तो द्विज व्यथित । म्हणे क्षणभंगुर हा देह वर्तत । केव्हां पाहीन मयूरेशा पुनीत । देहधारक मीं अहो ।।१०।। नंतर पत्नी पुत्रासह निघत । घर सोडून यात्रारत । भिक्षा मागून उदर भरित । द्रव्यहीन तो शंभु विप्र ।।११।। दोन महिने मार्ग चालून । पोहोचला जेव्हां तो ब्राह्मण । गणेशतीर्थांच्या तीरीं तैं महान । आनंद झाला हृदयांत ।।१२।। मयूरेशास प्रथम पूजित । तदनंतर यात्रा करी विधानयुक्त । क्षेत्रसंन्यासभावें भजत । द्विरदानना गणेशासी ।।१३।। अन्तीं स्वानंदलोकीं जात । गणनायका नित्य भजत । हृदयांत त्याच्या विराजत । प्रभु गणेश सर्वदा ।।१४।। आतां जे अन्य पापपर । क्षेत्रत्याग करिती ऐसे नर । त्यांचें विचित्र चरित्र । ऐका आतां देवेश हो ।।१५।। वसिष्ठ कुळींचा एक ब्राह्मण वसत । त्या पवित्र मयूरक्षेत्रांत । परी जन्मापासून तो असत । महापापी चौर्यरत ।।१६।। तो न करी कधी वेदाध्ययन । मदोन्मत्त यौवनीं होऊन । मद्यमांसादींचें सेवन । परस्त्रीसंगही प्रिय त्यासी ।।१७।। त्याचा बुद्धिभेद करित । नग्नभैरव तैं तो ब्राह्मण दुर्वृत्त । परस्त्रीस एका पकडून करीत । विदर्भ प्रांतांत प्रयाण ।।१८।। ऐशापरी आधिपत्य करित । नग्नभैरव मयूरक्षेत्रांत । दंडधारक जो सर्व श्रेष्ठ । सत्ता चाले तयाची ।।१९।। दुसरें एक आख्यान । पापी नराचें करितों कथन । मयूरक्षेत्रीं जाण्या इच्छून । जे न तेथे पोहोचले ।।२०।। द्राविडांत वैश्य जन वसत ।

महापापी जे विख्यात । विषादि देऊन ठार मारित । द्रव्यलोभें अन्य जनांसी ।।२१।। शंभु सोमक कुब्ज कंबळ । ऐसे चार मित्र प्रबळ । मद्यमांस रत अमंगळ । परस्त्री लालस सर्वही ते ।।२२।। शिश्नोदर परायण । पुण्य लेशही न मिळवून । स्वधर्मनियम सोडून । स्वच्छंदानें रहात होते ।।२३।। त्याच नगरांत होता वसत । श्यामल नाम वैश्य धनवंत । तो महापापी दैवयोगें मरत । शंकर नामिक मेव्हणा त्याचा ।।२४।। तो शंकर स्वधर्म निरत । पुण्यकर्मपरायण वर्तत । अस्थिसंचय श्यामलाचा करित । उद्धार त्याचा व्हावया ।।२५।। एक मास होता तो वैश्य जात । एकदा जैं तेव्हां भेटत । ते चार वैश्य धूर्त पापरत । तयासी म्हणे विनयानें ।।२६।। हया श्यामल वैश्याच्या अस्थि असत । तुमच्या स्वाधीन मीं करित । त्या न्याव्या मयूरक्षेत्रांत । दंडकारण्यीं जाणार तेव्हां ।।२७।। व्यापार करण्या तेथ निघालात । तरी माझें करा हें प्रार्थित । श्यामलाच्या अस्थि ब्रह्मसुखप्रद गणेशतीर्थात । करा तुम्हीं विसर्जित ।।२८।। तैसेंचि करूं ऐसें सांगून । देऊन तयासी आश्वासन । चार वैश्य ते करिती गमन । मयूरक्षेत्रीं जाण्यासी ।।२९।। तेथ नग्नभैरव विघ्न आणित । त्यांचें सर्वस्व चोर हरित । अस्थिसंचयही नष्ट होत । दु:खें परतले स्वगृहासी ।।३०।। किंचितद्रव्य शेष राहत । तें घेऊन ते परतत । मयूरेश यात्रा न करित । ठरवलेली पापी ते ।।३१।। बुद्धिभेद होऊन त्यांचा न जात । श्यामलाच्या अस्थि मयूरक्षेत्रांत । ऐसा भैरव महाबळवंत । गणेशाज्ञेचें पालन करी ।।३२।। तो रक्षितो क्षेत्र उत्तम। भैरवाचें हें चरित्र मनोरम । जो ऐकेल भावयुक्त परम । त्यास सर्व शुभ मयूरक्षेत्रीं ।।३३।। देवेश पुनरपि प्रार्थित । त्या भ्रूशुंडी योग्याप्रत। ऐसा जो महाभाग नग्नभैरव विख्यात । स्तोत्र त्याचें वर्णावें ।।३४।। त्या स्तोत्रें करितां स्तवन । तो न होईल क्रुद्ध दारुण । बुद्धिभेद आमुचा

न करून । क्षेत्रप्रवेश देईल आम्हां ।।३५।। भ्रूशुण्डी म्हणे ऐका एकचित्त । फलदायक हें अद्भुत । जै नग्नभैरव संतुष्ट होत । पाठ याचा भावें करितां ।।३६।। सर्वमायाविहीनासी । सर्वमायाप्रचालकासी । सर्वांतर्यामीसी नित्यासी । नग्नभैरवा तुला नमन ।।३७।। मयूरेशपरासी मयूरपुरपालकासी। धार्मिकांच्या संरक्षकासी । अधर्मनिरतां दंडकर्त्यासी । नग्नभैरवा नमन तुला ।।३८।। सदा स्वानंद निष्ठासी । पापीजनां दंडकर्त्यासी महाबळवंतासी । ब्रह्मादि प्रचालकासी । नग्नभैरवा नमन तुला ।।३९।। अमेयशक्तिसी भुक्तिमुक्तिप्रदात्यासी । गाणेशांचें पालनकर्त्यासी । प्रलयकाळांत शूळ उगारिसी । ऐशा नग्नभैरवा तुला नमन ।।४०।। त्या प्रलयकाळांत ब्रह्मांड । भिवविसी तूं उदंड । शूळप्रोत महांड । नग्नभैरवा नमन तुला ।।४१।। अट्टाहासें देवेंद्रांसी । तैसेंचि संत्रस्त करिसी असुरांसी । गणनाथापुढें नृत्य करिसी । नग्नभैरवा नमन तुला ।।४२।। तूं हें सर्व विश्व पसरविसी । आदिअंत मध्यगत तूंच अससी । मयूरसंस्थ आम्हां सर्वांसी । रक्षण करी दयाळा ।।४३।। आम्ही अनन्यभावें भजत । शूळधारका तुज नमित । अखिल कारण तूं शाश्वत । जगत्प्रवृत्ती तव भयानें ।।४४।। प्रत्येक प्राणिमात्रास करित । स्वव्यापारमग्न तूं जगांत । तुझ्या आधारें जग नांदत । परेशा रक्षी आम्हांसी ।।४५।। तुझी भक्ति आमुच्या मनांत । दृढ करी तूंच सतत । गणेशक्षेत्र तुझ्या स्वाधीन असत । निवास आम्हां तेथ देई ।।४६।। नग्नभैरवा तुज नमन । पुनः पुन्हा अभिवादन । नग्नभैरवाचें हें स्तोत्र महान । वाचितां ऐकतां शुभप्रद ।।४७।। धनधान्यादिक सर्व लाभत भुक्तिमुक्तिसमन्वित । या स्तोत्रानें जो स्तवित । नग्नभैरव देवासी ।।४८।। या स्तोत्राच्या वाचनें न घडत । मयूरक्षेत्राचा विरह जन्मांत । तयांसी दुर्लभ कांहीं न होत । जैसी श्रद्धा तैसें फळ ।।४९।। ओमिति

श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते नग्नभैरवप्रशंसा नामाष्टाविंशतितमोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय अठ्ठाविसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । भूशुण्डी देवांसी सांगत । द्वारयात्रा निरूपिली तुम्हांप्रत । तीच क्षेत्रप्रदक्षिणा यत्नयुक्त । देवदेवेशांनो करा आतां ।।१।। जेव्हां पुण्यकर्म करण्या इच्छित । त्यासाठीं प्रयत्न करित । तैं पापें फसवितीं विशेषयुक्त । मानवासी हें जाणावें ।।२।। नित्य यात्रा मयूरक्षेत्रवासीयांची । अन्यांचीही सांगतों साची । तीं एकचित्तें ऐकून मनाची । निश्चित तयारी तुम्ही करा ।।३।। मयूरेशास अर्चून । करावें परिवाराचें पूजन । तदनंतर अष्टगणपक्षेत्रपूजन । नदीकुंडासही पूजावें ।।४।। शमी मंदार दूर्वा पूजून । चतुर्थीचेंही आराधन । मुद्गल शुकयोगीशा वंदून । नंतर जावें मंडपांत ।।५।। पूर्वादिक्रमें चार वेद पूजावे । धर्मादिक यथावकाश नम्रत्वें वंदावें । पुनः गणेश्वरासी नमावें । तदनंतर जावें स्वगृहासी ।।६।। ऐसी जो नित्य यात्रा करित । तो गणेशप्रिय होय जगांत । ही नित्ययात्रा न करिता नराप्रत । क्षेत्रवासफळ पूर्ण न लाभे ।।७।। नित्य यात्रा न करित । भैरवी यातना त्यास अन्तीं लाभत । म्हणून नियमानें क्षेत्रस्थित । नरें यात्रा ही करावी ।।८।। आतां गणेश प्रीतिस्तव। अन्य यात्रा अभिनव । संपूर्ण भक्तिदा सर्वथैव । गाणेशी गणपप्रिय सांगतों ।।९।। गर्भागारीं चार दिशांत । विघ्नेश्वर असती स्थित । साठ विश्वेश्वर ते असत । त्यांतील मुख्यांसी पूजावें ।।१०।। दिक्पालांचीं महा अस्त्रें वर्तत । त्या विघ्नेश्वराच्या पुढें विलसत । पांच धनुष्यें अंतरावर गणपरत । सर्वही तीं भक्तिभावें ।।११।। चौदा प्रमाणांत स्थित । सभोवती दिशांत गणप वर्तत । त्यांचें पूजन करितां होत । गाणपत्य नर या

जगीं ।।१२।। बल्लाळ कपिल ढुंढि वक्रतुंड । महोदर हेरंब गणनाथ उदंड । गणनाथ विघ्नेश विघ्नहारक प्रचंड । भालचंद्र शूर्पकर्ण ।।१३।। ज्येष्ठराज गजानन । महोत्कट हे पूर्व दिशेंत प्रसन्न । राहती देवेशांनो त्यांचें पूजन । क्रमशः साधकें करावें ।।१४।। एकेकापासून पंचवीस धनुष्यें दूर । हे गणेशान संस्थित सुंदर । ऐसें जाणावें रहस्य मनोहर । भक्तगणांनी सर्वदा ।।१५।। पन्नास धनुष्यें अंतरावर । दक्षिणस्थ गणप बसले थोर । शंभर धनुष्यें असती दूर । पश्चिमेस गणप असंख्य ।।१६।। पंचाहत्तर धनुष्यें अंतरावर । उत्तरेस गणप असती थोर । ऐशा क्रमानें पूज्य ते समग्र । सिद्धिप्रदायक सर्वही ।।१७।। आतां दक्षिण दिशेस जे असती । त्या गणेश्वरांची सांगतों गणती । ज्ञानेश कर्मप महागणपति । योगेश सिद्धिविघ्नप ।।१८।। चिंतामणि बुद्धीश पूर्णानंद । लक्ष्येश सहजेश एकदंत मोदप्रद । लंबोदर धूर्मवर्ण क्षिप्र प्रसादकर । हे दक्षिणेस गर्भागारीं ।।१९।। आतां करितों वर्णन । पश्चिमेस जे गणेश्वर महान । विनायक विकट शोभन । आशापूरक धूम्रकेतू ।।२०।। प्रमोद मोद सुमुख दुर्मुख । पाशपाणि परेश लाभेश संमुख । धरणीधर मंगलेश सुरेख । मूषकध्वज तेथ असती ।।२१।। देवदेवेशांनो त्यांचें पूजन । करावें पाळून सर्व विधान । आतां उत्तरस्थ विघ्नपांचें वर्णन । भक्तचालकांचें सांगतों ।।२२।। मयूरध्वज राजेश विद्रुमेश्वर । ओंकारेश गुणेश वरद उदार । सिद्धिबुद्धिपति गणेश थोर । चतुर्बाहुधर त्रिनेत्र ।।२३।। गजमस्तक निधिप गजकर्ण । चिंतामणि गणेश्वर विभूषण । ऐसे हे पूजनीय महान । यात्रिकांसी देती इच्छित फल ।।२४।। आतां देवालयांत जे देव स्थित । त्यांची यात्रा तुम्हांस सांगत । मुख्य जी सर्वार्थप्रद पूर्ण वर्तत । यात्राकर्त्या जनांसी ।।२५।। अयोध्या मथुरा द्वारका असत । पूर्वमंदिरीं विलसत । महाविष्णू पूजनीय विशेषयुक्त । देवांनो

तेथ जाणा ।।२६।। काशी माया अवंती । तेथ कैलासवासी शिवाची वसती । गौरी स्कंदासहित भावभक्ती । दक्षिणेस मुख्यत्वें पूज्य ते ।।२७।। महाकाली महालक्ष्मी महासरस्वती । ह्या तीन आदिशक्ति । पश्चिम दिशेस पूजनीय असती । तैसीच विष्णुकांचिका ।।२८।। विधाता अग्नि जडभरत । दिवाकर शिवकांची उत्तरेस मंदिरांत । पूजनीय जनांस वर्तत । ऐसें रहस्य देवागाराचें ।।२९।। ह्या देवागाराची यात्रा करित । त्यास सर्व सिद्धि प्राप्त । हें यात्राविधान तुम्हांप्रत । संक्षेपें मीं निरूपिलें ।।३०।। यात्रा करितां जनांस होत । हें सर्व सिद्धिप्रद सतत । देवांनो जा तेथ त्वरित । मयूरेशाच्या क्षेत्रांत ।।३१।। तेथें भक्तियुक्त राहून । गणेशाचें करा पूजन । त्याचें करितां मनन ध्यान । इच्छित सर्व लाभाल ।।३२।। आदिशक्ति म्हणे अन्य देवींप्रत । ऐसें बोलून भ्रूशुण्डी थांबत । त्याच्यापासून मुख्यदेव घेत । दीक्षा एकाक्षर मंत्राची ।।३३।। विधियुक्त महामंत्र घेऊन । त्या योगीशास प्रणाम करून । प्रदक्षिणा देवासी घालून । ते पांचही देव परतले ।।३४।। ते सर्वही हर्षयुक्त । मयूरेशक्षेत्रीं जात । पुढील कथा रसयुक्त । असे पुढच्या अध्यायीं ।।३५।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते भ्रूशुंडीदेवेंद्रसंवादसमाप्तिवर्णनं नामैकोनत्रिंशत्तमोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय एकोणतिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । आदिशक्ति सांगे तदनंतर । महेशान जाहले भ्रांत फार । मयूरक्षेत्रीं मयूरेश्वर । त्यांना दिसला त्या वेळीं ।।१।। तेव्हां ते स्वानंदरूप गणनायकास । ध्याती भ्रूशुण्डीस ब्रह्मरूपास । ते आठविती गणपप्रियास । पूजिती प्रार्थिती गणेश्वरासी ।।२।। देवेश म्हणती मयूरा

दाखवी । स्वरूप आपुलें सत्वरी । अज्ञान आवरण दूर करी । आम्ही विनत तुझिया पायीं ।।३।। आतां आम्हांस रक्षावें । आम्हां तुझ्याहून अन्य न ठावें । आद्य तत्त्व तूंचि स्वभावें । दया करी दयाळा ।।४।। वेदमुख्य षडंगासहित । गणेशश्वासांतून संभूत । तेथ आले अकस्मात । देवेशांसी ज्ञानदाते ।।५।। त्यांस पाहून तेज:पुंजास । देवसत्तम करिती वंदनास । म्हणती विनम्र वचन तयास । कोण आपण सांगावें ।।६।। अज्ञान आवरणें युक्त । गणेशस्मरणीं आसक्त । आम्हीं असतां या स्थलाप्रत । गणेशानें का पाठविलें ।।७।। वेद तेव्हां त्यांस सांगती । आम्ही वेद षडंगासह प्रीती । आलों आतां सांगा चित्तीं । तुमच्या कोणतें दु:ख असे ।।८।। तेव्हां ते देव वृत्तान्त । वेदांस सांगती समस्त । तो ऐकून वेदमुख्य त्यांस दाखवित । मयूराचें स्वरूप ।।९।। तदनंतर ब्रह्ममय क्षेत्र पाहून । ज्योतिर्मय जें शोभन । सर्वही देव प्रणाम करून । प्रवेश करते जाहले ।।१०।। देवेश ते वेदांसहित । करिती प्रवेश विधियुक्त । वेदाज्ञेनें होऊन हृष्ट । स्थापिती मूर्ती मोरयाची ।।११।। पूजन करून ध्यानपर । विधानें जपती मंत्र थोर । निराहार राहून विघ्नहर । तोषविला त्या देवांनीं ।।१२।। त्या वेळीं ते देवेश स्थापित । ती उत्तम मूर्ति क्षेत्रांत । भाद्रपद शुक्ल चतुर्थीसी असत । समय होता माध्यान्हीचा ।।१३।। सोमवार स्वाति नक्षत्र महान । दैवयोगें शुभकाळ पाहून । शक्तीही परम शोभन । एकवटल्या त्या योगांत ।।१४।। अन्यशक्ति आदिशक्तीप्रत । प्रश्न तेव्हां विचारित । सृष्टिहीन स्थिति जेव्हां असत । मासादिक तेव्हां कैसे आले ।।१५।। हें कुतूहल आमुच्या चित्तांत । तें शमवावें सांप्रत । आदिशक्ति तैं उत्तर देत । ऐका शक्तींनो एकचित्तें ।।१६।। दृश्यभावात्मक काळ होत । युगायुगांत विनष्ट । सदा सर्व ब्रह्यांत । ब्रह्माकार वर्ततसे ।।१७।। कालमानानें विघ्नेश योगनिद्रेंत ।

जेव्हां जग लय पावत । निद्राविहीन तो सृजित । उत्तमोत्तम सृष्टि सारी ।।१८।। ब्रह्मांत ब्रह्मरूप स्थित । काळ तो सदा मंडित । न कळतही जन जे सेवित । गणेशासी पूजिती ध्याती ।।१९।। ते नर होती सिद्धियुक्त। यांत संशय कांहीं नसत । कळत अथवा नकळत । स्पर्शितां अग्निकण जाळितो तसाची ।।२०।। माघ शुक्ल चतुर्थीस। गणेश देई वरदानास । अंगारकयुक्त मुहूर्तास । मूर्तींतून बाहेर प्रकटला ।।२१।। मयूरावर होता स्थित । ऐशा चतुर्भुज ढुंढीस पाहत। सिद्धिबुद्धीसमायुक्त । भालचंद्र महोदरासी ।।२२।। तीननेत्र शेष नाभीवर । चिंतामणिधर उदार । शूर्पकर्ण गजवदन मनोहर । एकदंतें सुशोभित ।।२३।। पाश अंकुश भग्नदन्त धरित । जो आपुल्या हातांत । भूषण वस्त्रांनी विराजित । ऐशा प्रभूस पाहती ।।२४।। तेव्हां उठून माझ्या सहित । त्यास भक्ति भावें वंदित । पूजिती स्तविती मुदितचित्त । ब्रह्मादि ते देवमुख्य ।।२५।। अनादिरूपास मोरवाहनास । निजनाथास सकल अवभासास । मनोवाणीहीनास । मनोवाणीवचस्था नमन ।।२६।। गणनाथा स्तुत्यासी । अनादि पुराणदेवासी । सकलादिपूज्यासी हृदिस्थासी । आनंदप्रदासी नमन असो ।।२७।। परेशासी चतु:प्रचालकासी । परमार्थभूतासी गणनाथासी । आपुल्या बळें जग निर्मिसी । स्तवनीया तुज नमस्कार ।।२८।। स्वबोधगासी जगीं ईशसंस्थासी । विदेहभावें सदा आत्मसंस्थासी । नमितों त्या गणनाथासी । त्यांच्या विहीन स्वसुखप्रलीन ।।२९।। अयोगरूपें निवृत्तिस्थ । निजात्मग योगधर स्वधीस्थ । त्या स्तुत्यास गणनाथास चित्तस्थ । नमितों आम्हीं भक्तीनें ।।३०।। स्वभक्तास शांतिप्रदाता । गजवक्त्रधर शांतिउद्गाता । चतुर्भुज एकरद सिद्धिदाता । त्रिनेत्रधर जो त्यास नमितों ।।३१।। महोदरासी पाशधरासी । बीजासी अमोघवीर्यासी । परात्परासी शूर्पकर्णासी । विभु

गणेशा तुज नमितों ।।३२।। गणनाथासी स्तुत्यासी । नमन सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवरूपासी । पाळक विष्णुरूपें होसी । संहार करिसी शंभुरूपानें ।।३३।। अनाथांच्या नाथासी । शक्तिमंतासी मोहधारकासी । कर्मरूपासी भानूसी । हेरंबासी नमितों आम्हीं ।।३४।। मयूरेशासी देवासी । मयूरध्वज धारकासी । विघ्नेशासी गणनाथासी । महाविघ्नचालका तुज नमितों ।।३५।। ब्रह्माचें तूं ब्रह्मरूप असत । देवादीसही शांति लाभे तुझ्यांत । ऐशा तुज आम्हीं मंदचित्त । कैसे स्तवूं पूर्णपणें ।।३६।। गणेशाना म्हणून नमितों । नाथा विनम्रपणें प्रार्थितों । महाभक्तिप्रिया तुज ध्यातो । तुष्ट होऊन भक्तरक्षण करी ।।३७।। ऐसें स्तवन करून । पुनरपि करिती गणेशास नमन । आनंदाश्रुयुक्त नयन । रोमांच त्यांच्या अंगावरी ।।३८।। त्यांस वरती उठवून । श्रीगणेश बोलती वचन । तुम्हीं रचिलेलें हें स्तोत्र महान । वाचका श्रोत्यासी सर्वद ।।३९।। पुरविन ऐशा नराचें वांच्छित । वर मागा तुम्ही सांप्रत । देईन मीं तपतोषित । स्थापना स्तोत्रें संतुष्ट ।।४०।। देवेश तेव्हां तयास प्रार्थिती । विघ्नेशा जरी संतुष्ट चित्ती । आम्हां वर देण्या कृपामति । दृढभक्ति दे तुझ्यापायीं ।।४१।। तैसेंच आमुचें कार्य सांगावें । स्वानंदानें जें जगीं व्हावें । गणाधीशा आम्हीं करावें । आज्ञापालन ही इच्छा असे ।।४२।। श्रीगणेश तेव्हां त्यांस सांगती । चतुर्मुख ब्रह्मदेवा तूं जगतीं । सृष्टि निर्माण करी सांप्रतीं । रजोयुक्त तूं आता ।।४३।। अहंविवर्जित तूं ब्रह्मा नावें ख्यात । होशिल या त्रिभुवनांत । विष्णु तूं चतुर्भुजयुक्त । सत्त्वयुक्त पालन करी ।।४४।। नाना अवतार घेऊन । माझें नित्य करून स्मरण । सिद्धि पावशील पावन । तुझें कार्य सांगितलें ।।४५।। पंचमुखा शिवा तूं करी प्रहार । ज्ञात जगांत होशील हर । माझें स्मरण करितां बंधहीन सत्वर । तूं होशील निःसंशय ।।४६।। चतुर्भुजें तुं क्रियायुक्त । मोहवी

या जगताप्रत । नानावेदविभागांनी मज पूजित । सिद्धि तुजला लाभेल तैं ।।४७।। शक्तिनामें होशील ख्यात । अनघे तूं सर्व शक्तियुक्त । सहस्रकर सूर्या तू जगांत । कर्माधार होऊनियां ।।४८।। चराचरांचें करी धारण । मज स्मरून हो बंधहीन । ऐसी आज्ञा त्या देवांस करून । विशेष सामर्थ्य प्रदान करी ।।४९।। जैसे संकल्पाची सिद्धि व्हावी । ऐसी बळप्राप्ति बरवी । देऊन तयांसी स्वभावीं । शक्ति नगर आयुधें ।।५०।। तैशीच वाहनादि निर्मून । तीं प्रत्येक मुख्य देवांस अर्पून । त्या मूर्तीत प्रवेशून । गजानन अन्तर्धान पावले ।।५१।। मुख्य देव तदनंतर जात । आपापल्या स्थानांप्रत । चराचर जग ते निर्मित । यथाभाग क्रीडा करिती ।।५२।। तेथ जे मुख्यरूप जगांत । देव प्रजापति मुखांतून उद्धूत। त्यास महेश ते पाठवित । मयूरेशाच्या सेवेसाठीं ।।५३।। ते गणेशाचें ध्यान करिती । मयूरक्षेत्रीं वर लाभती । आपापलीं कार्यें पार पाडिती। आपुल्या पदीं राहून ।।५४।। ऐशा क्रमें सर्व चराचरमय । मयूरेशास आराधिती नित्य । त्यायोगें सत्तायुक्त सुखमय । होऊन धन्य जाहले ।।५५।। तदनंतर सर्वांगभावें सेविती । मयूरेशासी परम प्रीती । क्षेत्रवासपर ते होती । देवींनो ते सर्व देव ।।५६।। शंकर त्या मयूरक्षेत्रांत । पुनरपि उग्र तप आचरित । गणेशवरदान लाभत । त्यायोगें महादेव जाहला तो ।।५७।। हें मयूरक्षेत्राचें महिमान । देवींनो सांगितलें मीं प्रसन्न । सर्व सिद्धिप्रद जें महान । ऐकतां वाचितां पुरुषार्थलाभ ।।५८।। धर्म अर्थ काम मोक्ष लाभत । अन्तीं ब्रह्ममय तो होत । जो हें माहात्म्य वाचून दाखवित । अन्य भाविकांसी श्रद्धेनें ।।५९।। यासम पावन त्रिभुवनांत । अन्य कांहींही नसत । वेदशास्त्र पुराणांत । सारांतलें हें सार असे ।।६०।। जो हें माहात्म्य ऐकेल । तो पुत्रपौत्रें युक्त होईल । सर्वही इच्छित लाभेल । अपुत्रास गुणवंत पुत्रलाभ ।।६१।। सर्वभावें

व्रतें करित । त्यास शतपट पुण्य लाभत । तीर्थें क्षेत्रमुख्यें सेवित । त्यांसी पुण्य शताधिक त्याहून ।।६२।। वेदशास्त्र पुराणें ऐकून । नरास लाभे जें फळ महान । त्याहून अधिक पुण्य लाभून । धन्य होतसे साधक ।।६३।। बहुत काय सांगूं मात । यासदृश साधन अन्य न पुनीत । सत्य हें त्रिवार उक्त । ऐसें तुम्हीं जाणावें ।।६४।। जेथ साक्षात ब्रह्मपति । स्वानंदवाचक क्षेत्र जगतीं । कमंडलू नदी वाहे त्वरितगति । त्यासम अन्य काय असणार? ।।६५।। ब्रह्मभूयादिक ख्यात । वेदादींत हें माहात्म्य अद्भुत । त्याची समता जगांत । शक्तींनो अन्या अधिक लाभेल कैसी ।।६६।। जो प्राणी नित्य भक्तियुक्त । हें माहात्म्य श्रद्धेनें वाचित । तो प्रत्यक्ष गणेशरूप होत । त्याच्या दर्शनें दुःखें हरती ।।६७।। अथवा शुक्ल कृष्ण चतुर्थीस । जो करी याच्या वाचनास । त्याच्या घेती जें दर्शनास । तेही पवित्र नर होती ।।६८।। जो संस्कारहीन न वाचित । अथवा हें कदापि न ऐकत । तो सदा पुण्यवंचित । दुःखी होईल निःसंशय ।।६९।। हें महिमान भक्तिहीन नराप्रत । युक्त न सांगावें जगांत । शठ पापयुक्त जे पाखंड निरत । त्यांना हें न सांगावें ।।७०।। जे विघ्नेश्वरास भावें भजती । त्यांना कैसी जन्मगती । विघ्नभयें त्यासी नसती । म्हणोनि भजा गणेशासी ।।७१।। सत्पात्र नर पाहून वाचन । करावें या चरित्राचें पावन । जो भक्तियुक्त असेल जन । तो यास न निंदील ।।७२।। देवींनो सर्व सार सांगितलें । सर्वप्रद जें परम भलें । तेथ जाऊन गणेशातें सेविलें । पाहिजे तुम्हीं भक्तियुक्त ।।७३।। तरीच देह धारणेचें फळ लाभेल । सार्थक जीवनाचें होईल । अन्यथा पतिततुल्य व्हाल । यांत संशय कांहीं नसे ।।७४।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते मयूरेशक्षेत्रमाहात्म्यसमाप्तिवर्णनं नाम त्रिंशत्तमोऽध्यायः समाप्तः ।

श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय तिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । शक्ती म्हणती आदिशक्तीप्रत । जगदंबिके आम्ही भाग्यवंत । म्हणोनि ऐकिलें माहात्म्य अद्भुत । मयूरक्षेत्राचें सिद्धिप्रद ।।१।। आतां देवेशि सांग आम्हांप्रत । मुद्गलें ज्यास उपदेशिलें ज्ञान पुनीत । ते शिवादि देव काय करित । कामासुरभयें संत्रस्त ।।२।। आदिशक्ति सांगे तयांसी । महाभाग मुद्गल जातां स्वगृहासी । योग्यांच्या गुरूस प्रणामासी । करून गेले देव तेव्हां ।।३।। मयूरक्षेत्रीं जाऊन । यात्रा करिती यथाशास्त्र विधान । सुरर्षि नंतर करिती भजन । सर्वही ते तपयुक्त ।।४।। एकाक्षरविधानें तोषविती । ते देव ऋषि विनायका भावभक्ति । तेव्हां त्यांसी वर देण्या प्रकटती । ढुंढिवेषें गजानन ।।५।। मयूरावरी आरूढ । पाहून विघ्नेश्वरासी प्रगूढ । देवर्षी करिती प्रणाम प्ररूढ । महाहर्ष चित्तांत ।।६।। परम भक्तीनें वंदून । विघ्नपा भावबळें पूजून । विष्णुमुख्य त्याचें करिती मनन । करांजली जोडूनियां ।।७।। मयूरेशासी सर्वसिद्धिप्रदासी । ज्ञानदात्यासी भक्तपालासी । स्वानंदवासीसी परात्परतरासी । ढुंढिराजा तुज नमन असो ।।८।। सर्वांच्या मातापित्यासी । अनादीसी सर्वांस पूज्यासी । परमात्म्यासी अनंतरूपासी । अनंत आननधरा नमन तुला ।।९।। सिद्धिबुद्धि प्रदात्यासी । सिद्धिबुद्धिवरासी । ज्येष्ठराजासी ज्येष्ठांस वरदासी । त्रिनेत्रा तुज नमन असो ।।१०।। चतुर्भुजासी कंजपाणीसी । महोदरासी सर्पेशवासीसी । मायाश्रयासी मायाचालकासी । विलासीसी तुज नमन असो ।।११।। ब्रह्माच्या ब्रह्मरूपासी । गणेशासी एकदंतासी । सर्वादि पूज्यासी सर्व मूर्तीसी । शूर्पकर्णा तुज नमन असो ।।१२।। योगासी शांतिदासी ।

पूर्वांगीं विष्णुरूपासी । दक्षिणांगीं शंकररूपासी । पश्चिमेस शक्तिदेहा नमन तुला ।।१३।। उत्तरेस भानुरूपासी । किती स्तुति करावी अशक्य आम्हांसी । वेद योगीही धरिती मौनासी । तेथ आमुचा काय पाड? ।।१४।। चित्त पंचविध असत । देवदेवेशा भ्रमात्मिका माया वर्तत । चित्रा मयूरसंज्ञा ती ज्ञात । हे तिच्या स्वामी वंदन तुजला ।।१५।। माया मयूराख्याच्या असत । तेथ क्रीडाकर्ता तूं जगांत । म्हणोनि मयूरेशनामें प्रख्यात । साक्षात् दिससी निःसंशय ।।१६।। तुझ्या अंघ्रीचें झालें दर्शन । धन्य जन्म धन्य ज्ञान । धन्य तप विद्यार्जन । आम्हीं झालों कृतकृत्य ।।१७।। ऐसी तयाची स्तुति करिती । प्रेमभरें ते नाचती । नयनांतून त्यांच्या वाहती । आनंदाश्रू त्या समयीं ।।१८।। शरीरीं रोमांच दाटले । जय मयुरेश ऐसे वदले। तेव्हां गणनाथ त्यांस म्हणाले । भक्तितुष्ट परम प्रसन्न ।।१९।। देवेशांनो मी प्रसन्न । मागा आतां वरदान । जें जें मागाल तें तें देईन । स्तोत्रतुष्ट मीं तुम्हांसी ।।२०।। तुम्हीं रचिलेलें हें स्तोत्र। मज आवडलें पवित्र । सर्वसिद्धिप्रद सर्वत्र । होईल पाठका श्रोत्यासी ।।२१।। पाठक श्रोता जें जें इच्छित । तें तें सर्व त्यास लाभत । ऐसा वर हर्षयुक्त । देतसें मीं त्या नरासी ।।२२।। देवेशादि तेव्हां म्हणत। गणाध्यक्षा नमन तुजप्रत । प्रसन्न जरी आम्हांवर सांप्रत । दृढ भक्ति तुझी सतत देई ।।२३।। कामासुराचा वध करावा । भयंकर जो असे सर्वां । स्थानभ्रष्ट केलें देवां । कर्मभ्रष्ट त्यानें मुनीश्वरांसी ।।२४।। म्हणून त्या असुराचें हनन । करी गजानना तूं बलसंपन्न । तथास्तु म्हणून अन्तर्धान । पावले तेव्हां गणनाथ ।।२५।। देव हर्षयुक्त होऊन । परतले वरदान लाभून । गिरिगुहांत बसले लपून । गणेशाच्या भजनीं रत ।।२६।। मुनि देवनायक शक्तिसहित । योग्य काळाची वाट पहात । तदनंतर कामासुर सभेंत । एकदा बैसला होता तैं ।।२७।। आकाशवाणी तो

ऐकत । भयदायक अत्यंत । कामासुरा ऐक वृत्तान्त । देवांनी प्रार्थिला मयूरेश्वर ।।२८।। तो ब्रह्म असे साक्षात । तुज ठार मारील निश्चित । त्यायोगें विश्व सुखयुक्त । करील विघ्नराजा तो ।।२९।। ही आकाशवाणी ऐकत । तैं तो असुर पडला मूर्च्छित । ती वाणी महाक्रूर अन्य दैत्यांप्रत । भयंकर ते सर्व आत्मे ।।३०।। महासुराजवळीं ते येती। महायत्नें त्यास सावध करिती । तैं तो कामासुर तयांप्रती । सांगे वृत्त आकाशवाणीचें ।।३१।। तें जाणून क्रोधपर । दैत्यवीर करिती विचार। देव आद्य शत्रू भयंकर । आमुचे ऐसें श्रुति सांगे ।।३२।। आम्हीं स्वामी आपणांसी । केलें होतें निवेदनासी । मारावें सर्व देवांसी । त्यांनी हें कृत्य दारुण केलें । ।।३३।। तरी आतां चिंता कां करिता । आपणा कैसी भयवार्ता । उत्पत्ति स्थिति संहारयुक्ता । अशक्य असे मारणें तुम्हां ।।३४।। महाभागा आम्हां आज्ञा द्यावी । देवहननाची संधि द्यावी । देव मरतां अनुभवावी । नि:सपत्न अवस्था सदा ।।३५।। त्यांचें ऐकून वचन। कामासुरें संमति देऊन । आज्ञापिलें करा देवकंदन । महा असुर तैं आनंदले ।।३६।। कुंभकर्णादि वीर जाती । गिरिकंदरीं काननीं शोधिती । मेरूगुहासंस्थ पाहती । देव ऋषिवृंदास तेव्हां ।।३७।। त्यांस ठार मारण्या टाकित । शस्त्रें ते दैत्य जयोद्यत । शिव मुख्य देव तैं स्मरत। मयूरेशासी भयभीत ।।३८।। दयासिंधो देवा यावें । आम्हां भयग्रस्तांस रक्षावें । त्यांनीं स्मरण करितां भक्तिभावें । धावला हेरंब मूषकध्वज ।।३९।। मयूरावर बैसून । शस्त्रधर प्रकटला प्रसन्न। तेजोराशिमय रूप तें पाहून । विस्मित देव स्तुति गाती ।।४०।। नाना स्तोत्रें ते म्हणती। गजानन तेज:पुंज त्यासी म्हणती । सुरर्षिजनहो मीं विकट जगतीं । भजा मजसी चिरकाल ।।४१।। कामयुक्त माया मयूरा। विविधात्मिका मीं रचिली रुचिरा । कामहीन मीं मज स्मरा । भजा

तुम्हीं कामनाशार्थ ।।४२।। मायासुखें देवेशांनो व्हाल । विकट तरी मज प्रिय विमल । माझें रूप अति सबल । पाहण्या समर्थ व्हाल तुम्हीं ।।४३।। त्याचें तें ऐकून वचन । सुरर्षि ते शोकमग्न । बळें चित्तनिरोध करून । निष्काम करिती आदरें ।।४४।। तेव्हां ते देव मुनि पाहत । गणेश्वरासी पुढ्यांत । त्यास प्रणाम करून स्थित । दैत्यशस्त्रें विद्ध ते ।।४५।। अति क्रोधपर तैं विकट सांगत । भयहीन व्हा आतां चित्तांत। माझ्या दर्शनें संरक्षणयुक्त । मुक्त तुम्हीं सर्वही ।।४६।। माझा अनुग्रह तुम्हांवरी । शस्त्रें घेऊनिया करी । जावें तुम्हीं युद्ध क्षेत्रीं । मी वधीन त्या कामासुरासी ।।४७।। हें आश्वासन लाभत । तेव्हां ते देवेंद्र शस्त्रयुक्त। दैत्यमुख्यांसवें लढत । तेजयुक्त विशेष ते ।।४८।। इंद्रे वज्राघात केला। तेव्हां कुंभकर्ण रणीं पडला । अन्य दैत्यसंघ भयभीत झाला । पळ काढिला तयानें ।।४९।। तो कुंभकर्ण राक्षसेश लाभत । दोन मुहूर्त जाता शुद्धि त्वरित । सावध होता तोही भयभीत । पळून गेला रणांतुनी ।।५०।। त्या वेळीं जय लाभून । देव गेले परतून । विकटास हर्षभरें प्रणाम करून। जयजयकारें स्तवन करिती ।।५१।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते विकटप्रादुर्भावो नाम एकत्रिंशत्तमोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय एकतिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । शक्ति आदि शक्तीस । विचारिती प्रश्न एक सुरस । जरी नव्हता देव ऋषींच्या चित्तास । काम कांहीं तैं उरला ।।१।। तरी ते कामासुराचा वध वांछित । हा काम तैं निष्काम कैसे असत । तें ऐकून आदिशक्ति सांगत । सांगते भेद दोन्ही मार्गींचा ।।२।। सकाम मार्ग निष्काम मार्ग । सांगतें ऐका भेद ज्ञानग । संशयच्छेद होऊन

मु. पु. खंड. ६ अ. ३१-३२

मग । चित्त तुमचें शमेल ।।३।। स्वदेहपोषणासाठीं यशासाठीं । कामसंयुक्त भावयुक्त चित्तीं । देवांस जे नर भजती । ते सकाम जाणावे ।।४।। स्वस्वधर्म पालनार्थ करिती । देव सेवेस्तव कर्मे जगती । ते देवांसी निष्काम भजती । परम भाव धरूनियां ।।५।। देवांनी जी केली भक्ति । ती नि:कामिकाच होती । ती कशी तें सांप्रती । प्रिय शक्तींनो ऐकावें ।।६।। त्या नि:काम भक्तीचें चिन्ह । हित कामनेनें सांगेन पावन । सृष्टिस्थितिलयार्थ विनतमन । ब्रह्मादिदेव कर्मपर ।।७।। ते गजाननासी म्हणती । आम्ही जीं कर्मे करितों जगतीं । ती तुझी सेवा निश्चिती । क्रीडा तुझीच ती असे ।।८।। सर्वांच्या हृदयांत राहून । भोग भोगसी तूं दोषविहीन । म्हणोनि ती सेवा पावन । देहपोषिक तुझीच ।।९।। तुझ्या प्रीतिस्तव करित । आनंदें स्वधर्मकार्यें समस्त । सृष्टि आदि क्रिया तव तोषार्थ । म्हणोनि करितों ही प्रार्थना ।।१०।। दैत्यमुख्यानें त्या सांप्रत । सेवा तुझी केली खंडित । ती सेवा करण्या असमर्थ । उत्सुक असूनही आम्हीं सारे ।।११।। ऐसी प्रार्थना करित । देवसंघ विकट देवाप्रत । देहभोगादि भावांत । यशाची स्पृहा त्यांना होती ।।१२।। स्वधर्मसंयुत करिती । जे जे शरीरव्यापार जगतीं । ढुंढिप्रीत्यर्थ मानिती । तरी त्या क्रिया निष्काम ।।१३।। आतां देवींनो सांप्रत । ऐका विकटाचें विशेष चरित । जें ऐकतां भक्ति लाभत । श्रोत्यासी तैसी उद्गात्यासी ।।१४।। कुंभकर्णादी सर्व जाती । कामासुराप्रती भयभीत चित्तीं । महावीरास त्या निवेदिती । घडला सर्व वृत्तान्त ।।१५।। मयूरेश विकट नामें ख्यात । आला असे देवप्रार्थित । तो वधील महासुरांसी निश्चित । ऐसी आशंका वाटतसे ।।१६।। त्या विकटाचा दृष्टिनिपात । देवांसी तेजयुक्त करित । आम्हीं तेजविहीन समस्त । महामते हें आश्चर्य वाटे ।।१७।। आतां विकटासी जावें शरण । हेंचि शुभद आपणा शोभन । अन्यथा असुरसंघ

विनाश अशोभन । अटळ वाटे आम्हांसी ।।१८।। कुंभकर्णाचें ऐकून वचन । झाले असुर क्रोधमग्न । निर्भत्सना त्याची करून । सर्वांसमक्ष बोलती ।।१९।। ऐसा विकल होऊन । कां बोलसी भ्रांत वचन । कामासुराचा वेग सहन । करील ऐसा कोण असे ।।२०।। बळीचें वचन ऐकून । प्रतापी कामासुर बोले विषाद मन । आकाशवाणी सत्य होऊन । आला माझा शत्रु येथ ।।२१।। आता मारीन किंवा मरेन । त्याची चिंता न करी माझें मन । कामासुराचा निश्चय ऐकून । दुर्मद असुर बोले त्यासी ।।२२।। तेजस्वी वीर्ययुक्त वचन । कुंभकर्णे पाहिला विकट म्हणून । उत्पत्तिनाशयुक्त जाण । अन्यथा कैसे दर्शन झालें ।।२३।। जें जें होतसे दृष्ट । तें तें होतसे विनष्ट । ऐसें वेदवचन इष्ट । मनीं आण महामते ।।२४।। तेव्हां महाराजा कामासुरा तुजसी । कैसा मारील तुज वरयुक्तासी । चिंता सोडी राजेंद्रा तयासी । आम्ही मारु नि:संशय ।।२५।। शत्रूस वधून यासम विजयवंत । होऊं आम्हीं निश्चयें जगांत । आज्ञा द्यावी महादैत्यांप्रत । तुझ्या चरणाचे किंकर जे ।।२६।। पहा आमुचें महावीर्य रणांत । देवांचा नाश जें करील त्वरित । देवांनी माया केली अद्भुत । आकाशवाणी करविली ।।२७।। भयरूपिणी आकाशवाणी करून । दैत्य राक्षसा भिववून । देव साधू पाहती स्वइच्छित पूर्ण । विचार करी बुद्धिमंता ।।२८।। ही आकाशवाणी नसत । देहधारी कैसा मारील तुज जगांत । तूं महाबळी प्रतापवंत । चिंता कशाची आतां तुजला ।।२९।। दुर्मदाचें ऐकून वचन । बळी आदि महाक्रूर आनंदून । त्यास म्हणती तुझें भाषण । सर्वथैव सत्य असे ।।३०।। तदनंतर कामासुर । जमवून सर्व असुरवीर । चतुरंग बळें युक्त शूर । गजाननाशी लढण्या गेला ।।३१।। शुक्रानें नंतर दैत्येंद्रास । बोध केला अति सुरस । विविध गोष्टी तयांस । सांगे तेव्हां उपदेशपर ।।३२।।

परी मदोत्सिक्त बळगर्वे मोहित फार । न ऐके वचन जें सांगे शुक्र । मायामोहप्रभावें ।।३३।। मुनिमुख्य तो शुक्राचार्य जाणत । भावी काळवेग निश्चित । त्याचा निरोप घेऊन जात । परी कामासुर मानेना ।।३४।। दैत्य क्रोधयुक्त प्रहर्षित । युद्ध करण्या अति उत्कंठित । देवांचें मर्दन करण्या जात । जेथ ते पूर्वी राहिले होते ।।३५।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते देवदैत्यसमागमो नाम द्वात्रिंशत्तमोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय बत्तिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । आदिशक्ति म्हणे अन्य देवींप्रत । देवेश आतुर सैन्य पाहत । अपार नाना शस्त्रे युक्त । तैं ते गेले गणेशाजवळीं ।।१।। देवेश म्हणती तयाप्रत । आला असे कामासुर साक्षात । महाबळ तो त्याच्या पुढ्यांत । देव वाटती मशकासम ।।२।। ज्याचें शस्त्रबळ अमोघ असत । कोणी त्याच्या सम न जगांत । तैसा कामासुर अद्वितीय उद्यत । वध करण्या देवांचा ।।३।। आतां कामासुरें संत्रस्त । आम्हीं जाहलों देव समस्त । रक्षण करी आमुचें सांप्रत । अन्यथा संकट अटळ असे ।।४।। तूं जरी आम्हां न राखशील । तो कामासुर येथ वधील । देवर्षीसी निश्चित या वेळ । विकटा तूं गणेशा ।।५।। त्यांचें तें ऐकून भयभीत वचन । गजानन देई आश्वासन । भय बाळगू नका उन्मन । प्राज्ञांनो महासुरास वधिन मीं ।।६।। माझ्या अनुग्रहें समर्थ समस्त । व्हाल यांत संशय नसत । दानवांसह लढा निश्चित । संरक्षण तुमचें करिन मीं ।।७।। विकटाचें ऐकून वचन । देव झाले मनीं प्रसन्न । गर्जना करिती भय सोडून । शक्तींनो ते शस्त्रधारी ।।८।। त्यांच्या गर्जनाशब्दें व्याप्त । दिगंतर तेव्हां होत । दैत्य जाहले भयभीत । जे आले होते रणांगणीं ।।९।।

परी धीर धरून मानसांत । क्रोधावेशें दैत्येश गर्जत । बळिमुख्य सिंहनाद करित । शंखनादही त्यासमयीं ।।१०।। दैत्यगण तदनंतर सोडित । शस्त्रवृष्टि मेघासम अविरत । पर्वत वृष्टिधारांनी मेघ ताडित । तैसे देवांवरी बाणांनी ।।११।। देव आपल्या शस्त्रांनी निवारिती । असुरांची शस्त्रे लावून शक्ती । दैत्य देव महा उग्र ते लढती । परस्परांशी त्या वेळीं ।।१२।। कोण आपुला कोण पर । याचाही बोध न होय सुरासुर । लढतां उडाली धूळ अपार । तेणें सूर्य झाकळला ।।१३।। देवासुर परस्परांशी वधिती । वापरून शस्त्रास्त्रें अति शक्ति । मर्मभेदी घाव घालिती । रक्ताची नदी वाहत होती ।।१४।। ती रक्तनदी वेगानें वाहत। त्यांत धूळ बसूनही शांत । ऐसें एक दिवस युद्ध अत्यंत । महाघोर चाले अहोरात्र ।।१५।। देव आणि दैत्य लढत । परस्पर जयोद्यत । देवांचा नंतर जय होत । दैत्य मुख्यांस वधिती ते ।।१६।। दैत्य मुख्य पळून गेले । तें पाहून कामास आश्चर्य वाटलें । दैत्येंद्र क्रोधें जळू लागले । बळि मुख्य उतरले रणमंडपीं ।।१७।। त्यांनी शस्त्रास्त्रबळें वधिले । देवांचें सैन्य जर्जर केलें । अमरसंघ तैं पळाले । भयभीत होऊन दशदिशांत ।।१८।। तदनंतर इंद्र रणांगणांत । धैर्यशाली लढण्या येत । कोपप्रभावें तो वधित । बळि असुरासी वज्राघातें ।।१९।। देव तेव्हां हर्षयुक्त । घनघोर गर्जना करित । कुंभकर्ण हाणी महेंद्रा त्वरित । हृदयावरी मुष्टिघातें ।।२०।। इंद्र भूतलावर पडला । मुष्टिघातें त्या मूर्च्छित झाला । महाबळ विष्णु सरसावला । रणभूमींत त्या वेळीं ।।२१।। सुदर्शन चक्र त्यानें सोडिलें । त्याच्या तीक्ष्ण धारेनें वधिलें । असंख्य दैत्य तेव्हां केलें । रावणें तेथें आगमन ।।२२।। क्रोधरक्त तो रणोद्यत । गदेनें विष्णू त्यास हाणित । त्यायोगें तो होत मूर्च्छित । कुंभकर्णासही ताडिलें त्यानें ।।२३।। त्या समयीं दुर्मदक असुर धावत । शंकासुरही

सहाय्या येत । महाविष्णूस मारण्या जात । केशव व्याकुळ तेधवां ।।२४।। शंकर स्वत: त्रिशूलधर । वेगें गेला उग्ररूपधर । सूर्यदेवही सत्वर । रणांगणीं उतरला ।।२५।। भानूने करून गदाघात । दुर्मद असुर पाडिला मूर्च्छित । तो मुखांतून रक्त ओकित । रणभूमीवरी असहाय ।।२६।। शंकर त्रिशूलानें मारित । शंकासुरासी पाडवित । धरापृष्ठीं तो मूर्च्छित । विष्णूसही उत्साह चढला ।।२७।। तदनंतर तो चक्र सोडित। महिष असुरा करी मूर्च्छित । दैत्य दानव सारे पळत । शुक्राचार्यास शरण जाती ।।२८।। देवांचा जय होत । असुर धारातीर्थी मृत । तें पाहून दैत्यमुख्यांस जीवित । करी प्रयत्नें शुक्रमुनी ।।२९।। तेवढ्यांत महाकाली तेथ येत । त्या शुक्राचार्यास धरून नेत । गुहेमध्यें बंदिस्त करित । संजीवन असुरांचें बंद झालें ।।३०।। तदनंतर कामासुर शोकयुक्त । दैत्य निश्वास सोडी प्रतापवंत । परी धैर्य धरून लढण्या निघत । स्वयें देवांविरुद्ध ।।३१।। ताता तुम्हीं थांबा सदनांत । आम्हीं तुमचे उभय सुत । जाऊं सत्वर रणांगणांत। मारूं महारिपू विघ्नपा नि:संदेह ।।३२।। ऐसें बोलून ते उभय सुत। महावीर रणस्थळीं जात। शंकर विष्णु देवांसी तेथ म्हणत । उत्कट क्रोधें त्या वेळीं ।।३३।। शोषण म्हणे महादेवाप्रत । थांब दुष्टा पहा सांप्रत । माझें अपूर्व पौरुष जगांत। ठार मारीन मीं तुजला ।।३४।। दैत्यगणांस तूं मारिलें । त्याचें प्रायश्चित्त पाहिजे घेतलें । शिव असशी तूं तुजला शोभलें । अरण्यरुदन शिवेसमान ।।३५।। वृद्ध कोल्हीण रानांत । जैसी आनंदे राहत । तैसा पशुतुल्य तूं वनांत । राहण्या योग्य सर्वथा ।।३६।। ऐसें जरी न करशील । माझ्या हस्तें मरशील। श्रीशंकर ऐकून वचन तें दुर्बल । म्हणती त्या शोषणासुरासी ।।३७।। अरे तूं कैसा सामर्थ्ययुत । तें पाहीन मीं त्वरित । दाखव आपुलें पौरुष

समस्त । विकटाहुनी विकट मीं ।।३८।। हें ऐकतां महाबाहू सोडित। बाण भयंकर देवांवरी क्रोध युक्त । देवगण पडले मूर्च्छित । शंकर त्वेषें लढतसे ।।३९।। तो असुर करी शरसंधान । शंकरावरी करी दुर्मन । शंकरें त्रिशूलाघात करून । शोषणास रणीं पाडियलें ।।४०।। परी क्षणभरांत सावध होऊन । शंभूस कोपानें धरून । महापर्वती गरगरा फिरवून । शिखरीं फेकले तयासी ।।४१।। तेव्हां हर्षभरें जयजयकार। दैत्य करिती समग्र । विष्णूजवळीं जात दुष्पूर असुर । रागावून म्हणे सुरेश्वरासी ।।४२।। तो महाबाहू अत्यंत गर्वित । म्हणे विष्णू तूं मदमत्त। मज न जाणसी दुर्वृत्त । दुर्मती तूं दुष्ट असती ।।४३।। तूं महावीर दैत्यनायक। रणांत मारिलेस असंख्य । आतां त्याचें फळ निःशंक। भोग आतां माझ्या करीं ।।४४।। देवानुयायांचा साहाय्य असती । आतां माझ्या हस्तें यमगृहा जासी । त्याचें तें वचन ऐकून तयासी । केशव म्हणे क्रोधानें ।।४५।। त्या दैत्यपुत्रासी गर्वयुक्तासी । श्रीविष्णु म्हणे महावीरासी । तूं काय हें अघटित वदसी । पाप्या तुज मीं ठार करीन ।।४६।। कामासुराच्या पाठिंब्यानें चित्तांत । दैत्यजा गर्व नको धरूं उन्मत्त। ऐसें बजावून विष्णु हाणित । गदेनें त्या दुष्पूरासी ।।४७।। त्या गदाघातें अति विह्वल । तो दुष्पूर दैत्य पडला खल । धरणीतळावरी तात्काळ । शुद्ध हरपली तयाची ।।४८।। नंतर शस्त्रवृष्टि सुरवर । करिती त्या असुरावर । तोही सावध होऊन तयांवर । बाण सोडी त्वेषानें ।।४९।। शंभर बाण सूर्यावर सोडित । बाणशतें इंद्रास ताडित । तैशाच बाणें व्याकुळ करित । यम वायू ब्रह्मासी ।।५०।। तेव्हां सावधान राहून। विष्णूनें चक्र सोडून । त्या दुष्पूरासुरा विद्ध करून । मूर्च्छित केलें रणभूवरी ।।५१।। परी पुनरपि जाग येऊन । तो विष्णूस करी ताडन । हजारों बाण सोडून । अति त्वेषानें तयावरी ।।५२।। ऐसें

भयंकर कर्म करित । दुष्पूर तैसा शोषण बळवंत । शक्तींनो तेव्हां जयप्रभाव युत । दैत्येंद्र स्तविती त्या नेत्यांसी ।।५३।। ते दैत्यराजाचे दोन सुत । रणांगणीं शौर्य गाजवित । बळिमुख्य दैत्येंद्र प्रमुदित । प्रशंसिती म्हणोनी ।।५४।। तदनंतर देवगणास मारण्या धावती । तेव्हां क्रुद्ध झाले गणपति । द्विरदानन तो पाश सोडिती । अंकुश ही फेकिती गजानन ।।५५।। गजाननाचा पाश कंठांत । शोषणाच्या गुंडाळत । श्वास कोंडून तो पडत । रणांगणांत बेशुद्ध ।।५६।। हात पाय आपटित । तत्क्षणीं झाला मृत । अंकुश सहसा उदरांत । घुसला दुष्पूर असुराच्या ।।५७।। तो दुष्पूरही दैत्यराक्षसांसमोर । मरून पडला अति उग्र । तदनंतर पाश अंकुश रणमंडळावर । हाहाःकार उडविती ।।५८।। गजाननाची शस्त्रें संचार करिती । अनेक दैत्यांसी वधिती । बळिमुख्य दानव तैं पळून जाती । लाज सारी सोडून ।।५९।। शस्त्रहीन ते दशदिशांत। जेव्हां पळाले भयभीत । तेव्हां पाशांकुश पुनरपि परतत । गणेशाच्या हातांत ।।६०।। ते पाहून अमरगण । उठला पुनरपि आनंदून। बळसंपन्न होऊन । दुःख विसरला क्षणांत ।।६१।। ते देव समस्त स्तविती । विकट देवासी अतिप्रीतीं । दैत्य शोकाकुल करिती । रुदन दाही दिशांत ।।६२।। अद्यापि कामासुर रणांत । आला नव्हता बळवंत। त्याचे वर्णन पुढिल अध्यायांत । अति सुरस वाचावें ।।६३।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते कामासुरपुत्रवधो नाम त्रयस्त्रिंशत्तमोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु।

(अध्याय तेहतिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । कांहीं छिन्नांग असुर । जाऊन वदती समग्र । वृत्तान्त सारा दुःखकर । महाबळी कामासुरासी ।।१।। महाराज काय

राजभवनांत । कैंसे स्वस्थ तुम्ही बसलात । तुमचे दोन्ही पुत्र मृत । रणांगणीं पडले असती ।।२।। आतां शरण जावें त्वरित । त्या विघ्नपदेवा सांप्रत । अन्यथा दैत्यकुळाचा निश्चित । समूळ नाश ओढवेल ।।३।। ऐसें त्यांचें भयभीत वचन । ऐकून मूर्च्छित झाला उन्मन । त्यास दैत्य करिती सावधान । भयसंकुल ते सारे ।।४।। तेव्हां होऊन शोकसंतप्त । देवांसी मारण्या इच्छित । शस्त्रें घेऊनिया अगणित । रथारूढ तैं झाला ।।५।। उरली सुरली सेना घेऊन । कामासुर गेला चाल करून । जेथें होता विकट गजानन । रणभूवरी महावीर ।।६।। त्या रुद्रावतार कामासुरा पाहून । भयभीत झाले देव विषण्णमन । ते विकटासी बोलती वचन । स्वामी आला कामासुर ।।७।। तो महायश स्वयं रणांत । अवतरलासे बळासहित । गणनाथा तूं सांप्रत । जें करायचें तें करी ।।८।। तेव्हां विकट क्रोधयुक्त । बोले देवांसी वचन उत्साहयुक्त। भयहीन होऊन लढा रणांत । माझा अनुग्रह तुम्हांवरी ।।९।। त्याचें ऐकतां समाश्वासन। शंभु विष्णु मुख्य देव प्रसन्न । उत्साहित मनीं होऊन । गर्जना करिती बहुविध तैं ।।१०।। घनगर्जनेसम त्यांची गर्जना । घुमली साऱ्या गगनांत जयभावना । शस्त्रास्त्रें घेऊन करण्या सामना । गेले सारे महेशादी ।।११।। त्यांस दैत्य नायक म्हणत। अत्यंत क्रोधें तो जळत । देवनिषूदन वचन उन्मत्त । म्हणे ऐकारे देवांनो ।।१२।। शंभो विष्णू अन्य देवेशांनो सांप्रत । ऐका सारे एकचित्त । माझे पुत्र वधून साधलेत । वैर तुम्हीं सर्वांनी ।।१३।। मी यापूर्वी स्नेहभावें न वधिलें । दयाभावें रक्षिलें । सुरेश्वरा त्याचें मज लाभलें। पुत्रशोकरूपें आज फळ ।।१४।। सुरांनो तुम्हीं अपकार । केलात घेऊन उपकार । आतां माझा क्रोध अनिवार । वधीन तुम्हां समस्तांसी ।।१५।। देवेंद्रसत्तमांनो विकटासी । मारीन तैसें मुनींसी । ऐसें बोलून धनुष्यासी।

बाण लाविला दैत्येंद्रें ।।१६।। तेव्हां धैर्यभाव धरून । शंकर तयासी बोले वचन । महादैत्या पूर्वी आमुचे धन । सारें तूं हरून नेलें ।।१७।। धर्मनाश करून पीडित । केलेंस त्रैलोक्य दु:खित । त्याचें फळ निश्चित। मिळालें तुजला जाण हें ।।१८।। विकटकृपेनें तुज वधीन । खलोत्तमा हें निश्चित जाण । ऐकून तें शिवाचें वचन । संतप्त झाला कामासुर ।।१९।। गदा घेऊन करांत । शंकरासी तो ताडित । त्या गदाघातें पाडित। शंकरासी रणांगणीं ।।२०।। शंकरास विव्हल मूर्च्छित । पाहतां केशव चक्र सोडित । कामासुरावरी चालून जात । परी तें निष्फळ जाहलें ।।२१।। तेव्हां क्रोधें ज्वलंत । धनुष्य आपुलें सरसावित । कामासुर महाबाण वर्षत । घन जैंसे पर्जन्य ।।२२।। त्या बाणांनी देवमुख्य रणांत। छिन्नांग पडले मूर्च्छित । बलहीन ते समस्त । बळिमुख्य दानवा जोर चढला ।।२३।। ते दुर्मद दानव वधिती । महायोद्धे देवांसी छळिती । विष्णूची बाणगती । तेव्हां पडली कामासुरदेहीं ।।२४।। तोही बाण उग्र सोडित । गरुडध्वजासी करी मूर्च्छित । त्यासमयीं सावध होत । शंकर पुनरपि त्वेषानें ।।२५।। कामासुर त्यास ताडित । खड्गाचा आघात करित । परी जराही न हालत । संहारक शिव तेव्हां ।।२६।। त्या अंतरीं विष्णू होत जागृत । तोही पळे रणांत । भानू रावणासी ताडीत। शराघातें त्या वेळीं ।।२७।। दुर्मदासही तो विद्ध करित । ते दोन्ही असुर मूर्च्छित । महिष कुंभकर्ण रावण होत । विष्णु चक्राघातें बेशुद्ध ।।२८।। बळि दानवही मूर्च्छित । जेव्हां पडला रणांत । तेव्हां गोविंद वधित । असंख्य दानवां शौर्यानें ।।२९।। हाहा:कार करून । असुर धावती भयभीत मन । दशदिशांत तें अघटित पाहून । कामासुरा आश्चर्य वाटे ।।३०।। अत्यंत क्रोधयुक्त होऊन । आपटी महेशातें स्वकरीं धरून । विष्णूसही देत फेकून । महापर्वताच्या शिखरावरी ।।३१।। सूर्यास

धरणींत दडपिलें । तेव्हां देव भयातुर झाले । हाहा:कार ध्वनीनें दाटलें। सर्व रणांगण त्या समयीं ।।३२।। ते छिन्नभिन्न अंगें धावत । कामासुरबाणें हत । दैत्येंद्राचें बळ पाहून हर्षित । विकट तेव्हां स्वयें जाई ।।३३।। मूषकावरी तो बैसला । संग्राम करण्या उद्युक्त झाला। त्यास पाहून कामासुर वदला । महाप्रतापी उन्मत्त ।।३४।। क्रोधें आरक्त त्याचे नयन । म्हणे मयूरेशा तूं अज्ञान । माझ्यासवें लढण्या येऊन । मरण आपुलें निश्चित केलें ।।३५।। तूं उंदरावरी बैसलास । मूषकासम बळयुक्त खास । माझ्या महावीर पुत्रांस । वधिलेंस तूं कपटानें ।।३६।। आतां मीं पुत्रशोकें संतप्त । वधीन तुज मूषकासहित । देवांनी तुज प्रार्थिलें विनत । काय माझें अहित करिसी ।।३७।। माझ्या केवळ भ्रूभंगानें कंपित । सारें चराचर क्षणांत । उत्पत्ति सिथतिसंहारयुक्त । जे जे असती त्रिभुवनीं ।।३८।। त्यांपासून मज भय नसत । तूं तर देहधारी प्रत्यक्षांत गणाध्यक्षा मूर्खासम सांप्रत । अविचारें लढण्या येसी ।।३९।। अज्ञानें जरी तूं युक्त । तरी आज मरशील निश्चित । कामासुराचें वचन ऐकत। तेव्हां गणपति हंसूं लागला ।।४०।। त्या गर्वयुक्त कामासुराप्रत । म्हणे मूर्ख तूंच जगांत । मी विकट असे अद्भुत । जन्ममृत्यूविहीन ।।४१।। महाबळा माझा वध । कैसा करशील तूं निर्बुद्ध । सृष्टिस्थितिसंहारकर्ता निर्वेध । दैत्यपुंगवा मीच असे ।।४२।। जरी तुज जीविताची आशा । तरी शरण ये दैत्येशा । अन्यथा पापकर्म्या हताशा । वधीन तुज निःसंशय ।।४३।। गर्व सोड महामूर्खा मी वर्तत । ब्रह्म परम आद्यन्तवर्जित । शुक्रें तुज कथिलें समस्त । रहस्य परी न ऐकलेंस ।।४४।। तूं मूर्खभावें अव्हेरिला । शुक्रगुरूचा उपदेश भला । अद्यापि जाणून मजला । शरण येई महा असुरा ।।४५।। विकटाचें ऐकून वचन । कामासुर क्रोधें संतप्तमन । धावला गदा घेऊन । दारुण आघात करितसे ।।४६।। ती

गदा निष्प्रभ पडत । धरणीतलावरी अकस्मात । दैत्यराज झाला मुर्च्छित। एका प्रहरें सावध झाला ।।४७।। तेव्हां तो महाक्रूर अनुभवित । अति दारुण पीडा सर्वांगांत । अशक्त झाला अत्यंत । विचार करी स्वमानसीं ।।४८।। अहो शस्त्रावांचून मजप्रत । विकटें कैसा केला आघात । शक्तिहीन झालों अत्यंत । युद्ध कैसें करूं आतां ।।४९।। शुक्रानें जैसें कथिलें । तें सारें सत्य जाहलें । ब्रह्मरूप हें अवतरलें । विकटरूप गजानन ।।५०।। तथापि देव पक्षपाती । कैसा ब्रह्म हा गणपति । म्हणोनि संशय मम चित्तीं । शरण यासी न जाईन ।।५१।। मी मरेन रणांगणांत। तेच कीर्तिवर्धक निश्चित । शत्रूंस शरण जाणें नसत । योग्य कदापि वीरासी ।।५२।। ऐसा विचार करून । म्हणे मी जाईन याच क्षण । विकटासी विचारीन । प्रश्न माझा हा अद्भुत ।।५३।। जरी देवांचा पक्ष सोडशील । तरी मीं शरण तुज सबल । अन्यथा युद्धांत होईल । निर्णय आपुल्या बळाचा ।।५४।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते कामासुरविचारवर्णनं नाम चतुस्त्रिंशत्तमोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय चौतिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । आदिशक्ति अन्य शक्तींस सांगत । कामासुर जाई विकटाप्रत । त्यास म्हणे भयसंयुक्त । हितकारक वचन ऐसें ।।१।। विकटा तूं प्राज्ञा ब्रह्म साक्षात । तुज नसावा पक्षपात मनांत । परी सुर असुरांतून दोघांत । सुरांचा पक्ष कां घेसी ।।२।। तूं विकट ब्रह्म वेदांत । जरी जन्मादिहीन भावें वर्णित । तरी कैसा देहधारक दिसत । हें सर्व रहस्य सांग मजला ।।३।। तुज यथार्थ जाणून । तरीच येईन तुज शरण । नाथा येईन प्रसन्नमन । अन्यथा नाहीं नमणार ।।४।। विकट

तेव्हां त्यास सांगत । माया नाना विध असत । मी त्या मायेस धारण करित । क्रीडा करितों बहु प्रकारें ।।५।। तिच्या आधारें भेद करून। मज मयूरेश अभिधान । माया शब्द मयूरनिदर्शन । करी ऐसें वदति तत्त्वज्ञ ।।६।। त्या मायेचा स्वामी जगांत । मयूरेश ऐसें जाण मनांत । नानाभेदमय जें ब्रह्म वर्तत । त्यास असद्रूप बुध म्हणती ।।७।। उत्पत्तिस्थितिसंहारयुक्त । असद्ब्रह्म प्रदर्शित । परी अमृतमय ब्रह्म वर्तत । भेदविवर्जित सर्वकाळ ।।८।। तेंच विकट सत्यत्वें असत । तोच मी गजानन तुझ्या पुढयांत । सदा अखंडमय जें ज्ञात । त्यास जन्ममृत्यू भय कैसे।।९।। तें साक्षिरूप ब्रह्म ख्यात । चारविहीन चारयुक्त । अमृतसंज्ञ विकट उदात्त । भेदाभेदातीत तें ।।१०।। सर्वांचें जीवनाधार ब्रह्म । विकट तेचि परम । त्यास भज तूं निष्काम । मृत्युहीन तरी होशील ।।११।। सिद्धि भ्रांतिकर्ती ज्ञात । बुद्धि ती भ्रांतिधारक असत । त्यांचा स्वामी गणेश उदात्त । विचार करी हा हृदयांत ।१२।। दैत्या पंचविध चित्त । पंचधा भ्रांति वर्तत । भ्रांतियुक्त महाचित्त । त्याग त्याचा करी तूं ।।१३।। चिंतामणीसी तू भजावें । सर्वांच्या चित्तांत बरवें । स्थान माझें जाणावें । मत्प्रीत्यर्थ प्रयत्न करी ।।१४।। महामते मीं देहधारी होउन । भक्तांस शांति देत महान । माया माझी ही जाण । संप्रज्ञात नराकार मीं ।।१५।। असंप्रज्ञात्मक शिर असत । त्यांच्या योगे देहधारी गज होत । म्हणून गजवक्त्र मी दिसत । व्यावहारिक जनांसी ।।१६।। परी योगिजनांस मीं वर्तत । स्वसंवेद्य स्वानंदवासविराजित । मायाक्रीडार्थ रचित । आनंदरूप मी विविधवर्ण ।।१७।। विश्व स्वधर्मयुक्त । त्यांत मीं नित्य राही चित्तांत । देव असुर सारे माझ्यात । सामावले भिन्न न कांहीं ।।१८।। परी धर्मरक्षणार्थ वधित । सर्वांसी मी संशयरहित । स्वर्गांत देवांसी स्थापित । नरांसी या पृथ्वीवरी

।।१९।। असुरांस पाताळ विवरांत । स्थान त्रिविध विश्वांत । जेव्हां देव लोभयुक्त होत । असुरांवरी हल्ला करिती ।।२०।। महा असुरांसी मारण्या उद्युक्त । विष्णुप्रमुख देव लोभें होत । उत्सुक ते क्रोधयुक्त। तेव्हां मी प्रेरक दैत्यांसी ।।२१।। त्यांच्या हृदयांत विराजत । त्यांना तपाची प्रेरणा देत। त्यायोगें करी सामर्थ्ययुत । देवांसवें लढण्यासी ।।२२।। त्यासमयीं मी विघ्न आणित । देवसंघाच्या मार्गांत । दैत्यांचें विघ्न हरण करित । विघ्नकर्ता विघ्नहर्ता मीच ।।२३।। त्यायोगें दैत्येंद्रांचा जय होत । देव होती पराजित । असुर जेव्हां त्यांसी ताडित। तेव्हां वनवासी ते होती ।।२४।। माझ्या इच्छेनें हें न घडत । देवांची कर्मे त्यांस नडत । तैसेचि दैत्य होतां मदयुक्त । कर्मनाश करिती ते ।।२५।। देवांचे मूळ उच्छेदिती । महादुष्ट असुर पीडिती । सरळ सात्त्विक जनांसी जगतीं । तेव्हां देवपक्षपाती मी ।।२६।। देवांस बलशाली करित । ते दैत्य नायकांसी वधित । दैत्यांचीं छिद्रें दाखवित। देवांच्या हृदयीं प्रवेशून ।।२७।। ब्रह्मादि देवांस अजिंक्य होत । दैत्य जेव्हां मदोन्मत्त । त्यांचा वध करण्या न शक्त । तेव्हां देह मीं धारण करी ।।२८।। असुरांचें करी हनन क्षणांत । ऐसें रहस्य जाण तूं मनात। जेव्हां देवदैत्य उभय वर्तत । स्वधर्मानें स्वनीतीनें ।।२९।। तेव्हां त्यांच्या हृदयात । सर्वांच्या मी विलसत । सर्व विश्व सौख्यें नांदत । मीं न पीडी कोणासही ।।३०।। अरे धर्मलोपका तूं पीडिलेंस । बळदर्पें समस्त देवगणांस । वरप्रभावें माजलास । म्हणून देवपक्षपाती मीं ।।३१।। आलों तुजला मारण्यास । महादुष्टा जरी न नमलास । माझा अवमान करण्यास । प्रयत्न जरी तूं करिशी ।।३२।। तरी मी तुझें करीन हनन। परी वैर जरी देशील सोडून । देवांचें तरी तुज जीवन । वरदान रूपें देईन मीं ।।३३।। ऐसें बोलून विकट थांबत । तेव्हां कामासुर चित्तांत।

प्रसन्नपणे विचार करित । भक्तिगौरव मनीं आणी ।।३४।। म्हणे हा विकट संशयातीत । सुरासुरांचा आधार सतत । हा पूर्ण ब्रह्म साक्षात। यास शरण मी जाईन ।।३५।। कामासुर ऐसा विचार करित । निश्चय करूनियां मनांत । आपुलें शस्त्रादिक टाकून देत । दोन्ही कर जोडी विकटापुढें ।।३६।। प्रणाम करी तयास । हर्षभरित चित्तें पूजनास । करूनिया विघ्नपास । संतोषवी तो स्तवन करुनी ।।३७।। कामासुर स्तोत्र गात । विकटा गणेशा नमन तुजप्रत । परमात्म्या सर्वपूज्या मी विनत । सर्वेशा तुज अभिवादन ।।३८।। देवासुरमयासी । अनंत मायायुक्तासी । ब्रह्मभूतस्वरूपासी । गजानना तुज नमन असो ।।३९।। हेरंबासी देवेशासी । शूर्पकर्णासी विघ्नचालकासी । भक्तांचे विघ्नहर्त्यासी। अभक्तविनाशका तुज नमन ।।४०।। स्वानंदवासीसी योगाकारस्वरूपासी । योग्यांसी शांतिदात्यासी । योगेशासी अनामयासी । सर्वादिपूज्या तुला नमन ।।४१।। ज्येष्ठरूपासी ज्येष्ठांस पददात्यासी । ज्येष्ठ राजासी गणपतीसी । सिद्धिबुद्धिप्रदात्यासी । सिद्धिबुद्धिविहारा तुज नमन ।।४२।। सिद्धिबुद्धिस्वरूपासी । त्रिनेत्रासी चतुर्बाहु धरासी । लंबोदरासी ब्रह्मेशासी । ब्रह्मपतीसी नमन असो ।।४३।। देवांच्या पालकासी । दैत्यांसी वरदात्यासी । सर्वासी समभावासी । ढुंढिराजा तुला नमन ।।४४।। विष्णुपुत्रासी शंभूसी । शक्तिपुत्रासी काश्यपासी। वरेण्यसुता सर्वांच्या मातापित्यासी । किती स्तवूं मीं तुजला ।।४५।। योगींद्रमुख्य जेथ थकले । वेदादीही मूक झाले । तेथ माझें काय चाले। मंदबुद्धी मीं काय स्तवूं ।।४६।। मायासुख भ्रांतिप्रद । विशेषें भुलवी जें सौख्यद । प्राणिमात्र सोडितां तें मोहद । भक्तीनें दृढ तुज प्राप्त करी ।।४७।। अशांत मायेनें युक्त । सदा चित्त भ्रांतियुत । विकटांत शांति पावत । म्हणून विकट नांव तुझें ।।४८।। ऐसी स्तुति तो कामासुर

करित। तैं रोमांच अंगावरी उठत । तो भावभक्तीनें नाचत । कंठ त्याचा रुद्ध झाला ।।४९।। त्याचें मन भक्तियुक्त । पाहून विकट त्यास म्हणत। वर माग कामासुरा मी तुष्ट । सारें मनोवांच्छित पुरवीन ।।५०।। मी येथ क्रोधयुक्त । आलों वध करण्या तुझा निश्चित । परी आतां तूं शरणागत । म्हणोनि तुज न मारीन ।।५१।। तूं केलेलें हें स्तोत्र असत। अत्यंत प्रियतम मजप्रत । सर्वकामप्रद पुनीत । पाठकां वाचकां उभयतांसी ।।५२।। प्रथम ऐहिक ऐश्वर्य मिळून । अन्तीं स्वानंदलाभ महान । सुखमय होईल जीवन । ह्या स्तोत्राचे पाठ करितां ।।५३।। ऐसें गणपतीचें वाक्य ऐकून । कामासुर करी वंदन । हर्षसंयुक्त करी स्तवन । म्हणे प्रसन्न जरी तूं मजवरी ।।५४।। तरी तुझी भक्ति उत्तम । दृढ करी मच्चित्तीं अनुपम । स्थानादिक मज मनोरम । देई तेथें राहीन मीं ।।५५।। त्या जागीं निवास करून । देवा मी सतत करीन भजन । गाणपत्यप्रियत्व पावन । देई नित्य गजानना ।।५६।। याहून अन्य न मीं याचित । योगींद्रमुख्यांसही दुर्लभ जगांत । ऐसें तुझें दर्शन साक्षात । दिव्य चरण पाहिले तुझें ।।५७।। तुझे पद सुदुर्लभ असत । हें मज कळलें रहस्य अद्भुत । त्यांचें वचन ऐकून म्हणत । भक्तवत्सल विकट देव ।।५८।। गणेश कामुका कामासुरास । विकट बोले महाभक्तास । महासुरा तुझ्या चित्तास । दृढ भक्ति माझी लाभेल ।।५९।। गाणपत्यप्रिय तूं होशील । योगपरायण सदा अमल । पूर्ववत् आपुल्या स्थानीं राहशील । पीडा देई अभक्त नरांसी ।।६०।। जेथ नसे माझें स्मरण । न करिती जे नर पूजन । त्या सर्व कार्यांत कामा तू दारुण । प्रभाव दाखवी आपुला ।।६१।। तेथ आसुरस्वभावें । तूं सारें कर्मफळ भोगावें । परी माझ्या भक्तांसी न करावें । तूं कधींही सकाम ।।६२।। ऐसें ऐकून गणेशाचें वचन । तैसेंचि मी वागेन । ऐसें त्यासी प्रार्थून । महायशें कामें

वंदिलें तयासी ।।६३।। तेव्हां गणेश स्वस्थाना जात । भक्तिकामुक जो शाश्वत । कामासुरास शांत पाहून परतत । महिषादिक असुर स्वस्थानीं ।।६४।। ते कामासुरास त्यागिती । आपापल्या सदनीं जाती। हा दैत्येंद्र बिघडला म्हणती । लागला भजनीं विकटाच्या ।।६५।।

ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते कामासुरशांतिवर्णनं नाम पंचत्रिंशत्तमोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय पस्तिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । आदिशक्ति म्हणे शक्तींसी । पाहून महाशांतियुक्त कामासुरासी । सुरर्षींच्या चित्तासी । विस्मय फार जाहला ।।१।। विकटास पूजून ते जोडिती । आपुले कर ते भावभक्ती । देव ऋषि त्यास विनविती । स्तोत्र उत्तम गाऊनिया ।।२।। जन्म रहित प्राचीन अव्यय । सदा आत्मरूप सकलावभासमय । असद्विहीन विविध अंतरस्थ सदय । त्या विकटा परेशा भजतो आम्हीं ।।३।। जयासी आदिमध्य अन्त नाहीं । सुजीवन जें जीवनधर्मधारवाही । सदा अमृत ब्रह्मविकारहीन प्रत्यहीं । माया विकटा परेशा भजतों आम्हीं ।।४।। आपणच स्वबिंबापासून । माया रचून देई स्वयं प्रसन्न । जीवन बिंबवीर्य ती करी तैं पूजन । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।५।। जैसें असद्रूपमय सांख्य रचित । तैसेंच ब्रह्म सुबोधरूपयुक्त । अनंतभेदाश्रित अप्रमेय सतत । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।६।। तदनंतर स्वबोधानें सोऽहंकृत । आदिरूप पवित्र एकाश्रित । जगत्धर बिंदुमय पुनीत । त्या परेशा विकटा भजतों आम्ही ।।७।। चतुष्पादमय जें जगत । व्यष्टी समष्टीनें जें युग निर्मित । अजात संजीवनप्रद गणेश असत । त्या परेशा

विकटा भजतों आम्हीं ।।८।। नाथा भेदविहीनभावें संतत । जग हें सारें तूं पसरवित । प्रकाशरूप अनंत लीला करित । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।९।। अजन्मा अससी तूं गजानन । तथापि सर्वत्र तुझें होत दर्शन । भक्तीनें गम्य विकट नामें संपन्न । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।१०।। विष्णुस्वरूपें ह्या जगा रक्षिसी । विनायका रजोगुणें सृजिसी । तमोयुक्ततेनें ह्यास संहारिसी । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।११।। कर्मे सारी निर्मून । संजीवनरुपें त्यांचें नियमन । क्रियास्वरुपें शक्तिसंपन्न । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।१२।। आत्मरुपें ढुंढिराजा सदा । विश्वंभरा विश्वमूर्ते सौख्यदा । तुज जगीं प्रवेश कैसा मोहदा । त्या विकटा परेशा भजतों आम्हीं ।।१३।। सर्वदा आदिपूज्य सकल वंदित । गणेश सिध्दिप्रद आसमंतांत । सुचित्तभास कर्माधार वर्तत । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।१४।। स्वानंद नाम नगरांत । जो त्रिनेत्रयुक्त सुस्थित । मूषकवाहन महोदर विभूप एकदंत । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।१५।। विराजे जो स्वभक्तपक्षांत । असे विघ्नविहीन मनेप्सित । अभक्ताचें सर्वस्व नष्ट करित । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।१६।। नियंतृरुपें तुझ्या करांत । नानाविध ब्रह्मीं तैसें जगांत । महाअंकुश ऐसा एकला धरित । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।१७।। भ्रमात्मक जें एक बंधन । तो परशु तुझ्या करीं विराजमान । करिसी हनन स्वभक्तांचें बंधन । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।१८।। जे सर्वदा तुझा आश्रय घेत । त्यांना सत्वर अभय दावित । तुज त्यागिती दुष्ट ते भय पावत । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।१९।। निजामृत विघ्नपातें जें अन्न । सर्वत्र जगांत असे पावन। तें मोदक प्रतीकानें हस्तग मोदकर शोभन । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।२०।। सर्वगता विभिन्न असन्मयी ।

परी ती माया तुझ्यांत शांतिमयी । म्हणोनि जन विकट म्हणती विनयी । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।२१।। आम्हीं अल्पमति काय स्तवित । जेथ निगमादिक झाले असमर्थ । शुकादींसही स्तवनातीत । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।२२।। तथापि तुझ्या दर्शनानें प्राप्त। बोध ब्रह्मेशा जो आम्हांप्रत । त्यानें रचिलें दीनपाला हो संतुष्ट । त्या परेशा विकटा भजतों आम्हीं ।।२३।। आदिशक्ति नंतर सांगत । ऐशी स्तुति करुन विकटाप्रत । प्रणाम घालिती साष्टांग विनत । सर्व सुरर्षी नाचती ।।२४।। तेव्हां महादेवींनो तो विकट । सर्वेश भक्तियंत्रित । देवर्षींना त्या भक्तवात्सल्यें म्हणत । भक्तिसंयुतांसी प्रभू ।।२५।। देवांनों मुनिसत्तमांनो सांप्रत । वर मागा जो असेल इच्छित । स्तोत्रें संतुष्ट मीं तो त्वरित । देईन तुम्हां भक्तियुक्तांसी ।।२६।। हें तुम्हीं रचिलेलें स्तोत्र मत्पदप्रद । होईल पाठका वाचका सुखद । भुक्तिमुक्तिप्रद पुत्रपौत्रद। धनधान्यादिक काम पुरवी ।।२७।। षट्कर्म साधनकर । परकृत्य विनाशक थोर । सेवकांसी नाना रोगहर । पूर्णानंदप्रदायक ।।२८।। जे असतील कारावासांत । त्यांची सुटका होईल त्वरित । सहस्रावर्तन जरी करित । तरी सौभाग्य वाढेल ।।२९।। नाना पापसमूहांचें दाहक। वाचनें सर्व सिध्दिप्रदायक । होईल निःसंशय सुखकारक । स्तोत्र हें सर्वदा सर्वकाळ ।।३०।। निरंतर प्रतिदिवस वाचील । स्तोत्र हें एकवीस वेळा विमल । त्याचे सर्व काम पूर्ण होतील । एकवीस दिवस क्रमें वाचितां ।।३१।। ऐसें विकटाचें वाक्य ऐकून । देवर्षि उत्तम करिती वंदन । शक्तींनो ते म्हणती वचन । विनयनम्र भक्तीनें ।।३२।। गजानना कामासुरास शांत । महावीरास तूं केलेंस सांप्रत । तें पाहून कृत्य अद्भुत। संतुष्ट झालों सर्व आम्हीं ।।३३।। आतां द्विजादिक कर्मपर । देव स्वपदीं स्थिर । स्वधर्मयुक्त जन उदार । होतील आतां जगांत ।।३४।। वरदानें

जें साधणार । तें तें आधींच मोदकर । होतां इच्छित पूर्ण सत्वर । आणखी काय मागावें ।।३५।। परी आतां एकचि मागणें । स्थिर भक्तीचें द्यावें लेणें । कामभय नष्ट होय जेणें । तथाऽस्तु म्हणे विकट तेव्हां ।।३६।। विकट अन्तर्धान पावला । देवर्षीस खेद झाला । देवाचा विरह कोणाला। दुःखद होणार नाहीं जगीं? ।।३७।। तदनंतर मुनिगणाहस्तें स्थापित। विकटमूर्ति देव मुदित । आनंददायक मूर्ति प्रख्यात । हिमाचलप्रांतीं तें स्थान ।।३८।। वायुदिशेंत तेथ विलसत । विकटाचें तें स्थान पुनीत। महादेवींनो सर्वसिद्धि देत । पूजकांसी सर्वदा ।।३९।। देवऋषि मूर्ति स्थापून । पूजा यथाविधि करून । आपापल्या स्थानीं जाऊन । पुनरपि परतले क्षेत्रांत या ।।४०।। अंशानें आपुल्या अधिकारक्षेत्रांत । राहती देवर्षी कार्यरत । पूर्ण भावें त्या क्षेत्रांत । राहून भजती विकटासी ।।४१।। चौकोनी तें महाक्षेत्र । दशयोजनें त्याचा विस्तार सर्वत्र । तेथ मध्यभागीं पवित्र । साक्षात् विकट विलसत असे ।।४२।। चार दिशांत चार देव। शंभु विष्णु शक्ति सूर्य अभिनव । अन्य देव भूषविती वामभाग अपूर्व। उजव्या बाजूस मुनिजन ।।४३।। क्षेत्रयुक्त तीर्थ पश्चिमेस । पुढ्यांत भक्तजन सेवेस । उपस्थित मूषक वाहक त्यास । स्थापिती तेव्हां देवगण ।।४४।। वामांगीं सिद्धि वसत। दक्षिणांगीं बुद्धि सेवित । ब्रह्मप्रिय गण सर्व स्थित । शस्त्रधर विकटप्रिय ।।४५।। तेथ विकटतीर्थ विख्यात। त्यांत स्नानमात्रें ईप्सित । लाभती प्राणिमात्र त्वरित । अन्तीं मुक्ति लाभतसे ।।४६।। स्वानंदांत मिळे स्थान। ऐसें हें विकटप्रिय तीर्थ पावन। त्रैलोक्यांत विश्रुत महान । ऐसा पूर्ववृत्तान्त हा ।।४७।। अन्यही तीर्थमुख्यें वसत । देवर्षीच्या समंतात । विकटक्षेत्रीं जीं स्नानकर्मे होत। सुखप्रद भक्तांसी ।।४८।। अन्य देवांचें जे नर भक्त । मृत्यु पावतील या क्षेत्रांत । तेही विकटाच्या लोकीं जात । हें निश्चित जाणावें ।।४९।।

तेथ भोग अमित भोगिती । अन्तीं स्वानंदांत लय पावती । विकटदर्शनानें होती । ब्रह्मभूत ते सारे ।।५०।। भाद्रपद शुक्ल चतुर्थी तिथी । त्या दिनीं मूर्ति स्थापिती । विकटाची म्हणोनि जगतीं । ती तिथि मुख्यत्व पावली ।।५१।। त्या तिथीस महोत्सव करिती । प्रतिवार्षिक भावभक्ती । माध्यान्ह काळीं पूजिती । सर्वसिद्धिप्रदायकासी ।।५२।। स्वल्प सिद्धिद आद्य हें व्रत । जाणावें शास्त्रसंमत । धन्य ते लोक जगांत। जे पाहती विकटासी ।।५३।। ते कृतकृत्य होत । ऐसें वचन वेदांदीत। तेथ देवर्षी नाना वसत । क्षेत्रांत भजती जे विकटासी ।।५४।। नित्य हर्षयुक्त मनें भजती । विकटाचीं चरित्रें वर्णिती । आनंदाश्रू नयनीं दाटती। रोमांच उठती अंगावरी ।।५५।। नरदेह अपूर्व लाभून । विकटाचें दर्शन न घेती जें जन । त्यांचें निष्फळ असे जीवन । पशुतुल्यस्वभाव ते ।।५६।। ऐसें हे क्षेत्रसंभव महिमान । कथिलें संक्षेपें पावन । जरी वर्णीन विस्तारें करून । तरी अयुत वर्षेंही न पुरतील ।।५७।। वर्षकोटी जरी वर्णिती । अन्य देवमुख्य योगी जगती । तरी तेही समर्थ न होती । विकटक्षेत्र वर्णन करण्या ।।५८।। ऐसे नाना अवतार घेत । धर्मधर प्रभु चराचर रक्षित । कलांशानें विकट श्रेष्ठ । देवींनों हें रहस्य जाणा ।।५९।। हें विकटाचें महिमान । जो वाचील करील श्रवण । त्यास सर्व ऐहिक फळ लाभून । अंतीं ब्रह्ममय तो होईल ।।६०।। त्यास कामासुराचें भय न बाधत । कामहीन स्वभावें होत । विशेष सुखद काम लाभत । ऐसें माहात्म्य विकटाचें ।।६१।। ऐशापरी कामास वश करून । शांत करी त्यास गजानन । विकट गणेश हें पावन । कथानक तुम्हां सांगितलें ।।६२।। आतां आणखी काय ऐकण्यास । इच्छा असे तुमच्या चित्तास । तें सांगा तुम्हीं मज या समयास । पुरवीन तुमची मन:कामना ।।६३।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे

विकटचरिते विकटावतारचरितसमाप्तिवर्णनं नाम षट्‌त्रिंशत्तमोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय छत्तिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । अन्य शक्ति आदिशक्तीस प्रार्थिती । विकट माहात्म्य ऐकलें भावभक्तीं । त्यायोगें विशेष हर्ष चित्तीं । योगामृत मय वाटला आम्हां ।।१।। तथापि देवि न तृप्त । आमुचें संपूर्णतया चित्त । रसवर्धक कथा ऐकण्या अविरत । उत्सुक आमुचें अंतःकरण ।।२।। पुनरपि विघ्नेश्वराची कथा । सांगून करी दूर व्यथा । विकट जे अन्य अवतार घेत । त्यांची कथा सांग आम्हांसी ।।३।। आदिशक्ति तैं निरूपित । विकटाचें चरित्र अद्भुत । चक्रपाणि राजा राज्य करित । गंडकी नगरींत धर्मशील ।।४।। त्याची पत्नी उग्रा पतिव्रता । होती अत्यंत गुणान्विता । नीतिपरायण तो नृप होता । देव विप्र अतिथि पूजी ।।५।। पंचयज्ञ नित्य करित । भूमंडळ सर्व जिंकित । देवमान्य संपत्ति भोगित । बाहुबळानें तो नृप ।।६।। परी एक दुःख त्यास जाळित । जें जें अपत्य त्यास होत । तें तें उपजतांच मरत । होतें वंध्यत्व दंपतीसी ।।७।। त्यास्तव विधियुक्त दान देत । व्रतें वैकल्यें आचरित । तथापि एकही संतति न जगत । परमेश्वराची कृपा नसे ।।८।। म्हणोनि राज्य अमात्याहातीं । सोपवून वनास जाण्याप्रती । स्त्रीसहित दुःखित चित्तीं । उद्युक्त तो जाहला ।।९।। त्या वेळीं तेथ अकस्मात । शौनक मुनिसत्तम येत । यदृच्छेनें तो योगी श्रेष्ठ । प्रवेश करी नृपसदनीं ।।१०।। त्या शौनक मुनीनें नृपाप्रत । उपदेशिलें सूर्याचें व्रत । नराधिप तें भक्तीनें करित । त्यायोगें तुष्टला रविदेव ।।११।। राणीस स्वप्नदृष्टान्त होत । गर्भवती ती होई त्वरित । सूर्यतेजयुक्त गर्भ उदरांत । धारण करण्या असमर्थ

ती ।।१२।। दाहयुत अत्यंत पीडित । समुद्रांत गर्भ त्यागित । तेथ सागरीं बाळ जन्मत । त्रिनेत्र चक्रधारक ।।१३।। तो समुद्राचें पाणी शोषित । ब्राह्मणरूपें तैं चक्रपाणि नृपाप्रत । समुद्र जाऊन सांगे वृत्त । त्या नृपाच्या पुत्राचें ।।१४।। त्या नृपसुतास नृपाच्या स्वाधीन । करून समुद्र अन्तर्धान। जाहला तैं नृप प्रसन्न । पुत्रलाभें त्या वेळीं ।।१५।। सर्व प्रजाजनांसमवेत। पुत्रजन्मोत्सव करित । त्या बाळाचें जातकर्मादि करवित । द्विजहस्तें हर्षभरें ।।१६।। त्या पुत्राचें नांव ठेवित । द्वीजानुमतीनें सिंधु प्रख्यात । अपार वीर्यवंत तो सुत । बलशाली बहु निपजला ।।१७।। आज्ञा घेऊन वनांत जात । तपाचरणास उत्कंठित । शुक्राचार्य त्यास मंत्र देत । विधियुक्त सूर्यदेवाचा ।।१८।। तदनंतर सिंधु आचरित । उत्तम तप एकपादस्थित । निराहार तो व्रती राहत । सूर्यास त्यानें तोषविलें ।।१९।। दोन सहस्त्र वर्षे जात । तैं काश्यप सविता प्रकटत । वर मागण्यास सांगत । त्रैलोक्यवैभव त्यास देई ।।२०।। अमृतपानक त्यास देत । त्रिगुणभावें जो हीन असत । ब्रह्मशास्त्रग देहयुक्त । तोचि एक तुज वधिल ।।२१।। अन्यथा अमृत काढून । कोणी मारू न शकेल बलवान । त्रैलोक्यांत अजिंक्य होऊन । राज्य अबाधित करशील ।।२२।। ऐसें सांगून स्वभक्ताप्रत । सविता अन्तर्धान पावत । सिंधु स्वगृहा परत जात । मातापिता आनंदले ।।२३।। त्याचें स्वागत करिती । तेज:पुंज त्याची कांति । त्यास राज्य देऊन जाती । राजाराणी वनांत ।।२४।। तदनंतर सिंधु जिंकित । सप्तद्वीपवती धरा समस्त । वरदान त्यास जैं अद्भुत प्राप्त । तें कळतां असुर एकवटले ।।२५।। शुंभ अतिशुंभ वृत्र कमळ । शंख कोलासुर सबळ । इत्यादि असुरवीर महाबळ । त्याच्या आज्ञांकित जाहले ।।२६।। त्यांच्या सहित तो जिंकित । शंभु मुख्यादि देवांस स्वर्गांत । शंकर वनीं पळून जात । सोडून कैलास आपला ।।२७।।

विष्णु सूर्य विधि इंद्रादींस पकडून । बंधनांत त्या टाकून । देवेंद्रां त्या जिंकून । वर्चस्व आपुलें स्थापिलें ।।२८।। ऐशापरी त्रैलोक्य जिंकित। महा असुर तो शक्तियुक्त । दैत्येंद्रासी स्थापित । देवस्थानांत सर्व जागीं ।।२९।। ऐसा बहुकाळ जात । महा असुर तो क्रोधयुक्त । त्वेषानें देवतीर्थादिक भंगवित । कर्मकांड नष्ट करी ।।३०।। आपुल्या प्रतिमा करून । भूमंडळीं सर्वत्र स्थापून । देशोदेशीं प्रतिनगरीं पूजन । प्रजेकडून करवी त्यांचें ।।३१।। तेव्हां सर्व हाहा:कार करिती । वर्णाश्रमी जन जगतीं । स्वाहा स्वधादी कर्म निश्चिती । नष्ट जाहलें सर्वत्र ।।३२।। आतां शक्तींनो त्या असुराचा । वध कैसा साचा । जाहला नंतर तयाचा । वृत्तान्त पुढे मीं सांगेन ।।३३।। शंकर आपुल्या गणांसहित । त्रिसंध्या क्षेत्रीं जात । गौतमादींच्या सहित । स्त्रियांसह वास करी तेथें ।।३४।। ध्यान लावून विघ्नेशा भजत । शंकर तैं भक्तियुक्त । एकदा पार्वती त्यास विचारित । संशयाकुल मानसीं ।।३५।। देवींनो ती विनययुक्त । म्हणे ईश तूं जगतांत । सर्व देवांचा म्हणून ईश्वर ख्यात । वेदशास्त्रें हें सांगतीं ।।३६।। महेश्वर तूं देव थोर । कोणाचें ध्यान करिशी नम्र । सांग रहस्य संशयहर । पदकमलाची मी दासी तुझ्या ।।३७।। शिव तेव्हां तिज सांगत । ईश अनीशांस जो निर्मित । त्या गणेशासि मीं भजत । ब्रह्मपतीस भक्तीनें ।।३८।। गकार अनीश स्मृत । णकार ईशमय ख्यात । त्यांचा स्वामी गणेश ज्ञात । चारुहासिनी हें वेद सांगती ।।३९।। त्याचें तें वचन ऐकत । तेव्हां पुनरपि त्यास विनवित । त्या गणेशाची प्राप्ति मजप्रत । कैसी होईल तें सांगा ।।४०।। ऐशा गणेशाचें ज्ञान । नसे मजला मी अज्ञान । त्याच्या प्राप्त्यर्थ साधन । उपाय कोणता मुख्य असे ।।४१।। शिव तैं सांगे पार्वतीप्रत । एकाक्षर मंत्र घे विधियुक्त । त्याच्या जपानें अविरत । तप करी तूं पार्वती ।।४२।। ध्यान करून

तोषवी । देव गजाननाचा कृपौघ वळवी । जेणें सिद्धि तूं आघवी । प्राप्त करशील मत्प्रिये ।।४३।। ऐसें बोलून तिज देत । गणेश मंत्र तो पुनीत। त्याचा स्वीकार करित । प्रणाम करून पार्वती ।।४४।। तदनंतर ती देवी जात । लेखनाद्रीवरी त्वरित । त्या मनोहर स्थानीं आचरित । तप घोर पर्वतसुता ।।४५।। वायुही भक्षण न करित । तपमग्न ती ध्यान करित । ऐशा रीती आराधित । ढुंढी गजानन ती तोषवी ।।४६।। शंभर वर्षे ऐसीं जात । तैं वरद गणेश प्रकटत । म्हणे वर माग मीं संतुष्ट। पार्वती तैं प्रार्थितसे ।।४७।। म्हणे विघ्नपा माझा सुत । होई देवा तूं भविष्यांत । त्या वेळीं तुझी सेवा अविरत । विशेषभावें करीन मी ।।४८।। तूं आमचा होतां सुत । आम्हीं बंधहीन होऊ त्वरित । मातापिता गणेशाचे ख्यात । ऐसें द्यावें वरदान ।।४९।। पार्वतीस देत वरदान । भाविकाचा मनोरथ मान्य करून । विघ्नेश्वर पावला अन्तर्धान । पार्वती स्थापना करी त्याची ।।५०।। विप्रहस्तें स्थापना करित । गणेशासी भक्तिभावें पूजित । तदनंतर जाऊन शंकराप्रत । वृत्तान्त त्यास सांगितला ।।५१।। तो शिवही अति हर्षित । जाहला ऐकून तो वृत्तान्त । पार्वती तन्मय होत । वरद प्रभूसी स्मरतसे ।।५२।। भाग्यगौरवें सर्वत्र पाहत । गणराजास ती सतत । भाद्रपदमासीं मूर्ति करित । शंकरासह पूजिली तैं ।।५३।। शुक्ल पक्ष चतुर्थी सोमवार । माध्यान्ही स्वाती नक्षत्र । त्यावेळीं ती मूर्ति मनोहर । सजीव झाली वरप्रभावें ।।५४।। वरप्रद विकट चेतनायुक्त । स्वतेजानें दिपवीत । शिवपार्वती पाहूं न शकत । स्तुति करिती मनोभावें ।।५५।। देवा तुला उग्रतेजयुक्त । पाहण्या आम्हीं असमर्थ। तरी आतां कृपावंत । होऊन घ्यावें सौम्यरूप ।।५६।। तिची प्रार्थना ऐकून । सौम्य तेज जाहला गजानन । शिव पाही त्यास प्रसन्न । षड्भुज चंद्रासम कांति ।।५७।। ब्राह्मणांकरवी करवित । जातकर्मादि

विधियुक्त । अकराव्या दिवशीं बारसें करित । गुणेश तैं नांव ठेविलें ।।५८।। शिवपार्वती ब्राह्मण पूजन । करिती हर्षयुक्त मन । गुणेश जन्मला हें वृत्त ऐकून । आनंदलें त्रैलोक्य ।।५९।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते गुणेशावतारवर्णनं नाम सप्तत्रिंशत्तमोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय सदतिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । आदिशक्ति कथा पुढती सांगत । सिंधूचे हेर गुप्तरूपें संचरत । जाणून गुणेशाचा जन्म वृत्तान्त । सिंधूस कथिती सत्वर ते ।।१।। शक्तींनो ह्या कालावधींत । आकाशवाणी दैवी होत । सिंधु ऐकून भयभीत । आठवी शब्द ते पुनः पुन्हां ।।२।। दैत्यनाथा गुणेश त्वरित । ठार करील तुला निश्चित । चराचर करील धर्मयुक्त । त्रिवार सत्य हें जाण ।।३।। हें ऐकून आकाशवचन । दैत्य पडला मूर्च्छा येऊन । नंतर जाहला सावधान । क्षणभरानें तैं निराश ।।४।। तो मंदधी शोक करित । दैत्येंद्रास पाठवित । त्या गुणेशा मारण्या झटत । दैत्यनायक सर्व यत्नें ।।५।। गुप्तरूपें ते सर्व जात । त्रिसंध्या क्षेत्रांत समस्त । नाना मायेचा आश्रय घेत । पशुपक्ष्यांचीं रूपें घेती ।।६।। त्यांचें कपट जाणून । ठार मारी त्यांस शिवनंदन । शोक करी पार्वती चिंताग्रस्त मन । असंख्य दैत्य पीडा देती ।।७।। त्या सर्वांसी नित्य मारित । परी दैत्य राजे प्रत्यहीं उद्युक्त । माझ्या पुत्रा मारण्या उत्कंठीत । काय करतील ते त्यासी ।।८।। गुणाधीशासी मारतील । या भयानें ती व्याकुळ । साक्षात् ब्रह्मपति विमल । म्हणे पुत्र माझा पूर्ण ब्रह्म ।।९।। भाग्यहीन प्रभावें यास । होईल का पीडा प्रयास । तेव्हां माया करी गुणेश । मोहिनी घाली पार्वतीसी ।।१०।। मोहवश देवी मानित ।

गणेश्वरासी आपुला सुत । त्याचें ब्रह्मरूप विसरत । ऐसा प्रभाव मायेचा ।।११।। त्या वेळीं मरीची योगी येत । गणपास जो सदैव भजत । म्हणे विघ्नपा दर्शन दे मजप्रत । आकाशवाणी तैं जाहली ।।१२।। तो महायोगी ती ऐकत । शिवपुत्र झाला गणेश जनांत । त्यास जाऊन भेट त्वरित । त्यानुसार योगी तेथ आला ।।१३।। हर्षभरें तो तेथ जात । पार्वती त्याचें स्वागत करित । प्रणाम करून पूजित । भोजनादिक देतसे ।।१४।। तदनंतर त्यास प्रार्थित । मुने तूं ब्रह्मभूत साक्षात । माझा आश्रय सोडून सांप्रत । जाऊ नको कोठेही ।।१५।। तीर्थादिक स्थानाप्रत । गणेशभजनीं तूं रत । जैसा विघ्नहर देव निश्चित । तैसा तूही आम्हांसी ।।१६।। म्हणून तुज प्रार्थित । राख आता माझा सुत । दैत्यादी समूह सतत । भयंकर सर्वत्र काळासम ।।१७।। गणेशास मारण्या उद्युक्त । परी ते मृत्यु पावत । आमुचा कुलदेव विघ्नेश असत । यांत संशय कांहीं नसे ।।१८।। तोच रक्षितो मम सुतास । अन्यथा मृत्युचें भय त्यास । शंकरें सेविलें गणेशास । तें पुण्य रक्षी माझ्या सुता ।।१९।। पार्वतीचें ऐकून वचन । महामुनि झाला विनीतमन । ही साक्षात शक्ति भ्रांत होऊन । विघ्नपास सुत मानी ।।२०।। परी करण्या समाधान । गणेशकवच तिज करी कथन । शंभुसुतास प्रणाम करून । स्तुति करून परतला ।।२१।। तदनंतर जे दैत्यराज येत । मारण्या गुणेशा उत्कंठित । त्या नानावेषधारकांसी वधित । बाळक्रिडा ती तयाची ।।२२।। एकदा पार्वती प्रात:काळीं । उठून शिवपूजनीं रत झाली । लिंगमयी मूर्ति केली । ठेविली डाव्या हातावरी ।।२३।। आवाहन शंकराचें करून । करी तयाचें पूजन । त्या वेळीं गुणेश प्रकटून । म्हणे मजला स्तन्य देई ।।२४।। पार्वती म्हणे बाळा क्षणभर । देईन स्तन्य धरी धीर । महेशाचें पूजन एकाग्र । प्रथम पूर्ण करितें मीं ।।२५।। तैं तो सुत तिज विचारित ।

या लिंगाचें कां पूजन करित । तूं मज सोडून एकचित्त । शंकर काय अधिक देणार ।।२६।। माते मज दे स्तनपान । त्यायोगें अनंत शिवांचें समाधान । शैलनंदिनी ब्रह्में प्रसन्न । होतील मज तोषवितां ।।२७।। तथापि पार्वती हांसोन । न दे तयास स्तनपान । तेव्हां क्रोधवश आरक्त नयन । जाहला मयूरेश खरोखर ।।२८।। तळव्याचा आघात करून । शिवलिंग भूवरी पाडवून । तें देई दूर लोटून । भग्न जाहलें तें तेव्हां ।।२९।। शक्तींनो पार्वती अति दु:खित । विकटासी चापट मारित । येऊन क्रोध अत्यंत । गणेश्वरही क्रुद्ध झाला ।।३०।। आपुल्या मातेस कडकडून । चावला तैं गजानन । करांगुली चावून । रक्त काढलें तयानें ।।३१।। हाहा:कार करून रडत । पार्वती तैं गुणेश पळत । तिज त्यागून भयभीत । बाळक्रीडा दाखविली ।।३२।। जो भयदाता सर्व विश्वाप्रत । तो मातेसी त्या वेळ घाबरत । शैवलिंग भग्न पाहून रडत । प्राणप्रतिष्ठित जें होतें ।।३३।। पार्वती अतिशोक करित । म्हणे हें शिवहत्येसम दुर्वृत्त । पाप घडलें मज अत्यंत । पतिवधासम हें असे ।।३४।। हा माझा पुत्र गुणेश वाटत । नरकप्रद मजप्रत । ऐसा पुत्र होऊन होत । जन्म माझा पापिष्ठ ।।३५।। वांझ जरी राहिलें असतें । तरी तेंही मज गमतें । हा कुलक्षण पुत्र यातें । काय माया लावावी ।।३६।। याच्यामुळें शिवलिंग भंगलें । पतिवधासम पातक घडलें । आतां गजाननास स्मरून पहिलें । संपवीन माझे जीवन ।।३७।। दु:खित मी गणेशा ध्याऊन । देहत्याग आतां करीन । विघ्नराजा तुज नमन । तैं घडलें एक आश्चर्य ।।३८।। गणेशाच्या स्मरणें होत । बुद्धिभेद तिच्या चित्तांत । गणराजा पुत्ररूप पाहत । समीप तेव्हां पार्वती ।।३९।। एक काठी करीं घेऊन । मारण्या धावें पार्वती उन्मन । परात्पर पुत्रा त्या महान । तोही भीतीचें नाटक करी ।।४०।। भय पाहून पळून जात ।

पार्वतीस पाहून तो त्वरित । ती धावून त्यास पकडित । शिवप्रिया पार्वती ।।४१।। तैं विघ्नेश माया करित । स्वत: शिवमय होत । शंकरास पाहून मोहित । पार्वती जेव्हां दु:खमग्न ।।४२।। तो शंकररूप गजानन । शैलसुतेसी बोले वचन । मज महेशा मारण्या मन । कां केलेंस प्रिये त्वा ।।४३।। मज मारण्या काठी हातांत । कां घेतलीस प्रिये रोषांत । त्यास सोडितां पुनरपि घेत । पुत्ररूप गणराज तो ।।४४।। पार्वती अत्यंत दु:खित । देहत्यागाचा निश्चय करित । पुनरपी पार्वती त्या पुत्रा पाहत । धावें मागुनीं मारावया ।।४५।। भयभीत तो बाळ पळत । देवी त्याचा पाठलाग करित । तो पुत्र जाई वनांत । कर्दमदैत्य तेथ तैं आला ।।४६।। शैव ब्राह्मणाचें रूप घेऊन । बाळासी म्हणे तो कृपा दाखवून । बाळा धावसी सांग कारण । रक्षीन तुज मीं नि:संशय ।।४७।। येथेच थांब क्षणभर । मातेसी न माहित हें स्थान दूर । बाळभावें गुणेशें होकार । तयासी तेव्हां दिधलासे ।।४८।। त्या कर्दमासुरें बाळ पकडिला । सत्वरीं गिळून टाकिला । सिंधूचा महाशत्रू नष्ट केला । विचारें अति हर्षित ।।४९।। सर्व दैत्यांचें भय नष्ट केलें । गुणेशासी मीं ग्रासिलें । तव तेथें जगदंबेचें आगमन झालें । ती पाठलाग करी गुणेशाचा ।।५०।। त्या शैव ब्राह्मणा म्हणत । स्वामी पाहिला का माझा सुत । कोठें जाहलासे गुप्त । तुमच्याच सन्निध होता तो ।।५१।। यापुढें पदपंक्ति न दिसत । आलें त्याचा माग काढित । परशु आदि चिन्हें ज्ञात । माझा बाळ कोठें असे? ।।५२।। तो द्विज म्हणे शैलजेप्रत । मीं न पाहिला तुझा सुत । शिवाची घेतों शपथ । पाहिला नाहीं पुत्र तुझा ।।५३।। तदनंतर अति दु:खित । पार्वती स्मरे द्विरदानना चित्तांत । तेव्हां त्या कर्दमाच्या मुखांतून त्वरित । बाहेर पडला गुणेश ।।५४।। गणनायक बाहेर पडून । मुष्टिघातें करी हनन । तो असुर पडला मरून।

महादुष्ट भयंकर ।।५५।। अठरा योजनें तो पसरला । तैं त्या राक्षसा मृत पाहून झाला । पार्वतीस आनंद आगळा । क्रोध सारा ती विसरली ।।५६।। पुत्रास घेऊन स्वाश्रमाप्रत । गेली पार्वती स्वगृहांत । तेव्हां पुत्र तिचा लोळत । भूमीवरी गडबडा ।।५७।। पुनः पुनः जांभया देत। विकटानन बळवंत । त्या बाळाच्या मुखांत । विश्वाचें दर्शनें घडलें तिला ।।५८।। तें पाहून भयसंकूल । अनंत ब्रह्मांड दर्शनें पाहून विमल । पार्वती पडली धरणीवर अबल । स्वगुरु शंकरातें स्मरे ।।५९।। आपुल्या इष्ट देवा गणेशा स्मरत । तेणें मोहहीन होत । पार्वती मनीं विचार करित । गणेश देव तो हा पुत्र झाला ।।६०।। त्यास सोडून लिंगसेवेंत । मूर्खासम मी झालें रत । पतिभावें देहधारी शंकरा देवेशासी पूजित । गणेशभजन विसरले देवभावें ।।६१।। तें सारें मीं विसरलें। मूढभावें स्तनपान गुणेशा न दिलें । ज्या गुणेशांत स्थित झाले । शंकरादि अनंत देव ।।६२।। तो तुष्ट होतां संतुष्ट ।ते सारे देव होती त्वरित ।गणेश ब्रह्मांचा नाथ । तोही संतुष्ट त्यायोगें ।।६३।। असे ह्यास शिवरूप मीं पाहिलें । फसून त्यास पकडलें । तरीही त्याचें सत्यरूप न उमजलें। कैसें तें मज समजेना ।।६४।। आतां यापुढें सर्वभावें भजेन । पुत्रभावधारी गणेशान । हा पति हा तात ही माता भिन्न । हा पुत्र हा सुहृद तैसा ।।६५।। हा सारा भेद असत्य असत । हा गुणेशचि ब्रह्म विश्वांत। तोचि शांतिप्रद निश्चित । ऐसें ठरवून प्रणाम करी ।।६६।। भक्तिनम्र मान वाकवून। त्या पुत्रासी तोषवून । त्याचें करून स्तवन। आराधना करी ऐसी ।।६७।। ती ऐसी स्तुति करित । गणेश तैं मोहें पाडवित । देवी होऊन संमोहित। विस्मृति तिजला परम झाली ।।६८।। पुत्रभावें विघ्नेशाचें लालन। गृहकार्यरत देवी करी पालन । तेव्हां शक्ति विचारिती प्रसन्न । गणेश जरी ब्रह्मनायक ।।६९।। परी तो पुत्रभाव घेत । बाळक्रीडार्थ

उद्युक्त । कां दाखविलें अखिल ब्रह्मांडयुक्त । विश्व त्यानें आपुल्या मुखीं ।।७०।। शिवरूप कां दाखवित । दाखवून पुनरपि हें अद्भुत। लोप कां केला तें समस्त । जाणण्या कुतूहल आमुच्या मनीं ।।७१।। आदिशक्ति म्हणे वचन । संशय तुमचा दूर करीन । पुत्रभावमय भक्ति ग्रहण । लालस सदा गजानन ।।७२।। वरदान प्रभावें तपाचें फळ देत। कार्य करून समस्त । सुरर्षींचें अंन्तर्धान पावत । तेव्हां देवीस स्मरण होईल ।।७३।। गणेश पुत्रभावें आला होता । याचें स्मरण तिज होतां। सुत मानला त्यासी तत्त्वता । हें अज्ञान निश्चित ।।७४।। पार्वती ऐसा विचार करील । पुत्रासम राहिला सदनीं विमल । गणेशें दाखविलें स्नेहबळ । ब्रह्मसामर्थ्य तयाचें ।।७५।। त्याचें माहात्म्य न कळलें । हेंचि आजि कळो आलें । ह्या विचारें भक्तिभाव झाले । युक्त तिच्या मनांत ।।७६।। अति भक्तिसंयुक्त । गजाननास ती तैं भजत । म्हणोनि गणराज हें करित । बाळपणीं कौतुक सारें ।।७७।। ऐशापरी नाना दैत्य वधून । शिवपार्वतीचें करी सेवन । पुत्रभावें त्यांस तोषवून । वरदान आपुलें सत्य केलें ।।७८।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते बालखेलावर्णनं नामाष्टत्रिंशत्तमोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय अडतिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । आदिशक्ति पुढें कथा सांगत । गौतमादि मुनींच्या पुत्रांसमवेत । बाळांसम भोजन करित । गणेश्वर कौतुकानें ।।१।। ते मुनिसुत त्याचा करित । तिरस्कार अपमान तो सहन करित । हर्षभरें मित्रभाव युक्त । जैसी भूमिका तैसें वागे ।।२।। जे सख्य भक्तीस्तव आचरले । तपादिक सतत भले । ते समस्त भक्त झाले । सेवेसाठी

मुनिपुत्र तैं ।।३।। कश्यपाचा सुत होत । मयूर विष्णु अव्यय जगांत । यज्ञसेवेस उद्युक्त । गणपासंगे युद्ध करी ।।४।। विनता बोध करी स्वसुतास । तो जेव्हां पटला त्यास । तो करी प्रणाम गणेशास । स्तवन करून तोषवी ।।५।। गणेशाजवळी करी याचना । मयूरवराची प्रार्थना । आधीं तुझ्या नामाची उच्चारणा । होईल माझ्या नामांत ।।६।। सर्वख्यात सर्वसिद्धिप्रद । हें असे नांव विशद । त्यावरी ख्यात मयूरेश नामें सुखद । शक्तीनों गणेश जगांत ।।७।। तो वाहन होऊन सेवारत । विघ्नपाच्या राहे सतत । एकदा द्विजपुत्र बुडवित । पाण्यांत त्या गुणेशासी ।।८।। नागकन्या काममोहित । पकडून नेती त्यास पाताळांत । गणेशमहिमा ऐकून तप आचरित । होत्या ब्राह्मणी एकविस ।।९।। पतिभावें गणेश लाभावा । हा त्यांचा संकल्प बरवा । नाना अनुष्ठानें देवा । नाना मंत्रे तोषविती ।।१०।। त्या सर्व तपः प्रभावें होत । नागकन्या लावण्ययुत ।शेष वासुकी मुख्य पाळित । परमादरें लाड करिती ।।११।। त्या नागमुख्यांस सांगत । गणेशास पतित्वें मनांत । वरलें असे आम्हीं एकचित्त । अन्य कोणास न वरणार ।।१२।। तें ऐकून त्यांचें समर्थन । शेषमुख्य करिती युक्तिवचन । कां हट्ट करतां तुम्ही अज्ञान । ब्रह्मेश गणनाथ स्वानंदस्थ ।।१३।। तो तुमचा पति कैसा होईल । अभिमान सोडा होऊन सबल । आपल्या समान वर अमल । निवडावा तुम्हीं सर्वांनीं ।।१४।। त्याचे ऐकून वचन । कुमारी बोलती एकचित्त मन । ताता आम्हीं ब्रह्मचर्य स्वीकारून । घालवू आमुचें जीवन ।।१५।। परी पतित्वें गणेशास । वरूं हाचि निश्चय खास । अन्यथा ब्रह्मचर्य विशेष । सतत आम्हीं पालन करूं ।।१६।। पूर्वसंस्कार योगें पाहत । त्या नागकन्या तैं जळांत । गणनायकासी पकडून नेत । पाताळांत त्या सर्वही ।।१७।। नारदाच्या मुखांतून । ऐकलें होते वर्तमान । शिवपुत्र झाला गजानन ।

आला असे त्या प्रान्तात ।।१८।। स्वगृहीं गणनाथास नेती । त्या साऱ्या विव्हल अती । भक्तिसंयुक्त त्यास पूजिती । पति मानून शक्तींनो ।।१९।। तेव्हां तोही हृदयी इच्छित । शांतियोग तयांसी देत । तेव्हां त्या कामहीन होत । सेविती प्रभूसी विशेषें ।।२०।। त्यांसी अकृत्रिम सुख देत । भक्तिभावें संतुष्ट । रात्रंदिवस त्यांस भोगित । पौरुषसुख अत्यंत देई ।।२१।। ऐसें करून मर्दन चरित । गर्विष्ठ शेष मदयुक्त । पुनरपि तेथ जात । जेथ त्या नागकन्या द्विजसुता होत्या ।।२२।। ऐसी नानाविध कृत्यें करित । अद्भुत त्याचें चरित । गौतमाचें सर्व अन्न खात । न लोभानें तो भक्तीनें ।।२३।। भक्तांसी भक्तिदानार्थ उत्कंठित । तो प्रभु गजानन काय न करित । दासदासीपरायण श्रेष्ठ । महादेवींनो विचार करा ।।२४।। भक्तांनी जें जें केलें । तें तें यानें अमृतरूप मानलें । अभक्तांनी गौरव ढोंगें केलें । तें तें हा विषसम मानी ।।२५।। भक्तिमोहानें तिरस्कार सहत । ताडन अपमानादिक समस्त । गणनाथ तो शिवसुत । सौख्यद मानी तें मनीं ।।२६।। पार्वती शिवमुख्यादि ताडिती । तयास कश्यप अदितिही मानिती । कधीं कधीं अपमानिती । परी तें सर्व अमृत मानी ।।२७।। भक्ताच्या वचनास्तव धारण । करी दैत्य मस्तक गजानन । स्वांगच्छेद करून । मलसंभूतही तो झाला ।।२८।। इत्यादि विविध कर्मे करित । जीं नीच अन्यथा वाटत । भक्तीनें होऊन संमोहित । मोहनाशक गजानन ।।२९।। तेव्हां गौतममुख्य येती । गणेशमायेनें ते युक्त असती । शंकर देवास येऊन म्हणती । अत्यंत मोहित ते सारे ।।३०।। शंभो तुम्ही मयूरेशासहित । अन्यत्र जावें स्थलांतरा इच्छित । दैत्यपीडेनें सतत । आम्ही झालों गुणेशास्तव ।।३१।। दैत्येंद्र मुख्य नित्य येती । मयूरेशा मारण्या कपट करती । तत्क्षणीं मरून पडती । मयूरेशमायेनें ताडित ।।३२।। जे दैत्य कपटवेष घेती ।

पशुपक्ष्यांचे ते जेव्हां मरती । तेव्हां मूळ रूप विस्तार घेती । बारा पंचवीस कोस योजनें ।।३३।। त्यांचे ते स्थूल देह पडती । तैं गृहवृक्ष आश्रम चुरडती । नित्य होत ऐसी क्षति । काय आम्हीं करावें ।।३४।। म्हणून सर्वगणांसहित । जा जेथ तुज असेल वांच्छित । अथवा आम्हीं जाऊं त्वरित । स्थान हें सोडून विवशपणें ।।३५।। त्यांचें तें ऐकून वचन । चिंतातुर शिव करी कथन । महादेवींनो जो करी पालन । देवांचें सर्वदा सर्वत्र ।।३६।। आज मीं तुमच्या आश्रमांत । आलों होतों पहाण्या हें अघटित । आमुच्या संगतीनें पीडित । खरोखर मुनी तुम्हीं ।।३७।। आपण आपापल्या आश्रमांत । रहावें सुखानें सतत । मीच जाईन अन्यत्र त्वरित । सर्व परिवारासह माझ्या ।।३८।। दैत्येंद्र नित्य मयूरेशास दुःख देत । त्यांसी तो महाबळ मारित । परी निर्विघ्नपणे राहण्या आम्हांप्रत। दुसरें कोणतें स्थान सांगा ।।३९।। त्या स्थानीं महर्षीनो जाईन । सुतासहित मीं याच क्षण । मीही ध्यान करितसे प्रतिदिन । कोठें जावें म्हणोनी ।।४०।। गौतमादी ऋषि सांगती । दक्षिण भागीं क्षेत्र निश्चिती। भूस्वानंद नामें क्षिती । सर्वसिद्धिप्रद जेणें ।।४१।। तें ब्रह्मसायुज्याचें पद । तेथ गणपति मूर्ति सुखद । सिंधदूतांनी खंडिली हें दुःखद । वृत्त आपणा विदित असे ।।४२।। त्या मूर्तीच्या ठायीं स्थापिली । सिंधूची प्रतिमा दुष्टांनी त्यावेळीं । लोकांनी ती क्षेत्रभूमि सोडली । दैत्यपीडेस्तव सह परिवार ।।४३।। जरी महादेवा तेथ जाशील । तरी विघ्नहीन तूं होशील । ऐकून त्यांचें वचन निर्मल । शंभू निघाला तत्क्षणी ।।४४।। सर्व गणांसहित जात । महादेवींनो ब्राह्मणांसहित । मयूरेशादी परिवार असत । तेव्हां त्याच्या सांगाती ।।४५।। त्या वेळीं सिंधू दानव पाठवित। कमलासुर नावाचा दैत्य बळवंत । त्यास पाहून मुनिजन पळत। अजिंक्य वाटे तो तयांसी ।।४६।। ब्रह्मा विष्णु शिवादी देवांस।

महामायिक तो अजेय त्यांस । ऐसें वाटलें तयांस । म्हणून ते पळाले ।।४७।। परी पुनरपि विचार करिती । शिवास त्यागून आश्रय जगतीं। अन्यत्र कोठे न मिळेल निश्चिती । म्हणून सर्वही परत आले ।।४८।। दैत्यनाथ जरी ठार मारील । तरी आम्हां कोण तारील । ऐशा विचारें ते विमल । शंकराचा आश्रय घेती ।।४९।। म्हणती आम्हीं भयभीत। रक्षण करी तूं सांप्रत । दैत्यनायक अति बळवंत । आतां काय करावें ।।५०।। मयूरेशाच्या संगतीत । सदा रहावें सुरक्षित । अन्यथा आम्हीं अनुग असमर्थ । संरक्षण करावया ।।५१।। त्यांचें वचन ऐकत । सदाशिव तैं भय भीत । म्हणे तो द्विजपालनरत । मुनींनो मजसी क्षमा करा ।।५२।। कमलासुर नामक दैत्यनाथ । मोठी सेना घेऊन येत । त्यास जिंकण्या असमर्थ । सर्वथैव मीं जाणा ।।५३।। आतां मजसी पकडून । टाकील कारावासीं तो दुर्जन । जेथ विष्णु आदि सुर महान। आधीच पडले संत्रस्त ।।५४।। शिवाचें ऐकून वचन । मयुरेश करी सांत्वन । म्हणे ताता नसे भयकारण । मारीन मी त्या महाअसुरासी ।।५५।। तूं साक्षात् गणनाथाचा । अंश अससी हा विचार साचा । आठवून हें तारक भवाचा । भक्तनायक तूं ख्यात ।।५६।। ब्राह्मण हे गाणपत्य असत । त्यांना विघ्न कैसें होईल प्राप्त । मरीचीनें माझ्या रक्षणार्थ । गणेशकवच दिलें असे ।।५७।। त्योयोगें मीं भयरहित । कां झालास सचिंत । ऐसें बोलून गणेश जात । विघ्नविदारण शूलधर ।।५८।। मयूरावरी बैसोनी । परशू शूल करीं धरोनी । महाघोर युद्ध करूनी । कमलासुरासी कापिलें ।।५९।। त्याचे तीन तुकडे करित । मस्तक मयूरक्षेत्रीं पडत । उदर राजसदनांत । जघन पडले प्रवाळीं ।।६०।। ऐशापरी तीन स्थानांत । दैत्येंद्राचे तीन भाग पडत । गणेश्वर झाला तेथ संस्थित । अत्यंत प्रतापवंत जो ।।६१।। मुनिजनांसह

शिवासहित । मयूरेश्वर त्या क्षेत्रीं जात । मयूरग्राम हें नाम लाभत । त्या क्षेत्रासी त्या वेळीं ।।६२।। कमलासुराचें मस्तक पडत । क्षेत्र तें तदाकार दिसत । मोर हें वाहन होतें विलसत । मयूरक्षेत्राचा हा इतिहास ।।६३।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते कमलासुरवधो नामैकोनचत्वारिंशत्तमोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय एकोणचाळिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । आदिशक्ति कथा पुढती सांगत । मयूरेश जाऊन त्या क्षेत्रांत । सिंधूची मूर्ति स्थापिली पहात । क्रोधभरें ती चूर्ण करी ।।१।। आतां ती वार्ता दूत । सांगतील सिंधूप्रत । या विचारें भयभीत । मुनिजन शंकरादि सारे ।।२।। तेथही मायारूप घेऊन । दैत्येंद्र आले दबा धरून । शिवसुता मारण्या उत्सुकमन । त्यांस मारी मयूरेश नित्य ।।३।। तदनंतर विघ्नविनाशास्तव । इंद्रयज्ञ आरंभी शिव । मयूरेश मोडी तो यज्ञ क्रोधभाव । व्यक्त करून यज्ञस्थळीं ।।४।। तेव्हां इंद्र देवांसहित । मयूरेशासवें लढत । त्यास जिंकून गणराज स्वपुरांत । विजयाच्या आनंदात ।।५।। अन्य शक्ति विचारिती । तेव्हां आदिशक्तीप्रती । सिंधूच्या कारागारीं जे असती । ते देव तेथ कैसे आले ।।६।। मयूरेशाविरूद्ध लढले । हें कैसें शक्य झालें । तें सांगून पाहिजे केलें । संशय पटल तूं दूर ।।७।। आदिशक्ति तैं सांगत । मेरुसंस्थ महेशान असत । दैत्य त्यांसी बद्ध करित । परी ते समर्थ न होती ।।८।। देव त्रिविध असती ख्यात । तत्त्वाकार शक्तींनो ते ज्ञात । कर्ममय ते देहरूप असत । शास्त्र ऐसें सांगतसे ।।९।। सर्व भावांत चमकत । म्हणून देव ऐसे ख्यात । देवत्व त्यात त्रिविध वर्तत । वेदवादी हें जाणती

।।१०।। शंभर अश्वमेध यज्ञ करित । तो इंद्रपद भोगित । कर्मज देव ऐसे राहत । कांचनाचलीं मेरूपर्वतीं ।।११।। मंदारादि स्थानांत । त्यांचीं नगरें वर्तत । त्यांस असुरादि जिंकित । यांत कांहीं संशय नसे ।।१२।। ब्रह्मदेवाच्या दिवसांतीं ते जात । मन्वंतरपरायण लयांत । यज्ञाचें फळ पूर्ण भोगित । तेव्हां पुनः जन्म घेती ।।१३।। पुनरपि मनुष्य जातींत येती । जैसें कर्म तेथ करिती । तैसें फळ ते लाभती । ऐसें रहस्य जाणावें ।।१४।। अन्य कर्ममय देव स्थित । व्यापून सर्व विश्व राहत । आपल्या अधिकारानुरूप वर्तत । कर्मपरायण ते सारे ।।१५।। जठराग्नि तैसा बाह्याग्नि । अधिकार त्या देवांचे असोनी । यमयातनादीपासुनी । अन्य अद्भुताधिकारी ते ।।१६।। दैत्यांचा त्यावरी प्रभाव न पडत । कर्मबळें कदापि विश्रांत । सदा अधिकारसंयुक्त । ते देव दुसऱ्या प्रकारचे ।।१७।। योगबळें योगीश । तो देवांसी चालवितो परेश । अन्य कोणत्या बळें अनीश । चलन न पावती अधिकारयुत ।।१८।। ब्रह्मदेवाच्या दिवसांतीं न पावत । मृत्यु हे देव श्रेष्ठ । कर्मरूप प्रधारक असत । निराधार हे सारे ।।१९।। जेव्हां महाप्रलय होत । तेव्हां हेही लय पावत । यांत संशय कांहीं नसत । ऐका शक्तींनो रहस्य हें ।।२०।। लोकपरिवारासहित । ते पुनः देहधारी होत । मृत्युलोकीं नर समस्त । कर्मनियंत्रित असतातीं ।।२१।। जैसें कर्म करिती । तैसें ते फळ लाभती । तत्त्वरूप देव असती । वेदांमध्यें प्रकीर्तित ।।२२।। ते तत्त्वानें चराचर विश्व । आनंदविती अभिनव । उत्पत्ति स्थिति संहार भाव । ब्रह्माकारस्वभावें राहती ।।२३।। हे जगदीश्वर समस्त । महाप्रलय जेव्हां होत । तेव्हां स्वविहार संपवित । योगनिद्रा तैं घेती ।।२४।। योगाकार ते विशेषें असत । पुनः निर्मून ब्रह्मांड खेळत । देवनायक त्यास नसत । योगबळानें ही भीती ।।२५।। योग हा द्विविध वर्णित । विबुधोत्तमांनी

शास्त्रांत । वायुसाधनादींनी लाभत । प्राणायामादिकांनी ।।२६।। त्या योगानें तत्त्वस्थ होत । देवही योग्यांच्या वंशजांत । केव्हां तें करावें रहस्य ज्ञात । शास्त्रमार्गानुसार ।।२७।। संप्रज्ञात असंप्रज्ञात । योग द्विविध असे ख्यात । दुसरा ब्रह्मभूत विदित । योग्यांसी तो साध्य महा ।।२८।। त्या योगबळें योगी जिंकती । सुरांसी नर साध्य करिती । देव त्यायोगें त्यांच्या वश होती । करिती जें जें ते इच्छित ।।२९।। प्रारब्ध चाळविती योगीवश होऊन । देव ते होत पराधीन । तेव्हां त्या देवांच्या विहारीं योगिजन । आसक्त होती तैं योगभ्रष्ट ते ।।३०।। ते जन्ममृत्यु वश होती। योग्यांच्या योगभावें देवांस भीती । तत्त्वरूप ते जाणावे जगती । वेदवाद ह्यास प्रमाण ।।३१।। कर्म एक त्रिविधस्थांचें । एकेक आश्रित रूपांचें। त्याच्या सेवनें भजनें त्यांचें । द्वंद्वरूप वर्ततसे ।।३२।। आतां प्रकृत अवतार चरित । विकटाचें ऐका एकचित्त । एकदा ब्रह्मदेव मयूरक्षेत्रांत। आला तें क्षेत्र पहावया ।।३३।। तेव्हां तो मोहयुक्त । विचार आपुल्या करी मनांत । हा शिवाचा पुत्र ज्ञात । यास नमन मीं न करावें ।।३४।। मीं ज्येष्ठ हा गणेश्वर साक्षात । जरी यांत संशय नसत । तरी परीक्षा घेऊन पश्चात । नमन मीं करीन यासी ।।३५।। ऐसा विचार करून ब्रह्मांडांत । शिवशक्तिसमन्वित । अन्तर्धान पावून राहत । गुप्तरूपें ब्रह्मदेव ।।३६।। मयूरेश तें जाणून । निर्मी चराचर जग प्रसन्न । ब्रह्मदेव तें पाहून । शरण गेला पुनः त्यासी ।।३७।। तेव्हां श्वासासह । ब्रह्मास ओढी उदरांत । तेथ अनंत ब्रह्मांडें भटकत । ब्रह्मदेव येथून तेथे ।।३८।। ऐसी सहस्त्र वर्षें जात । तेव्हां उच्छ्वासमार्गें टाकित । बाहेर त्या विधीस बळवंत । मयूरेश महायश ।।३९।। बाहेर येऊन विधाता पाहत । एक क्षण त्यास तैं विस्मित । होऊन पुनरपि शरण जात । स्तुती करी तयाची ।।४०।।

तदनंतर हर्षयुक्त होऊन । परतला स्वस्थानीं विनतमन । मयूरक्षेत्रीं तेव्हांपासून । ब्रह्मकमंडलू वर्ततसे ।।४१।। ऐशा प्रकारें विधीचा मद । हरण करून खेळे सुखद । द्विजपुत्रांसवें हर्षद । मयूरेश जो जगत्स्त्रष्टा ।।४२।। भक्तांसी जो सर्व देत । ऐसा हा देव उदात्त । पुढें एकदा भाद्री चतुर्थी येत । शुक्ल पक्षांतली तेव्हां ।।४३।। तेव्हां गणेश्वराची मृण्मय मूर्ति । आपापल्या घरीं स्थापिती । शंकरादि गण सर्व पूजिती । आदरानें त्या मूर्तीसी ।।४४।। मयूरेश स्वत: बनवित । शुंडादंडादि चिन्हयुक्त । मूर्ति एक तिज पूजित । स्तुती करी जोडून कर ।।४५।। मयूरेश त्या स्वरूपांत । स्वत:चीच स्तुति करीत । गणनाथा वंदन तुजप्रत। सर्वविघ्नविदारक नमन तुला ।।४६।। भक्तांना जे दुष्टरूप असत । त्यांना जो विघ्न देत । ब्रह्मांचा पति जो उदात्त । सर्व सिद्धिप्रदाता ।।४७।। अमेय मायेनें युक्त । ऐशा ढुंढे नमन तुजप्रत। वक्रतुंडा मीं प्रणाम करित । वक्रांचा तूं नाशकर ।।४८।। परात्म्यासी लंबोदरासी। सर्वांच्या जठरस्थासी । चिंतामणिस्वरूपासी । पंचचित्तधरा नमन असो ।।४९।। हेरंबासी परेशासी । दीनांसी दीनरूपासी । योगेशासी सदा शांतिदात्यासी । शांतिमयासी नमन असो ।।५०।। शांतीच्या शांतिरूपासी । गणेशासी ज्येष्ठराजासी । पूज्यासी विकटासी। ज्येष्ठांस पददात्या नमन तुला ।।५१।। सर्वांच्या मातापित्यासी । अनादीसी विघ्नपासी । सर्वांच्या आदिस्वरूपासी । विघ्नांच्या विघ्नरूपा नमन तुला ।।५२।। सर्वसत्तात्मकासी । स्वानंदवासीसी सर्वपूज्यासी । संयोग अयोग मूर्तीसी । भक्तांस भक्तिदात्या नमन तुला ।।५३।। महोदरासी भीमासी । पाप्यांसी दंडदात्यासी । स्वधर्मनिरतां सुखदात्यासी। मयूरवाहना नमन तुला ।।५४।। मयूरेश्वरासी आखुवाहासी। सर्वेशासी परात्परासी । काय स्तवूं मीं तुजसी । गणाधीशा

योगाकारस्वरूपा ।।५५।। शिवादीही असमर्थ झाले । स्तुति करूं न शकले । वेदादिकही मूकत्व पावले । तेथे माझी काय कथा ।।५६।। आम्हीं तुझे सदा दास। करी आमुच्या रक्षणास । देई दृढ भक्ति तुझी आम्हांस । जेणें माया न बाधेल ।।५७।। बुद्धीशा तुज माझें नमन । ऐसें मयूरेशासी स्तवून। मयूरेश झाला नत एकमन । पूजाविधि आचरे भक्तीनें ।।५८।। ऐशा रीतीं शिवादि पूजिती । सर्वही ते गणनायकाप्रती । मुनिगणही सर्व स्थापिती । मृण्मयमूर्ति विशेषें ।।५९।। त्या कालावधींत तेथ येत । विश्वदेव तीर्थें हिंडत । यदृच्छेनें तेथ प्राप्त। एकनिष्ठ पूजितसे नारायणा ।।६०।। तो नित्य पूजी नारायणासी । शेषशायी जो सुखविलासी । अव्याहतगति तो पापासी । जाळून टाकी तपानें ।।६१।। समुद्रमध्यांत वसत । त्या जनार्दना तो भजत । नंतर जलादिक समस्त । सेवन करी भक्तीनें ।।६२।। अत्यन्त भक्तियोगें पावत । गाणेशांत योग्यता वरिष्ठ । माया करून झाकून टाकित । ज्ञान विश्वदेवाचें ।।६३।। मायेनें मयूरेश जाणत । शेषशायीचा वृत्तान्त । बुद्धिमोहानें तो विसरत। योगमायेनें रहस्य सारें ।।६४।। विश्वदेव येऊन पार्वतीप्रत । भिक्षा पायसादींची मागत । तीही तें त्यास देत । आपोशन करून स्मरण करीं ।।६५।। शेषशायीचें स्मरण करित । तो महादुःखयुक्त । तेथेचि जाहला स्थित । तो द्विजोत्तम त्यासमयीं ।।६६।। तदनंतर गणराज खेदयुक्त । नारायण होऊन सांत्वन करित । चार वर्षांचा तो बाळ पूजित । पराशरसुत मूर्तीसी ।।६७।। मृण्मय उपचारांनी पूजित । त्या मूर्तीसी भक्तियुक्त। गणेशाख्य ज्ञान त्याप्रत । विश्वदेव देत असे ।।६८।। त्या शांतिप्रद ज्ञानें युक्त । गाणपत्य स्वभावें नमित। गुणेश्वरासी तैं शांति प्राप्त । विश्वदेव गेला स्वस्थानीं ।।६९।। एकनिष्ठेनें मुनि भजत मयूरेशासी । ऐशा सुव्रतें विस्मृत । भावें कैसे

ज्ञान संछादलें ।।७०।। विष्णूचा पराक्रम हटवून । खेळे तेथ मयूरेश प्रसन्न । द्विजबाळांसह क्रीडा पावन । करित होता गजानन ।।७१।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते विष्ण्वादिपराधीनतादर्शनं नाम चत्वारिंशत्तमोऽध्याय: समाप्त:। श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय चाळिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । आदिशक्ति कथा पुढची सांगत । एकदा सुखासीन बैसला गणांसहित । मयूरेश तैं शिवास पाहत । माया दाखवी अद्भुत तेव्हां ।।१।। महेशाजवळीं जाऊन । घेई भालस्थित चंद्र ओढून । त्वरेनें गेला निघून । क्रीडनोत्सुक त्या वेळीं ।।२।। मायेनें मोहित शिवादी समस्त । चंद्रापहरणाचें कारण न जाणत । त्या देवेशाचें रहस्य अज्ञात । होतें तया सर्वांसी ।।३।। शिव क्रोधयुक्त अत्यंत । स्वभाळींचा चंद्र आणा म्हणत । मुनिसुत तैं विनम्रपणें सांगत । मयूरेश खेळतसे त्यासवें ।।४।। रागावून शिव आज्ञा देत । गणेश्वरास बांधून आणावें त्वरित । मार देऊन माझ्या पुढ्यांत । घेऊन या शीघ्र त्यासी ।।५।। तदनंतर ते गण जात । जेव्हां मयूरेशाच्या पुढ्यांत । तेव्हां निःश्वासवायूने उडवित । पालापाचोळ्यांसम त्यांसी ।।६।। ते शिवासमोर येऊन पडत । त्यांचा दर्प भग्न करित । शिव तैं चिंतातुर होत । काय करावें तें समजेना ।।७।। तेव्हां पुनरपि माया दाखवित । चंद्र शिवभालावरी ठेवित । हें शिवासी न कळतां घडत । भ्रान्त झाले सारेजण ।।८।। आपुल्या भालावरी चंद्र पाहून । विस्मित झालें शिवाचें मन । त्याचें आगमन निर्गमन । सतत होई ऐसें वाटे ।।९।। ऐसें शिवास करून भ्रान्त। गणेशें दाखविली माया अद्भुत । एकदां तो जात वनांत । दैत्येंद्रास

मु. पु. खंड. ६ अ. ४०-४१

मारावया ।।१०।। दैत्येंद्र तो व्याघ्ररूप घेत । तेव्हां गजानन सिंह होत। त्या मयूरेशास त्या रूपांत । न जाणती विप्रसुत ।।११।। मुनिबाळ त्यास शोधिती । रानांत इतस्तत: भटकती । दर्शनोत्सुक ते चिंता करिती । झोपले शेवटीं थकूनियां ।।१२।। श्रमानें त्यांस निद्रा येत । दक्षिणेकडे पाय त्यांचे असत । तें पाहून यम बांधित । त्या मुनिपुत्रांसी निगडांनी ।।१३।। त्यांस बांधून स्वपुरीं नेत । यम होता कर्तव्यपूर्तिमोदांत । इकडे व्याघ्ररूप दैत्यास मारित । मयूरेश तो परतला स्वपुरासी ।।१४।। तेथ मुनिपुत्रांसी न पाहत । तेव्हां झाला अति विस्मित । अंतर्ज्ञानानें त्यास ज्ञात । वृत्तान्त झाला मुनिपुत्रांचा ।।१५।। मयूरेश स्वर्गलोकीं गेला । त्यानें स्वबळें यम जिंकला । त्या मुनिसुतांचा झाला । संरक्षक तो प्रेमळ ।।१६।। सर्व मित्र करिती जयजयकार । गाती गणेश्वराचें स्तुतिस्तोत्र । ऐशा नानाविध क्रीडा बालवीर । मयूरध्वज तेथें दाखवी ।।१७।। पंधरा वर्षें वयाचा झाला । गणेश्वरें दैत्यगण असंख्य मारिला। तोंवरी अनेक खेळ खेळला । आपुल्या बाळमित्रांसवें ।।१८।। तदनंतर एकदा नारदमुनी । गणेशाच्या सतत भजनीं । पूजनीं मननीं दंग होऊनी। वीणावादन करीतसे ।।१९।। योगी नारदाचें स्वागत करिती । शंकर तयासी पूजिती । अर्घ्य पाद्य देऊन विचारिती । इतिवृत्त जगांतलें ।।२०।। तेव्हां नारद हर्षयुक्त । शंकरास सांगे वृत्तान्त । ब्रह्मदेवें पूर्वीं केलें तप नितांत । सिद्धिबुद्धी आराधिल्या ।।२१।। त्यांनीं त्यास दिलें वरदान। कन्या होऊन भूषवूं सदन । केलें आपुलें सत्य वचन । प्रजापतीच्या घरीं जन्मल्या ।।२२।। आतां त्या झाल्या उपवर । दुसरा न मिळे योग्य वर । मयूरेश हाचि श्रेष्ठ थोर । उभय कन्यांसी वाटतसे ।।२३।। तरी ब्रह्मदेवें मज पाठविलें । कन्याद्वयासाठी याचिलें । त्याचें मागणें मान्य केलें । तरी तो होईल हर्षभरित ।।२४।। शंकरानें तें मान्य केलें ।

वऱ्हाडी सगळे सजले । मयूरेशास घेऊन निघाले । गणांसहित सारे जण ।।२५।। मार्गांत मयूरेशास । सिंधूचें नगर पडलें दृष्टीस । देवांसी मुक्त करण्यास । उद्युक्त तेव्हां जाहला ।।२६।। त्या सिंधुनगरांत जाऊन । महाघोर युद्ध करून । गणांसहित महा असुराशीं लढून । पराक्रम गाजविला ।।२७।। तदनंतर परशूनें फोडित । अमृतपूर्ण नाभिस्थल त्वरित । त्यायोगें सिंधु मरून पडत । नाना दैत्येंद्रही ठार झाले ।।२८।। त्याचा पिता चक्रपाणि । विष्णुभक्त थोर गुणी । मयूरेशास शरण येऊनी । अर्पिलें सारें गणेशासी ।।२९।। गणेशभक्तिसंयुक्त । घेऊनी गेला त्यास नगरांत । आदर सन्मान करित। चक्रपाणि राजा आदरें।।३०।। कारावासांतून सोडवित । विष्णुमुख्य देवांसी त्वरित। देवेंद्रासहित तयांस पूजित । भक्तिभावें त्या वेळीं ।।३१।। तेथ ब्रह्मा हर्षभरें स्मरत । आपुल्या दोन कन्यांस मनांत। सिद्धिबुद्धी तेथ प्रकटत। रूपलावण्य अतुल त्यांचें ।।३२।। देवांस नव्हतें माहित । ब्रह्मदेवाचें हृद्गत । ते त्या कन्या पाहून होत । कामविव्हल तत्क्षणीं ।।३३।। देवेंद्रादी विधीसी विनविती । आम्हांसी द्या या कन्या म्हणती । ह्यांच्या समान लावण्यवती । जगांत कोठें न पाहिल्या ।।३४।। तेव्हां ब्रह्मा म्हणे तयांप्रत । सुरेश्वरहो तुमच्यांत । नसे कोणी त्यांच्या योग्य वाटत । क्षमा करा मजलागीं ।।३५।। मयूरेश हा श्रेष्ठ वाटत । त्यास अर्पण्या कन्या इच्छित । तेव्हां ते सारे देव प्रार्थित । पितामहा पुन: विचार करावा ।।३६।। आपुलें आपण सांगितलें मत । विचारी एकदा कन्यकांप्रत । तेव्हां बह्मदेव खेदयुक्त । विचारी त्या उभयतांसी ।।३७।। ह्या सर्व देववृंदांत । निवडा तुम्ही वर इच्छित । तेव्हां त्या विधात्यास सांगत हृद्गत आपुलें स्वच्छंदें ।।३८।। त्या चिंतामणीकडे पाहती । सिद्धि बुद्धी तैं लाजती । हाचि वर पसंत

चित्तीं । ऐसें सुचवित स्पष्टपणे ।।३९।। तैं मयूरेशास सोडून। अन्य देव गेले निघून । गणेशासी सत्कारून । सुगंधी पुष्पमाळांनी ।।४०।। त्या मयूरेशास समर्पण करित । सिद्धि बुद्धीसी विधियुक्त । तेव्हां देवेंद्रादी त्यास नमित । अत्यंत आदरें सर्वही ।।४१।। सिंधूच्या वधानें प्रहर्षित । देवगण पूजन त्याचें करित । स्तवन करिती भक्तियुक्त। देवर्षी तेव्हां श्रद्धेनें ।।४२।। शिखिवाहा तुज नमन । मयूर ध्वजा तुज अभिवादन । मयूरेशा तुज नमन । गणेशा तुज प्रणाम असो ।।४३।। अनाथांच्या नाथासी । अहंकाररहितांच्या पतीसी । मायाप्रचालकासी विघ्नेशासी । सर्वानंदप्रदात्यासी नमन ।।४४।। सदा स्वानंदवासीसी । स्वधर्मरतांच्या पालकासी । अनादीसी परेशासी । दैत्यदानवमर्दनकरा नमन ।।४५।। विधर्मस्थस्वभावां दूरकर्त्यासी । विकटासी शिवपुत्रासी। सर्वांच्या मातापित्यासी । पार्वतीनंदनासी नमन ।।४६।। स्कंदाग्रजासी नाना अवतारधारकासी । विश्वसंस्थाकरासी । काश्यपासी शेषपुत्रासी। सिंधुहंत्यासी नमन असो ।।४७।। हेरंबासी परशुधरासी । देवदेवेश पालकासी । ब्रह्मपतीसी योगेशासी । शांतिदात्यासी नमन असो ।।४८।। कृपालवासी अनंताननबाहूसी । अनंतउदरासी अनंतविभवासी । चित्तवृत्तिप्रचालकासी । सर्व हृत्स्थासी नमन असो ।।४९।। सर्वांसी पूज्यासी सर्वादिपूज्यासी । ज्येष्ठराजासी गणांच्या पतीसी । सिद्धिबुद्धीच्या वरासी । मयूरेशा तुज नमन असो ।।५०।। जेथ वेदादीही धरिती मौन । स्तवनीं असमर्थ योगिजन । तेथ आमुचें बुद्धिमान । किती समर्थ होणार? ।।५१।। म्हणोनी देवा जैसें जमलें । तैसेंचि आम्हीं स्तविलें । दयाघना नमन केलें । तुजला आम्ही भक्तिभावें ।।५२।। ह्या स्तवनानें तुष्ट होई । आम्हांसी रक्षी प्रत्यहीं । तुझ्या अंगातून सर्वही । उत्पन्न आम्हीं जाहलों ।।५३।। ऐसी स्तुति करून । प्रणाम करिती

विनतमन । तेव्हां देव होऊन प्रसन्न । म्हणे देवेशांनो वर मागा ।।५४।। मुनिदेवहो स्तोत्र हें उत्तम । सर्वसिद्धिप्रद मनोरम । महाभागहो सर्वदा अभिराम । मज आवडतें अत्यंत ।।५५।। जो हें वाचील अथवा ऐकेल । अथवा वाचून दाखवील । त्यास भुक्तिमुक्ति लाभेल । गणेशभक्ति सर्वदा ।।५६।। मयूरेशाचें ऐकून वचन । देव तैसे मुनिजन । प्रार्थिती प्रणाम करून । हर्षभरें त्या वेळीं ।।५७।। जरी प्रसन्नभावें वर देसी । तरी अचल भक्ति दे आम्हांसी ।नाथा तुझ्या स्मरणासी । सदैव करो हृदय आमुचें ।।५८।। महावीर सिंधूस मारिलें । तेणें आम्हां कृतार्थ केलें । आतां स्वाधिकारपद भलें । भूषवूं तुझ्या आज्ञेनें ।।५९।। तथाऽस्तु ऐसें बोलून । देवमुनींसी इच्छित देऊन । आपुली भक्ति दृढ करून । त्या सर्वांच्या हृदयांत ।।६०।। चक्रपाणि राजा गणेश पंचायतन । पूजी नित्य एकमन । त्यायोगें स्वानंदीं निमग्न । मयूरेश सायुज्य पावला ।।६१।। तदनंतर सर्वांसमवेत । मयूरेश मयूरनगरीं परतत । सर्व देवांसी योग्य स्थानीं स्थापित । देव मुनींसी तैं सांगे ।।६२।। ज्यासाठीं देवांनो आलात । तें तें सर्व पुरविलें इच्छित । आतां निजलोकीं मीं जात । मुनीश्वरहो निरोप द्यावा ।।६३।। ऐसें बोलून अंतर्धान । मयूरेश पावला तत्क्षण । लीला त्याची अगाध महान । देवर्षी खेदयुक्त जाहले ।।६४।। पार्वती शंकर मूर्च्छित पडले । तैं त्यांच्या हृदयांत प्रकटले । तयांसी मयूरेश म्हणाले । सावध व्हावें माते ताता ।।६५।। मीं तुमच्या हृदयांत स्थित । चित्तवृत्तींसी चालना देत । माझा वियोग तुम्हांप्रत । कदापि न होईल ।।६६।। बाह्य मूर्ति स्थापून । पूजा करा भक्तियुक्तमन । मज सेवावें विशेषेंकरून । त्यानें संतोष पावाल ।।६७।। ऐसें बोलून अन्तर्धान । गणेश पावला प्रसन्न । तदनंतर ब्रह्मा करी स्थापन । द्विजहस्तें मूर्ति गणेशाची ।।६८।। ह्या वेळीं सारे हर्षयुक्त । आपुल्या अंशानें

अन्यत्र स्थित । स्वकर्मपरायण समस्त । आपापल्या कार्यास्तव ।।६९।। पूर्णभावें ते राहती । मयूरेशासी सेविती । क्षेत्रवासांत ते रमती। भक्तियुक्त सारे शक्तींनो ।।७०।। विकटाचा अवतार ख्यात । मयूरेश्वरनामें जगांत । भक्तांसी सर्वसिद्धी देत । परम प्रीतिप्रदायक ।।७१।। जो हें वाचील चरित । ऐकेल वा श्रद्धायुक्त । त्यास लाभेल फळ ईप्सित । अंतीं स्वानंदाचा लाभ ।।७२।। मयूरेशसायुज्य लाभून । ब्रह्मरूप भक्त होऊन । अवर्णनीय आनंदांत निमग्न । मुक्ति तीच परमश्रेष्ठ ।।७३।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते मयूरेशचरितवर्णनं नामैकचत्वारिंशत्तमोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय एकेचाळिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । आदिशक्ति अन्यशक्तींस सांगत । विकटें रचिलें नाना भेदयुत । ब्रह्म असद्रूप विविधां नटत । आपुल्या मायाप्रभावें ।।१।। त्यायोगें नानाविध ब्रह्म । जगेंही नानाविध परम । तीं जीवहीन विशेषें अनुपम । विकटाचें तप आचरती ।।२।। एकाक्षरविधानें तप करिती । दिव्य वर्षे सहस्त्रें जातीं । त्यायोगें संतुष्ट गणपति । वरदानार्थ प्रकटला ।।३।। रथस्थ तो सूर्यरूप प्रकटत । सर्वात्मा सर्वभाव दिसत । तेव्हां जग तें ब्रह्में हर्षित । नमिती त्यास अत्यादरें ।।४।। त्याच्या दर्शनानें बोधयुक्त । शक्तींनो तो ज्ञानयुक्त । आत्माधार हा विकट असत । सूर्यरूपधर निःसंशय ।।५।। विकटांत तैसा सूर्यांत । न कोठेंही भेद दिसत । त्यास पूजून प्रणाम करित । स्तोत्रें नानाविध रचिती तदा ।।६।। नाना ब्रह्में तेथ स्तविती । पुनः पुनः वंदन करिती । विकटासी परेशासी भावभक्ती । नमन करिती भक्तिभावें ।।७।। सर्व जीवनधारकासी ।

आत्माकारासी सूर्यासी । भानूसी सप्ताश्वरथस्थितासी । विघ्नेशासी नमन असो ।।८।। परात्म्यासी हेरंबासी । जगन्नाथासी ब्रह्मनाथासी । संज्ञापतीसी साक्षिरूपासी । साक्षीसी छायानाथा नमन ।।९।। देवेशासी देवदेवेशासी । अनामयासी नित्यासी । सहस्रकरधारकासी । अनंतभेदहीना नमन ।।१०।। अद्वितीयासी सर्वादीसी । सदा सर्वाधारासी । विश्वमूर्तीसी कर्माधारासी । सर्वांच्या पालका नमन तुला ।।११।। आदित्यासी परेशासी । परात्परतरासी दिनपतीसी । नाथासी दिनपालासी। अर्यम्णाला (सूर्याला) नमन असो ।।१२।। काश्यपासी तेजपतीसी । अनाधारासी वृष्टिचालकासी । किती स्तवन करावें तुजसी । सूर्या जेथ वेद कुंठित ।।१३।। योगी सतत सर्व आत्माकार । मानिती तुज परात्पर । एकमेव अद्वितीय थोर । वेदवादी वर्णिती तुला ।।१४।। आम्हीं भिन्न-भावें विलसत । त्यायोगें तूं विकट निश्चित । ऐसी स्तुति करून नमित । ब्रह्में हर्षभरित तयासी ।।१५।। त्यांस वरतीं उठवून । अर्यमा म्हणे कृपावचन । भक्तवत्सल तो महान । वर मागा ब्रह्मांनो ।।१६।। मी तुमच्या भक्तीनें बद्ध । मागाल तें देईन विशद । तुम्हीं रचिलेलें हें स्तोत्र सुखद । भुक्तिमुक्तिप्रद सर्वदा ।।१७।। जें जें इच्छित स्तोत्र पाठक । तें तें मीं देईन निःशंक । ब्रह्मभूयप्रद स्तोत्र पाठकासी। भक्तिवर्धन हें स्तोत्र ।।१८।। सूर्याचें वचन ऐकतीं । ब्रह्में तेव्हां संतुष्ट होतीं । हर्षभरें तयास म्हणतीं । भक्तियुक्त मनानें ।।१९।। संतुष्ट जरी ब्रह्मेशा अससी । जीवनयुक्त करी आम्हांसी । सर्वभावें स्वसौख्यासी । आम्हीं प्राप्त करावें ।।२०।। तुझ्या पादांबुजाची भक्ति । सदैव देई आम्हांप्रती । मायामोहनाशनार्थ जगतीं । योगज्ञान दे परात्परा ।।२१।। तथास्तु ऐसें सविता म्हणत । त्यांस ज्ञान इच्छित देत । मायामोहनाशार्थ उपदेशित । शांतिप्रद गाणेशयोग ।।२२।। सूर्य सांगे तयाप्रत । जैं असत्

सत् संयोग होत । तेव्हां त्यास योग म्हणत । स्वसंवेद्यात्मक गकारपर ।।२३।। स्वस्वरूपेण हीन । हा अयोग ख्यात जाण । णकाराक्षरें वर्णन । वेदांत याचें केलें असे ।।२४।। त्यांच्या योगें गणेशान । शांतीचा शांतिदाता महान । चित्तांत चिंतामणि पाहून । योगी व्हाल दृढचित्त ।।२५।। संयोग अयोगरूप जें असत । तें मायामय ज्ञात । त्या मायेच्या विकट भावें तयाप्रत । विकटासी सदा भजा तुम्ही ।।२६।। स्वस्वब्रह्मांत स्थित । स्वभावज कर्म करित । गणेशार्पणभावें सतत । रहावें तुम्ही आनंदानें ।।२७।। ऐसें सांगून भानु पावत । अन्तर्धान स्वानंदांत । सर्वनायक तो ब्रह्मांप्रत । महादेवींनो या रीतीं ।।२८।। तदनंतर सन्मुख्य ब्रह्में होत । आपापल्या विधानें युक्त । जीवयुक्त होऊन क्रीडा करित । परस्परांशी सर्वदा ।।२९।। जैसा सूर्यें उपदेशिला । विकटनाम योग भला । तैसा त्यांनीं साधिला । त्यानें शांत तीं झालीं ।।३०।। हृदयांत चिंतामणीस जाणून । बाह्य कर्में त्यास अर्पून । विकटाचें करिती भजन । ब्रह्में ऐशीं तीं रमलीं ।।३१।। ऐसें हें विकटाचें महिमान । सूर्यावताराख्यान शोभन । सांगितलें संक्षेपें पावन । देवींनो तुम्ही भाग्यवंत ।।३२।। हा सूर्यात्मक विकट ख्यात । त्या महात्म्याचा अवतार पुनीत । सर्वसिद्धिप्रद जगांत । पठनें वाचनें सिद्धिलाभ ।।३३।। हें अवतार आख्यान । इहलोकीं सुखसाधन । परलोकींही साधन । चिरंतन सुखप्राप्तीचें ।।३४।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते सूर्यावतारचरितं नाम द्विचत्वारिंशत्तमोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय बेचाळिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । आदिशक्ति कथा पुढें सांगत । कश्यपाची भार्या

विनता ख्यात । रूपशालिनी अत्यंत । गर्भिणी ती जाहली ।।१।। तिच्यापासून अंडीं दोन । तेज:पुंज झालीं उत्पन्न । त्यांतला ज्येष्ठ सुत अरुण । गरुड त्याचा अनुज झाला ।।२।। अरुणानें सूर्याची आराधना । करून पुरविली हितकामना । वर लाभून इच्छित मना । संतोष त्याचा जाहला ।।३।। तो सूर्याचा सारथी असत । अनन्यभावें सेवी सतत । भक्तिभावपूर्ण चित्त । सूर्य आत्मा अच्युत ।।४।। तो सूर्य गणेशास भजत । आनंदानें अविरत । एकदा त्यास प्रणाम करित । अरुण सारथी तयाचा ।।५।। नंतर खेदयुक्त वचन । म्हणे स्वामी आपण महान । सर्व भावांचा आत्मा शोभन । अमृतमय अपूर्व ।।६।। आपण एकमेव अद्वितीय । गजाननास भजतां सदय । कोण हा गणेश्वर सावयव । कश्यपाचा पुत्र तो ।।७।। तो मिथ्यात्मा नसे पूर्ण । देवेशा तुज झाला मोह दारुण । स्वरूपाच्छादन करून । कां भजसी अन्यासी ।।८।। योगिजन देवादिक जाणून । तुझें रहस्य परम पावन । शांति लाभली महान । तुझ्याहून श्रेष्ठ कोण असे? ।।९।। तरी कां परास भजतां । आपलें माहात्म्य कमी लेखितां । तेव्हां सूर्य बोले विनतासुता । सत्य असे तुझें वचन ।।१०।। तूं मज विशेषें जाणसी । मायायोगज्ञान तुजसी । परी पूर्ण भाव न जाणसी । अज्ञान तुझें हें असे ।।११।। काय सांगूं तुज प्रत । मीं गणेशापासून संजात । शंकरादी देव समस्त । त्याच्यापासून जन्मले ।।१२।। हा त्यायोगें ज्येष्ठराज असत । त्याहून ज्येष्ठ कोणी नसत । असत् नानाविध शक्ति ज्ञात । तेथ मीं जाण आत्मा असे ।।१३।। त्यांच्या समान भावें कीर्तित । आनंदरूप विष्णू जगांत । आनंदाहून पर व्यक्त । शंकर सूर्य संज्ञा ज्यासी ।।१४।। त्यांच्या योगें गणेश वर्तत । आनंदाख्य जगांत । सर्वसंयोगें कर्तृत्वें ज्ञात । मायायुक्त गणेश्वर हा ।।१५।। अरुणा तो लाभतो निश्चित । स्वसंवेद्य योगें

हृदयांत । त्याहून परम अयोग ख्यात । स्वसंवेद्यवर्जित ।।१६।। त्या योग-अयोगांचा संयोग । तोच हा गणेश्वर सुभग । विचक्षणा वेद सांग। हेंच रहस्य सांगती ।।१७।। ब्रह्मणस्पति जगीं ज्ञात । तो एक श्रेष्ठ जगांत। आम्ही ब्रह्ममय समस्त । आमचा स्वामी गणराज ।।१८।। आम्ही सदैव त्याचें भजन । करितों ऐसें सूर्यवचन । ऐकून अरुण करी वंदन। भक्तिभावें विचारी ।।१९।। तेजस्वीमया पतीस । तो विचारी सूर्यास। म्हणे मज अरुणास । उपाय सांगा गणेशप्राप्तीचा ।।२०।। ज्या सुखद उपायानें मीं होईन । गाणपत्य देवनायक महान । सूर्य म्हणे तें ऐकून। एकाक्षर विधानें भज तयासी ।।२१।। त्या उपायें हृदयांत । पाहून चिंतामणीस पूजीत । योगिवंद्य होशील जगांत । ऐसें सांगून मंत्र दिला ।।२२।। विधियुक्त मंत्र स्वीकारून । अरुणें केलें अभिवादन । नंतर उत्तम वनांत जाऊन । उग्र तप त्यानें आचरिलें ।।२३।। गणेश ध्यानांत तत्पर । योगमार्गें तप उग्र । करून विघ्नेशा तोषवी भक्तिपर । योगसेवापरायण ।।२४।। त्यायोगें तो योगीन्द्र वंद्य । चित्त पंचविध हृद्य। रसयुक्त त्यागून आद्य । निमग्न गणेशजपांत झाला ।।२५।। ऐसीं शंभर वर्षें जात । द्विरदानन तेव्हां प्रकटत । भक्तिभावें त्याच्या संतुष्ट । वर देण्यास तैं आला ।।२६।। तेव्हां तो अरुण न ओळखत । त्या गणेशासी तैसाचि ध्यानरत । हृदयांत संलीन मग्न असत । आश्चर्य एक घडलें तैं ।।२७।। संज्ञायुक्त गणेशास पाहत । रथांत जो उपविष्ट । सिद्धिबुद्धींच्या समवेत । आश्चर्यचकित जाहला ।।२८।। हृदयातलें ध्यान सोडून । नेत्र पाहे उघडून । बाहेरही वरद गजानन । पाहता झाला अरुण तेव्हां ।।२९।। अति हर्षभरें वरती उठून । तयास करितसे वंदन । विधियुक्त पूजन करून । नम्रभावें स्तुती करी ।।३०।। तो स्तवनास प्रारंभ करित । तत्क्षणीं सूर्यास संज्ञेसहित । पाहूनियां रथारूढ विस्मित । जाहला

अत्यंत स्वमानसीं ।।३१।। गणेशकृपेनें त्यास ज्ञात । सुबुद्धियोगें क्षणांत। गणेश हाच रवि असत । विकटत्वें यांत संशय नसे ।।३२।। माया नानाभेदयुक्त । आत्मा परी भेदवर्जित । म्हणून विकटसंज्ञ प्रख्यात । आत्माकार हा गजानन ।।३३।। विकटरूपी सूर्यास भजेन । निरंतर कलांशयुक्त पावन । सूर्यात्मक रूप दाखवून । स्वकीय भेद तो दाखवीतसे ।।३४।। हें जाणून भक्तियुक्त । आनंदाश्रु तो ढाळित । नियमन करूनिया चित्त । आनंदें स्तोत्र गातसे ।।३५।। अरुण तेव्हां स्तवन करित । गणनाथा नमन तुजप्रत । तेजपते अनामया तुज वंदित। देवेशा आत्म्या वंदन तुला ।।३६।। ब्रह्मपतीसी जीवपतीसी । आखुवाहनासी सप्ताश्वासी । स्वानंदवासीसी चतुर्भुजधरासी । सौरलोकनिवासकरा तुज नमन ।।३७।। सहस्त्रकिरणासी सिद्धिबुद्धिपतीसी । संज्ञानाथासी विघ्नहर्त्यासी । अन्धकारविनाशकासी। हेरंबा तुज नमन असो ।।३८।। अनंतविश्वासी नामरूपधरासी । मायाचालकासी सर्वेशासी । सर्वपूज्यासी ग्रहराजासी । ग्रहासी तेजदात्या नमन ।।३९।। यशस्वी गणेशासी परेशासी । विघ्नेशासी विवस्वत भानूसी । ज्योतींच्या पतीसी लंबोदरासी । एकदन्ता नमन तुजला ।।४०।। महोत्कटासी गजाननासी । प्रणाम पुनःपुनः तुजसी । जो सूर्य तो विकट तूंच असती । भेद न दिसे कदापि ।।४१।। तुझी भक्ति देई मजप्रती। गजास्य तूं गणपती । किती करूं मीं स्तुती । गणाधीशा योगाकारस्वरूपा ।।४२।। आपणास चतुर्धा विभागून । खेळ करिसी तूं सदा प्रसन्न । ऐसी आपुली स्तुति ऐकून । विकट दाखवी स्वरूपा ।।४३।। वामांगी संज्ञा युक्त। गजवक्त्रादि चिन्हसहित । त्यास पाहून प्रणाम करित । पांगळा अरुण तो हर्षभरें ।।४४।। त्यास गणाधीश सांगत । माग वर जो हृदयेप्सित। तूं रचिलेलें हें स्तोत्र जगांत । सर्वसिद्धिप्रद होईल

।।४५।। यांत संदेह कांहीं नसत । चिंतित सारें होय प्राप्त । जो कोणी जप करित । अथवा ऐकत हें स्तोत्र ।।४६।। महापक्ष्या माझा संतोष झाला । या स्तोत्रानें अन्त:करणाला । हें स्तोत्र वाचील त्याला । दुर्लभ कांहीं न होईल ।।४७।। गणेशाचें ऐकून वरदान । पांगळा अरुण करी वंदन । आनंदाश्रुपूर्ण नयन । रोमांचित झाली सारी काया ।।४८।। अरुण म्हणे गजाननासी । गणाधीशा देई तव भक्तीसी । तुझ्या पदकमळाच्या आश्रयासी । मीं व्हावें गाणपत्यप्रिय ।।४९।। मज सदा महात्म्यांची संगति । लाभावी हा वर द्या मजप्रती । हें सारें होईल निश्चिती। ऐसा वर विकटें दिधला ।।५०।। तदनंतर पावला अन्तर्धान । जेव्हां तो विकट गजानन । अरुण जाहला खेदखिन्न मन । तेथेंच राहिला आठवीत ।।५१।। स्थापून गणपतीची मूर्ती । द्विजहस्तें उत्सव करी प्रीती । भानुविनायक नामें ख्याति । करी तया विकटेशाची ।।५२।। गणेशासी त्या पूजून । परतला सूर्याकडे अरुण । समग्र वृत्तान्त करी कथन । प्रणाम करून तयासी ।।५३।। त्यानें जो तेथ स्थापिला । तो अरुण गणपति प्रसिद्ध झाला । रथसंस्थ भजे नित्य त्याला । योगशांतिप्रद जो सदा ।।५४।। ऐसें हें विकटाचें माहात्म्य कथिलें । भानुविघ्नेश अवतरले । त्या गणेशाचें चरित भलें । सर्वसिद्धिप्रदायक ।।५५।। जो हें ऐकेल वा वाचील । श्रद्धायुक्त नर अमल । त्यास इच्छित फळ लाभेल। अन्तीं स्वानंद प्राप्त होई ।।५६।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरिते भानुविनायकचरितं नाम त्रिचत्वारिंशत्तमोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय त्रेचाळिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । आदिशक्ति अन्य शक्तींस सांगत । एकमेव

अद्वितीय जें ख्यात । परब्रह्म जें वेदांत । तोचि विकट गजानन ।।१।। त्यानें माया केली उत्पन्न । त्यांत बिंबित ब्रह्म पावन । विकटाचें जें आत्माकार प्रसन्न । सर्वत्र भ्रमस्थ जीववाचक ।।२।। त्या विकटापासून । संज्ञा जाहली उत्पन्न । तीच भार्या रवीची होऊन । खेळकरी माया तीच असे ।।३।। बिंबमय वीर्यापासून । नाना जीव तिच्यांत उत्पन्न । त्यांचा प्रसवदाता म्हणून । सूर्य नामें ख्यात असे ।।४।। संज्ञेसहित सूर्य ज्ञानहीन । घोर तप करी एकमन । गणेशाचें करी ध्यान । दिव्य वर्ष सहस्रावधी ।।५।। एकाक्षर मंत्र जपें अविरत । तोषवी तो गणेशचित्त । तोही भक्तवत्सल कारणें प्रकटत । म्हणे सूर्या वर माग ।।६।। सूर्यासी तो तैं सांगत । वर माग जो असेल वांछित । देईन मी तपें संतुष्ट । जरी दुर्लभही तो असेल ।।७।। भानु गणेशास पाहून । जाहला हर्षोत्फुल्ल प्रसन्न । संज्ञेसहित उभा राहून । प्रणाम करी गजाननासी ।।८।। पुन:पुन: त्यास नमित । महायश त्यास पूजित । कर जोडून संज्ञेसहित । स्तवन करी भक्तिभावें ।।९।। विकटासी मायामायिकरूपासी । वामांगी संज्ञा ज्याच्या त्यासी । दक्षिणांगीं भानू सेवी जयासी । त्या गणाधीशा नमन असे ।।१०।। सिद्धिबुद्धिपतीसी । भानू संज्ञायोगें त्या गजाननासी । एकमेव अद्वितीय ब्रह्मासी । कैसें वर्णूं तयासी मी ।।११।। धन्य मी सर्वभावें जगांत । पाहिला गजानन देव श्रेष्ठ । त्या सर्वादिपूज्यास नमित । गजाननासी परमात्म्यासी ।।१२।। हेरंबासी सदा ज्येष्ठराजासी । परेशासी महाविघ्ननाशनासी । महात्म्यासी दुरात्म्यांस दंडकर्त्यासी । महाविघ्नदायका नमन ।।१३।। अनाथासी सनाथनाथासी । सर्वदायकासी अनाथनाथासी । नाथनाथासी अनंत विश्वासी । अनंतमायाधरा नमन ।।१४।। ब्रह्मणस्पतीसी कवीसी । मूषकवाहनासी सर्वांतरप्रचारीसी । मूषकध्वजासी मयूरेशासी । नमन तुजला पुन:

पुनः ।।१५।। किती करूं मी तुझी स्तुती । पंचचित्त प्रचालक तूं असती । गणाधीशा म्हणोनि तुजसी । प्रणाम करितों तुष्ट होई ।।१६।। ऐसी स्तुति जैं गात । तैं रोमांचित शरीर होत । सद्गद कंठ वर्तत । नाचतसे आनंदानें ।।१७।। तेव्हां गणेश त्यास म्हणत । तूं केलेलें हें स्तवन मज संमत । सर्वप्रद होईल निश्चित । पाठकां तैसे वाचकांसी ।।१८।। जें जें इच्छित असेल मनांत । तें तें देईन मी संतुष्ट । स्तोत्रपाठकास अन्तीं करित । ब्रह्ममय महामते ।।१९।। तुज देईन वर निश्चित । मीं असे भक्तिमोहित । तूं स्त्रीसहित प्रख्यात । भक्तश्रेष्ठ होशील माझा ।।२०।। भानु म्हणे तैं गणेशाप्रत । माझ्यावरी ढुंढें तूं संतुष्ट । भक्ति दे तुझी दृढ सतत । स्वाभाविक ज्ञान मज देई ।।२१।। नाना कार्य करण्याचें बळ । सर्वात्मकारक दे शरीर बळ । मज करी गणेश भक्त निर्मळ । गाणपत्यप्रिय सर्वदा ।।२२।। तूं माझा पुत्र व्हावें । तारणात्मक जगीं स्वभावें । तेथ मीं तुज प्रेमें भजावें । निरंतर पुत्रभावानें ।।२३।। हृदयांत चित्तसंस्थ । देवस्वरूपास मी मूर्त । नित्य ध्याता कृतकृत्य होत । ऐसें करी गजानना ।।२४।। तथाऽस्तु म्हणून अन्तर्धान । पावले देव गजानन । सूर्य त्यांचें करी चिंतन । प्रियेसह घरीं परतला ।।२५।। सूर्य नंतर सत्तायुक्त । ज्ञानवंत निर्मी असद्ब्रह्म अद्भुत । जें नाना रूपयुक्त । परम आश्चर्यकारक ।।२६।। गणेशाच्या वरदानानें मोहहीन । भानू त्याचें करी भजन । योगीन्द्र वंद्य भक्तियुक्त मन । श्रेष्ठ भक्त गणेशाचा ।।२७।। एके दिनीं प्रियेसहित । गणनायकास तो स्मरत । तामिस्त्र असुरें बळ गर्वित । पीडित बहुत जाहला ।।२८।। स्मृतीनें आठवित स्वसुत । बाळ जो शुंडाधर उदात्त । त्यास पाहून विभावसू म्हणत । कोण तूं बाळा गणेशाकृती ।।२९।। येथ कां रे आलास । कीं तूं गणेश परमेश । सूर्याच्या ऐकून वचनास ।

त्यास म्हणे गजानन ।।३०।। स्मृतिउत्पन्न मी तुमचा सुत । सूर्या विघ्नेश्वर साक्षात । पूर्वीं वर दिला तो स्मर चित्तांत । पुत्र तुझा मी जाहलों ।।३१।। आतां माझें करी पालन । पित्या संज्ञेसह करी लालन । त्याचें तें वचन ऐकून । संज्ञेसह अर्यमा प्रणाम करी ।।३२।। पूजा करून त्यास स्तवित। अथर्वशीर्षावर्तन करित । एवढ्यांत तामिस्रासुर येत । सविता देवासन्निध ।।३३।। त्यास पाहून भयें पळत । गणनाथ परी निर्भयचित्त । उठून मुष्टिघातें त्यास ताडित । पाडिला त्यास भूमीवरी ।।३४।। तो दैत्यपुंगव निर्जीव पडला । तें पाहून सविता परतला । गणनाथास वंदून उभा राहिला । दिङ्मुढ गणेशमायेनें ।।३५।। संज्ञेसह त्यास स्वीकारित । पुत्रभावें होऊन मोहित । लालन करी अतिहर्षित । अपूर्व सुतलाभानें ।।३६।। गणेशमायेनें संज्ञा देत । त्या गणेशास स्तनपान विनत । वर देऊन पुत्र जात। वरदाख्य नाव ऐशा तें ।।३७।। तदनंतर पुत्र अंतर्हित। होतां भानू पडला मूर्च्छित । संज्ञेसहित अति दुःखित । तेव्हां त्यांच्या हृदयांत ।।३८।। स्वयमेव ढुंढी विलसत । प्रकट होऊन उपदेश करित। म्हणे शोक करूं नका चित्तांत । माझा वियोग न घडेल ।।३९।। माझी मूर्ति बनवून । तिचें करा निरंतर पूजन । तदनंतर तीं सावधान । जाहलीं संज्ञा सूर्यदेव ।।४०।। जैसें पुत्रे कथिलें। तैसें त्यांनी आदरें केलें । भक्तीनें सदा भजन केलें । मूर्ती तयाची स्थापूनी ।।४१।। अन्यशक्ति तैं विचारीत । कोण हा तामिस्त्र असुर असत । त्याचें सांग आम्हां वृत्त। ज्यास्तव वरद अवतार झाला ।।४२।। आदिशक्ति तेव्हां त्यांस सांगत। सूर्यास एकदा अहंकार होत । मीं सर्वांचा जीवनात्मक जगांत । सर्वांचा मी प्रकाशदाता ।।४३।। मी तेजःपुंज सर्वांत । माझ्या सम कोणी न विश्वांत । तदनंतर बहु काळ जात । विसरला तो गणनायकासी ।।४४।। पुढें छायेसह संग घडत । तिच्यापासून जन्मला सुत।

तो हा तामिस्त्र नामें ख्यात । त्यास स्वीकारी पुत्रत्वें ।।४५।। अंधकारकरास त्या म्हणत । पुत्रा त्रिगुणापासून अभय तुजप्रत । त्रैलोक्याचें राज्य अद्भुत । दिलें तुजला प्रेमानें ।।४६।। जें जें इच्छिसी मनांत । तें तें सर्व सफल निश्चित । होईल तुझें नांव ख्यात । तामिस्त्र तूं भाग्यवंत ।।४७।। त्यास प्रणाम करून । महादैत्य तो जाई निघोन। पाताळांत करी गमन । तेथ शुक्राचार्य प्रेरी तया ।।४८।। दैत्य त्यास राजा करिती । देवांचा द्वेष्टा म्हणून स्तविती । त्यांच्यासह तो त्वरितगति। ब्रह्मांड मंडळ जिंकीतसे ।।४९।। दैत्येशांसह राज्य करित । झाला होता अति बळवंत । सूर्यास पाहून तेजयुक्त । वैरभाव त्याच्या मनांत ।।५०।। तो अंधकारें आच्छादित। शक्तींनो सूर्यास सतत । सूर्यास निरर्थक करित। तेजस्व्यांत श्रेष्ठ तो होता ।।५१।। नाना यत्न जरी करित । तरी सूर्य त्यास जिंकूं न शकत । तेव्हां अहंकारहीन होत । स्मरे चित्तीं गणनायकासी ।।५२।। तैं अवतरला गजानन । मानसपुत्र रवीचा होऊन। तें कथिलें वृत्त शोभन । त्या बाळ गणेशें असुर मारिला ।।५३।। सूर्याचें केलें संरक्षण । तामिस्त्रासी ठार मारून । हें सर्व सूर्यपुत्राचें कृत्य महान । वरददेवाचें कथिलें तुम्हां ।।५४।। हें सर्वसिद्धिकर आख्यान। महादेवींनो जो करी वाचन। अथवा ऐकेल मन लावून । पूर्ण त्याचे सर्व मनोरथ ।।५५।। तो अन्तीं ब्रह्मभूत । पावेल स्वानंदपद अधिकृत। ऐसे हें विकट वरद चरित। सौख्यप्रद सर्वदा ।।५६।।
ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटवरदचरितं नाम चतुश्चत्वारिंशत्तमोऽध्यायः समाप्तः । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय चव्वेचाळिसांवा संपूर्ण)

ॐ श्रीगणेशाय नमः । आदिशक्ति कथा पुढें सांगत । ऐसे नाना अवतार घेत । महात्मा विकट ते असंख्यात । वर्णनातीत महादेवींनो ।।१।। भक्तिप्रिय स्वभावें घेत । अवतार भक्तविघ्न निवारणार्थ । मयूरक्षेत्री सांप्रत । जावें तुम्ही सर्वांनी ।।२।। तेथ मीही पूर्ण रूपें वसत । येथ कलांशे संस्थित । क्षेत्री जाऊन विश्वेश्वरा सतत । शक्तींनो भजा भक्तीनें ।।३।। त्यानें योगींद्रवंद्य व्हाल । विषय भावांत चित्तावर मळ । साठतो म्हणून विमल । व्हावें तुम्ही शक्तींनो ।।४।। गणेशमार्गाचा आश्रय घेऊन । विकटासी भजा एकमन । वेदादींतही कर्म शोभन । कीर्तिलें जें गणेशपर ।।५।। तेच नित्य भक्तिभाव युत । आचरावें तुम्ही श्रद्धायुक्त । गणेशमूर्तीचें चिंतन हृदयांत । सदैव करा प्रिय शक्तींनो ।।६।। मानसी तैसी बाह्य पूजा । करून गणेशा तोषवा सहजा । विषयांत विरक्त होऊन भजा । विकटास तीच उत्तम भक्ति ।।७।। गणेशावरी होऊन आसक्त । करावी भक्ति ऐसी अविरत । मुद्गल सांगती दक्षाप्रत । आदिशक्ति ती देई ।।८।। एकाक्षर मंत्र शक्तींप्रत । विधियुक्त गणराजाचा उदात्त । नंतर ती मौन धरित । शक्ती करिती प्रणाम ।।९।। तदनंतर त्या भक्तियुक्त । महाकाळीं प्रमुख त्यांत । दक्षा मयूरक्षेत्रीं त्वरित । तेथ पाहती आदिशक्तीसी ।।१०।। तिची पूजा करून । ढुंढीस पूजिती एकमन । तदनंतर तप महान । आचरिलें त्यांनी शंभर वर्षें ।।११।। तेव्हा त्यांच्या पुढें प्रकटत । मयूरेश्वर हर्षित । त्यास प्रणाम करून पूजित । नानाविध उपचारांनी ।।१२।। मनोरम सोळा उपचारयुक्त । पूजा करून वंदित । कर जोडून स्तवन करित । महाकाली महालक्ष्मी महासरस्वती ।।१३।। मयूरेशासी विघ्नेशासी । भक्तविघ्नहर्त्यासी । विघ्नदाता तूं अभक्तासी । गणेशा तुला सदा नमन ।।१४।। लंबोदरासी देवासी । मूषकध्वजासी अनाथनाथासी । नाथांच्याही नाथासी । परेशा

तुला नमोनमः ।।१५।। महेशासी सिद्धिदात्यासी । गजाननासी अनंतासी । सदा स्वभक्तां सर्वदासी । ब्रह्मपतीसी तुज नमन ।।१६।। शांतिमयासी महात्म्यासी । शांतीच्या शांतीरूपासी । हेरंबासी कवीसी। कविरूपा तुज नमस्कार ।।१७।। कवीस कविपद दात्यासी । कवीशासी सिद्धिबुद्धिप्रदासी । सिद्धिबुद्धिप्रदात्यासी । सिद्धिबुद्धिचालका तुज नमन ।।१८।। माया मायिक चिन्हांनी । खेळ करिसी प्रतिदिनीं। योगशांतिस्थ भाव ठेवूनी । शांतिप्रद तूं तुज नमन ।।१९।। शक्तीस भानूस विष्णूस । शंकराच्या नाना रूपधरास । नाना खेळ करणाऱ्यास। पुनःपुनः नमन करितसे ।।२०।। वेदादीही जेथ मौन । धरिती तेथ काय करूं स्तवन । शिवादी देवही धरिती मौन । तेथ पाड काय आमुचा ।।२१।। मयूरध्वजा करितों नमन । भक्ति दे तुझी एकमन । सर्वेशा तुझ्या क्षेत्रीं निवास पावन । देई देवा गणाधीशा ।।२२।। गणाधीश ते सर्व वर देती । भक्तितुष्ट त्यांसी म्हणती । जो हें स्तोत्र वाचील जगतीं । अथवा ऐकेल भावयुक्त ।।२३।। तो इहलोकीं भोग भोगून । अन्ती स्वानंद लाभून । ब्रह्मपदाचा लाभ होऊन । धन्यत्व पावेल अक्षय ।।२४।। ऐसें दक्षा महान चरित । कथिलें विकटाचें संक्षेपें तुजप्रत। श्रद्धा ठेवितां सतत । सर्व सिद्धिप्रदायक हें ।।२५।। यासम अन्य कांहीं नसत । कोठेंही कांहीं जगांत । हें साक्षात बह्मपद पूर्ण असत। अधिक काय वर्णावें ।।२६।। हें विकटाचें महिमान । करील पठण अथवा श्रवण। तो नरोत्तम सिद्धि लाभून । धन्य होईल निश्चयें ।।२७।। एक आवर्तन नित्य करील। तो विकटरूप होईल । त्याचें दर्शनही अमल। पावन सर्व जनां होत ।।२८।। जेवढीं अन्य साधने असत । त्यांनीं जेवढे पुण्य लाभत। त्याहून शंभरपट प्राप्त । पुण्य या खंडाच्या श्रवणाने ।।२९।। कांहीं करितां होमहवन । तैसेंची भजनपावन । अथवा तळीं धर्मशाळा बांधून।

सार्वजनिक सेवा करी ।।३०।। तें इष्टपूर्तादिक कर्म । करिता भक्तिपूर्ण मनोरम । त्याहूनही शतगुण पुण्य शोभन । लाभतें खंड हा ऐकता ।।३१।। अन्य पुराणे इतिहासयुक्त । ऐकता पुण्य जें लाभत । त्याहून अधिक पुण्य प्राप्त । ह्या खंडाच्या वाचनानें ।।३२।। काय वर्णावें बहुत जेथ । ब्रह्मपति असे वर्णित । त्या विकटाच्या सम जगांत । अन्य कोण संभवेल ।।३३।। सुत म्हणे शौनकाप्रत । ऐसे सांगून मुद्गल थांबत । महायोग्यास त्या नमित । दक्षप्रजापति हर्षानें ।।३४।। तेव्हां मुद्गल त्यास म्हणत । सांगितलें तुजला विकटचरित । कामासुराचा नाशकर पुनीत। द्विजोत्तमा दक्षा हें पूर्ण ।।३५।। धर्मार्थकाममोक्षदायक । ब्रह्मपर हें पावक । ह्यासम अन्य न सौख्यदायक । आणखी काय ऐकूं इच्छिसी ।।३६।। ऐसें मुद्गलें विचारिलें । तेव्हा दक्षें काय सांगितलें । तें पुढिल खंडी वर्णिलें । सीताराम विनम्र गणेशचरणी ।।३७।। ओमिति श्रीमदान्त्ये पुराणोपनिषदि श्रीमन्मौद्गले महापुराणे षष्ठे खंडे विकटचरितसमाप्तिवर्णनं नाम पंचचत्वारिंशत्तमोऽध्याय: समाप्त: । श्रीगजाननार्पणमस्तु ।

(अध्याय पंचेचाळिसांवा संपूर्ण)

।। ओमिति श्रीमुद्गलपुराणे षष्ठ: खंड: समाप्त: ।।

卐